मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

**मुंबई कार्यालय**
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५

**पालघर कार्यालय**
२०८/बी, लोकमान्य बिल्डींग, तालुका पंचायत समिती कार्यालयासमोर, पालघर, ४०१४०४ मो. ९८९२९६८७२५

**नाशिक कार्यालय**
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८

**वितरण**
मो. नं. ८४२४९३६४३६

मुंबई | RNI No.: MAHAMAR/2016/79101 | शुक्रवार, २० जून २०२५ | वर्ष: १० | अंक: ५१ | पाने-८ | किंमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३

## समृद्धी महामार्गावर अपघात, दोघे ठार

**भिवंडी , दि. १९ प्रतिनिधी**

समृद्धी महामार्गावर भीषण अपघात झाला आहे. आमने टोलनाक्याजवळ जीप ट्रकला धडकवली. या अपघातात दोघे जण जागीच ठार झाले आहेत. समृद्धी महामार्गाचा अंतिम टप्पा इगतपुरी ते ठाण्याचा आजपासून गुरुवारी ५ जूनपासून प्रवाशांसाठी खुला झाला आहे. या टप्प्यातच हा अपघात झाला आहे. समृद्धी महामार्गावर शहापूर जवळील कोळकेवाडी आणि आमने टोलनाका दरम्यान अपघात झाला आहे. पहाटे पाच वाजण्याच्या सुमारास चॅनल क्रमांक ६९० येथे क्रुझर जीप आणि ट्रकमध्ये या दोन वाहनांची धडक होऊन भीषण अपघात झाला. या अपघातामध्ये दोन जणांचा जागीच मृत्यू झाला तर ७जण गंभीर जखमी झाले आहेत. तर, ३ जणांची प्रकृती गंभीर जखमी आहे. अब्दुल पाशा शेख (वय ६५ वर्षे) आणि जाहीद सिद्दिकी ( वय ४० वर्षे) यांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. अपघातानंतर तात्काळ जखमींना भिवंडी शहरातील उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. तर या अपघातात मृतांचा पंचनामा करून शवविच्छेदनासाठी भिवंडी येथील शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आले.

# राज्यात पावसाचा धुमाकूळ

## पुण्यात मुसळधार, रायगड जिल्ह्यातील पूरस्थिती गंभीर; अंबा, कुंडलिका नदीने ओलांडली धोक्याची पातळी

**रायगड/पुणे, दि. १९ प्रतिनिधी**

**गेल्या दोन ते तीन दिवसापासून पावसाचा जोर कमी झाला होता. मात्र, आज पुन्हा राज्याच्या विविध भागात पावसानं धुमाकूळ घातला आहे. अनेक ठिकाणी रस्त्यांना नद्यांचं स्वरुप आलं आहे. नदी नाले दुथडी भरुन वाहत आहेत. राज्यातील पुणे, रायगड आणि नाशिक जिल्ह्यात तुफान पाऊस सुरु आहे. अनेक भागात रस्ते तुंबले आहेत. तर काही भागात रस्त्यांवर कंबरेइतकं पाणी साचलं आहे. रायगड जिल्ह्याला आज गुरुवारी मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. या जिल्ह्यात पुढील तीन दिवस पावसाचा जोर कायम राहणार असल्याची शक्यता मुंबई प्रादेशिक हवामान केंद्राने वर्तवली आहे. दरम्यान, जिल्ह्यातील पूरस्थिती गंभीर बनली आहे. अंबा आणि कुंडलिका नदीने धोका पातळी ओलांडली आहे. तर पाताळगंगा नदीने इशारा पातळी ओलांडली आहे. यामुळे प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या आहेत.**





### रायगड जिल्ह्यात तुफान पाऊस, नागोठणे शहरात मोठ्या प्रमाणात पाणी

रायगड जिल्ह्याला आज मुसळधार पावसाने चांगलेच झोडपून काढला आहे. आज हवामान विभागानं ऑरेंज अलर्ट दिला आहे. त्यामुळं रायगड जिल्ह्यात अनेक भागांमध्ये मुसळधार पाऊस कोसळत आहे. या मुसळधार पावसाचा मोठा फटका रोहा आणि सुधागड तालुक्यातील पाली नागोठणे शहरामध्ये बसलेला पाहायला मिळत आहे. रोहा तालुक्यातल्या कुंडलिका आणि सुधागड तालुक्यातल्या पाली विभागातून जाणाऱ्या अंबा नदीने धोका पातळी ओलांडल्यामुळे सकल भागात पाणी साचलं आहे. नागोठणे शहरात मोठ्या प्रमाणात पाणी साचल्यामुळे येथील नागरिक आता सुरक्षित स्थळी जात आहेत. त्यामुळे येथील जनजीवन विस्कळीत झाल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. नागोठणे मधील एसटी बस स्थानक देखील पाण्यात गेल्यामुळे येथील प्रवाशांची तारांबळ उडाले तर तिकडे अंबा नदीने धोका पातळी ओलांडल्यामुळे पाली खोपोली रस्ता बंद अवस्थेत पडलाय. अंबा नदीची धोका पातळी ९ मीटर आहे. पण सध्या नदीची पाणी पातळी १०.६० मीटर असून ती धोका पातळीपेक्षा जास्त आहे. कुंडलिका नदीची धोका पातळी २३.९५ मीटर असून सध्याची तिची पातळी २४.५० मीटर आहे. पाताळगंगा नदीची इशारा पातळी २०.५० मीटर असून तिची पातळी संध्या २१.०५ मीटर आहे. सावित्री, उल्हास आणि गाढी नदीची पाणी पातळी इशारा पातळीपेक्षा कमी आहे. पाली पोलीस ठाणे हद्दीतील अंबा नदीच्या पाण्याची पातळी वाढली आहे. यामुळे रस्त्यावर पाणी आल्यामुळे पाली-वाकण रस्ता वाहतुकीस बंद करण्यात आला आहे.

खालापूर, माथेरान, पनवेलमध्ये २०० मिलिमीटरपेक्षा जास्त पावसाची नोंद झाली आहे. अलिबागमध्ये १९० मिलीमीटर पाऊस पडला आहे. कुंडलिका नदीने इशारा पातळी ओलांडल्यामुळे आज (दि. १९ जून) जिल्ह्यातील अलिबाग, रोहा, तळा, महाड, पोलादपूर तालुक्यांतील सर्व शाळा आणि महाविद्यालयांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे.

### खेडमध्ये जगबुडी नदीने ओलांडली धोक्याचे पातळी

खेडमध्ये जगबुडी नदीने धोक्याचे पातळी ओलांडली आहे. नगरपरिषदेने सायरन देऊन नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. जगबुडीचे पाणी मटन मार्केट परिसरामध्ये शिरलं आहे. जगबुडी नदी शेजारील सर्विस रोड पाण्याखाली गेल्यामुळे खाडी पट्ट्यातील गावांचा खेडमध्ये येणारा जवळचा मार्ग बंद झाला आहे. पावसाचा जोर कायम असल्यामुळे खेड शहराला पुराचा धोका कायम आहे. .

### पुणे शहरासह परिसरात सकाळपासून मुसळधार पाऊस

पुणे शहरासह परिसरात सकाळपासून मुसळधार पाऊस सुरु आहे. खडकवासला धरण साखळी क्षेत्रात मोठा पाऊस सुरु आहे. खडकवासला धरणातून २००० क्युसेक पाणी सोडण्यात येणार आहे. खडकवासला धरणातून मुळा मुठा नदीत २००० क्युसेक पाण्याचा विसर्ग करण्यात येणार आहे. धरण साखरी क्षेत्रात सुरु असणाऱ्या सततच्या पावसामुळे पाण्याचा विसर्ग करण्यात येणार आहे. पुणे शहरातील भिडे पुलाला पाणी लागलं आहे. पाऊस असाच राहील तर भिडे पूल पाण्याखाली जाण्याची शक्यता आहे. लोणावळा लगतच्या मळवली ते देवळे गावचा संपर्क तुटलाय. ओढे-नाल्याच्या ठिकाणी पाणी रस्त्यावर आलंय. पुणे-लोणावळा रेल्वेतून हा परिसर कसा जलमय झालाय, हे टिपण्यात आलाय. सकाळी रस्त्यावर गुडघाभर पाणी होतं आता पावसाने थोडी विश्रांती घेतल्यानं परिस्थिती पूर्वपदावर येईल अशी अपेक्षा आहे. सध्या मळवली ते देवळे गावच्या ग्रामस्थांना लोणावळा मार्गे वळसा मारावा लागतोय.

### नाशिक जिल्ह्यातही पावसाचा धुमाकूळ, गोदावरीच्या पाणी पातळीत वाढ

नाशिक जिल्ह्यात देखील सकाळपासून पावसाचा जोर वाढला आहे. सकाळपासून शहरासह जिल्ह्यात अनेक ठिकाणी मुसळधार पाऊस सुरु आहे. मुसळधार पावसामुळे नाशिकमध्ये गोदावरीच्या पाणी पातळीत वाढ झाली आहे. रामकुंड आणि गोदा घाट परिसरात गोदावरीची पाणी पातळी वाढली आहे. आज नाशिकला पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. त्रंबकेश्वरमध्ये देखील पावसाला सुरुवात झाली आहे. शहरातील काही भागात रस्त्यावर पावसाचं पाणी साचले आहे. शहरातील रस्त्यावरून पावसाच्या पाण्याचा निचरा होण्यास अडथळा येत असल्याने शहरातील मुख्य चौकात रस्ते जलमय झाले आहेत. अर्धा एक तासातच रस्ते जलमय झाल्यान मान्सून पूर्व कामावर प्रश्नचिन्ह उपस्थित केलं जात आहे.

ठाणे, मुंबई उपनगर, मुंबई शहर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग सागरी किनारपट्टीवर ३.५ ते ३.८ मीटर उंच लाटा येण्याची शक्यता आहे. या दरम्यान लहान बोटींना समुद्रात न जाण्याचा तसेच किनारपट्टीजवळील पर्यटन व जलक्रीडा थांबविण्याचा इशारा देण्यात आला आहे.

## अग्रलेख — खरीखरी

### वनविद्यावाचस्पती गेले दिगंतरा

वनाच्या मनात ज्यांचे स्थान होते, त्या मारुती चित्तमपल्ली यांची जीवनयात्रा संपली. शिक्षण घेतल्यानंतर आयुष्यभर ज्यांनी वन आणि पर्यावरण यांची अत्यंत तळमळीने शुश्रुषा केली, सेवा केली. ते वनविद्या वाचस्पती मारुती चितमपल्ली यांनी काल इच्छामरण पत्करले. या वनवाचस्पतीचे मृत्यूपूर्वीचे शेवटचे शब्द कोणते असावेत, 'माझ्या सर्व इच्छा पूर्ण झालेल्या आहेत, आता मला जाण्याची परवानगी द्या'. त्यांचे सख्खे पुतणे श्रीनिवास चितमपल्ली यांना हे शब्द आघातासारखे वाटले. मारुती चितमपल्ली यांचे संपूर्ण जीवन जवळजवळ विदर्भातच गेले. सरकारी नोकरीच्या निमित्ताने ते विदर्भात आले आणि विदर्भाच्या वनांचे दत्तक पुत्र झाले. येथील जंगलांशी त्यांनी घट्ट नाते जुळवलेले होते. त्यांच्या कुटुंबात त्यांची पत्नी आणि त्यांची एक पुत्री एवढेच आत्मीयजन होते. त्यांच्या पत्नीचे अकाली निधन झाले आणि पित्याची सेवा करण्यासाठी पुत्रीने लग्नच केले नाही. दुर्दैव असे की त्यांना जपणारी त्यांची लेकही अल्पशा आजाराने अकाली निधन पावली. मुलगी असेपर्यंत त्यांनी नागपुरातच वास्तव्य केलेले होते. या शहरात राहूनच त्यांनी पर्यावरण आणि वने यांच्यावर २५ पुस्तकांचे लेखन केले. त्यांनी पक्षीकोश लिहिला. वन्य प्राणीकोश याचेही काम पूर्ण झालेले आहे. मत्स्यकोशाचे काम ते करीत होते. वृक्षकोशाची संहिता पूर्ण झाल्याचे त्यांनी सांगितले होते. म्हणजे हा वनयोगी केवळ वनाचे चिंतन करीत नव्हता. तर आपले प्रत्येक पुस्तक अभ्यासपूर्ण आणि सर्वांग दृष्टीने परिपूर्ण राहील. याकडेही ते बारीक लक्ष देत असायचे. त्यांनी जे साहित्य निर्माण केले आहे. ते पाहिल्यावर भविष्यात मारुती चितमपल्ली नावाचा एक लेखक होता की अनेक लेखक होते. असा प्रश्न उपस्थित होऊ शकतो. त्यांनी ज्या खात्याला आयुष्यभर सेवा दिली. त्या वनविभागाने त्यांना पद्मश्री देताना ज्या आवश्यक बाबी असतात. त्याची परिपूर्ती केली नाही, ही मोठी खेदाची बाब आहे. राष्ट्रपतींच्या हस्ते त्यांना पद्मश्री मिळाली. तेव्हाच त्यांची तब्येत ठीक नव्हती. वनाची ३६ वर्ष सेवा केल्यानंतरही ते २९ वर्ष जंगलातच राहिले. आपले पुतणे श्रीकांत यांनी त्यांना दिल्लीला नेले. तेव्हाही त्यांची प्रकृती तोळामासाच होती. शेवटी सोलापूरला परत आल्यावर त्यांची तब्येत जास्त खालावली. शेवटपर्यंत वाचन आणि लेखनात दंग असलेल्या या अरण्य ऋषीने आपल्या पुतण्याला आपली इहलोकीची यात्रा संपविण्यापूर्वी जाण्याची परवानगी मागितली आणि ते निघून गेले. त्यांना राज्य शासनासह विविध संस्थांनी अनेक महनीय पुरस्कार दिले. भारती विद्यापीठाचा जीवनसाधना पुरस्कार, नागपूरचा अतिशय महत्त्वाचा नागभूषण पुरस्कार, खासदार एन. डी. पाटील समाजसेवक पुरस्कार, रानवाटा या पुस्तकाला उत्कृष्ट साहित्य निर्मिती पुरस्कार, भैरू रतन दमानी साहित्य पुरस्कार, विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार यासह इतर अनेक पुरस्कारांनी मारुती चितमपल्ली यांना नव्हे. तर स्वतःच्या पुरस्कारांनाच अनेकांनी गौरवान्वित केले. सर्व पुरस्कारांची जंत्री द्यायची झाली. तर जागाच पुरणार नाही. त्यांनी केलेली कोश वांग्मयाची निर्मिती हे त्यांनी मराठी भाषेला दिलेले शब्दांचे धन आहे. त्यांनी निरनिराळ्या श्वापदांना, पाखरांना, वेगवेगळ्या प्राण्यांना दिलेली मराठी नावे आणि वैविध्यपूर्ण प्राणीसृष्टी त्यांच्या लेखनात पानोपानी जाणवते. वन्यजीव आदिवासींची संस्कृती आणि त्यांचे नैसर्गिक जीवन, आदिवासींची मालकी असलेली सृष्टीची रहस्यं अशा प्रकारच्या ललित लेखनातून वाचकांना त्यांनी संमोहित करून टाकलेले होते. हे वनज्ञान ऋषी ज्या ज्या भागात गेले. त्या त्या भागातील आदिवासींच्या भाषा ते मनोमन शिकले. हे त्यांचे बहुभाषाविध ज्ञानोपासक लेखन त्यांच्या विद्वत्तेची साक्ष देते. वनखात्यात सेवा देताना त्यांनी मराठी भाषेच्या वृद्धीसाठी अहर्निश लेखन केले. वनखात्यात नोकरी म्हणजे श्रीमंतीचा राजमार्ग असे म्हटले जाते. मात्र या अरण्य ऋषींनी मराठी भाषेची श्रीमंती वाढवली. गोनिदां म्हणजेच गो. नि. दांडेकर मोठे वनप्रेमी साहित्यिक होते. दांडेकरांनी त्यांना प्रेरणा दिली. विद्वत्तरत्न नरहर कुरुंदकर, पक्षीमित्र डॉक्टर सलीम, सत्यकथाकार राम पटवर्धन यांच्यासह शीर्षस्थ कथाकार जीए म्हणजेच जी. ए. कुलकर्णी वगैरे अनेकांनी त्यांना प्रोत्साहित केले. वनप्रेमी असलेले नवेगाव बांध येथील माधवराव पाटील- डोंगरवार हे त्यांचे अत्यंत जिवलग स्नेही होते. माधवरावांच्या वाड्यात चितमपल्ली वारंवार कुटुंबासह येत असत. येथेच त्यांनी पक्षीकोश निर्माण केला होता. त्यांच्या आयुष्यात त्यांनी अनेक आदिवासी तरुणांशी घट्ट मैत्री केली. होती नवेगाव बांध येथेच त्यांनी अनेक पुस्तके लिहिली. गोंदिया जिल्ह्यातील हा भाग विविध पक्षांच्या किलबिलाटाने नेहमीच गजबजलेला असायचा. दररोज शिकार करणाऱ्या आदिवासींनी त्यांच्या संगतीत आल्यावर आपल्याकडील ३६ बंदुका मारुती चितमपल्ली यांच्याकडे सोपवल्या. यावरून त्यांच्या आणि आदिवासींच्या परस्पर संबंधाची कल्पना सहज येऊ शकते. वनाशी संबंधित या विद्यावाचस्पती बद्दल सर्वांनाच आत्मीयता होती. अशा प्रकारे मराठी भाषा समृद्ध करणाऱ्या महान लेखकाला केवळ एकटेपण आल्यामुळे नागपूर सोडावे लागले. ही जिव्हारी लागणारी बाब आहे. पाच वर्षांपूर्वी त्यांनी आपले जन्मगाव सोलापूर येथे प्रयाण केले आणि काल अत्यंत समाधानी जीवन जगलेले मारुती चितमपल्ली पंचत्वात विलीन झाले. त्यांच्या व्यासंगी साहित्याला आणि मराठी भाषेची शब्दसंपदा समृद्ध करणाऱ्या या वनविद्या वाचस्पतीला आमची साश्रू नयनांनी शोकांजली!

nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023

## चोरांचा बाजार, पैसा फेको तमाशा देखो

### उद्धव ठाकरेंचा घणाघात




**मुंबई, दि. १९ प्रतिनिधी**

चिन्ह चोरले, पक्ष फोडला, वडील चोरले तरी उद्धव संपत नाही. पैसा फेको तमाशा देखो असा विरोधकांकडे चोराचा बाजार भरला आहे. जे दाढी खाजवत आहेत ते आधी कुठे होते माहित नाही. आजच्या आपल्या वर्धापन दिनाच्या दिवशी जमलेल्या शिवसैनिकांचा जयघोष पाहिला तर विरोधकांचे नॅपकिनसह कपडे ओले होतील,' अशी बोचरी टीका उद्धव ठाकरे यांनी विरोधकांवर केली. ते शिवसेनेच्या वर्धापन ५९व्या दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते. ठाकरे गटाचा सोहळा मुंबईत षण्मुखानंद हॉलमध्ये संपन्न झाला.

५९ वर्ष झाली तरी शिवसेना तरुणच आहे आणि तरुणच राहणार आहे असे शिवसेना पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांनी शुभेच्छा देताना म्हणाले. उद्धव ठाकरे यांनी शिंदेवर घणाघात करताना म्हणाले की जे आपला बाप बदलतात आणि राजकारणात ज्यांना पोर होत नाही ते घराणेशाहीवर टीका करतात त्यांची कीव येते. शिंदेंचा मेळावा म्हणजे पैसा फेको तमाशा देखो असा आहे.

राज ठाकरेंच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेशी संभाव्य युती करण्याबाबतही भाष्य केले. उद्धव ठाकरे भाषणात म्हणाले, "गेल्या काही दिवसांपासून बातम्या सुरू आहेत. काय होणार? होणार का? होणार की नाही होणार, ते लवकरच कळेल. तुमच्या (कार्यकर्ते) सर्वांच्या जे मनात आहे, राज्याच्या मनात जे आहे, तेच मी करेन." "पण हे होऊ नये, मराठी माणसाची शक्ती एकत्र येऊ नये. म्हणून यांच्या मालकाचे नोकर इकडे गाठीभेटी घ्यायला लागले आहेत. मुंबईवर यांना ताबा मिळाला नाही, मुंबई आमच्या ताब्यात पुन्हा आल्यानंतर मालकाच्या मित्राचं कसं होणार, अदाणीचं काय होणार? याची त्यांना चिंता. यामुळे मराठी माणसाची शक्ती एकत्र न येऊ देण्याचे प्रयत्न सुरू आहेत", अशी टीका उद्धव ठाकरेंनी केली.

दरम्यान, भाजपवर टीका करताना ते म्हणाले की,. भाजपचे सरकार आल्यानंतर पनवती लागली आहे. एअरपोर्टचे छत गळते आहे. मेट्रो स्टेशनमध्ये पाणी, प्रयागराजमध्ये चेंगराचेंगरी, विमान अपघात.. खरंतर आज आपल्या देशाला पंतप्रधानांची गरज आहे. पण पंतप्रधान नसल्यासारखी अवस्था आहे. हे पंतप्रधान भाजपचे आहेत. ज्या सरदार पटेलांनी संघावर बंदी आणली. त्याच सरदार पटेलांचा सर्वात मोठा पुतळा उभारला. हे यांचे हिंदुत्व.

ज्यांना राजकारणात पोरं होत नाही ते आमच्यावर टीका करतात. अरे तुला पोरं होत नाहीत. आम्ही काय करू. भाजपचे लोक असेच आहेत.

दरम्यान, तुझी उंची केवढी, आवाज कसा, उंची पेंग्विनची, चाल बदकाची, जीव केवढा, बोलतोस काय, वडिलांची पार्श्वभूमी काय कोणावर बोलतोस, एक कोणतरी बाप ठरवा अशी नाव न घेता राणेंवर उद्धव ठाकरेंनी बोचरी टीका केली.

## आपला मेळावा बाळासाहेबांच्या विचारांचा

### एकनाथ शिंदेंचा हल्लाबोल

**मुंबई, दि. १९ प्रतिनिधी**

पला मेळावा हा बाळासाहेबांच्या विचारांचा आहे. तर दुसरा मेळावा हा सत्तेसाठी लाचार झालेल्यांचा आहे असे म्हणत सुरुवातीलाच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेना ठाकरे गटावर हल्लाबोल केला. हिंदुत्वाचा भगवा आपल्याकडे आहे. शिवधनुष्य आपल्याकडे आहे आणि जनतेचा आशिर्वाद देखील आपल्याकडे आहे असे एकनाथ शिंदे म्हणाले. आपल्या पक्षात जी वाढ होतेय ही सर्वांच्या मेहनीची आहे. ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण याचेच हे प्रतिबिंब असल्याचे एकनाथ शिंदे म्हणाले.

बाळासाहेबांनी आयुष्यभर ज्या काँग्रेसचा विरोध केला. मात्र या लोकांनी शिवसेना काँग्रेसच्या दावणीला बांधण्याचे काम केल्याचे एकनाथ शिंदे म्हणाले. महाराष्ट्राचा विश्वासघात केल्याची टीका एकनाथ शिंदे यांनी ठाकरे गटावर केली. मुख्यमंत्रीपदासाठी झाले लाचार ते काय होणार बाळासाहेबांचे वारसदार असे म्हणत एकनाथ शिंदे यांनी थेट उद्धव ठाकरे यांच्यावर हल्लाबोल केला. सत्तेच्या खुर्चीसाठी कधीही आम्ही तडजोड करणार नाही असे एकनाथ शिंदे म्हणाले. हिंदुत्वाची आम्ही कधी प्रतारणा करणार नाही वचन आम्ही दिल्याचे एकनाथ शिंदे म्हणाले. काही लोकांना निवडणुका आल्यावर कार्यकर्त्यांची आठवण येते. एरव्ही हम दो हमारे दो असे म्हणत शिंदेंनी ठाकरेंवर टीका केली.

बाळासाहेबानंतर तुम्ही मराठी माणसांसाठी काय



केले? याचा हिशोब द्या असे म्हणत एकनाथ शिंदेंनी उद्धव ठाकरेंना सवाल केला. आता म्हणतात आम्ही हिंदुत्व सोडले नाही मग बाळासाहेबांना हिंदूहृदयसम्राट तुम्ही का म्हणत नाही, असा सवाल देखील एकनाथ शिंदे यांनी केला. हिंदुत्व आमचा श्वास आहे असे एकनाथ शिंदे म्हणाले. भाषणात उद्धव ठाकरे म्हणाले कमॉन कील मी पण मी म्हणतो मेलेल्या माणसाला काय मारणार. महाराष्ट्राच्या जनतेने विधानसभेच्या निवडणुकीत तुमचा मुडदा पाडलेला आहे अशी टीका एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर केली. वाघाचे कातडे पांघरुन लांडगा वाघ होत नाही असे एकनाथ शिंदे म्हणाले. त्यासाठी वाघाचा काळीज आणि मनगटात जोर लागतो असे एकनाथ शिंदे म्हणाले. तो दम शिवसैनिकात आहे. आमच्या नादाला तुम्ही लागू नका. तुमचा चांगा पलटी घोडं फरार आम्ही केलं आहे. बाळासाहेबांचा आणि आनंद दिघेंचा सच्चा कार्यकर्ता मी असल्याचे एकनाथ शिंदे म्हणाले.

## राज्यातील प्रकल्पांचे भूसंपादन ठरलेल्या वेळेत पूर्ण करा - मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई, दि. १९ प्रतिनिधी**

राज्यातील महत्त्वाच्या सर्व प्रकल्पांचे भूसंपादन ठरलेल्या वेळापत्रकानुसार पूर्ण करून प्रकल्प लवकरात लवकर मार्गी लावावेत. तसेच भूसंपादनाअभावी एकही प्रकल्प रखडणार नाही याची संबंधित सर्व यंत्रणांनी दक्षता घ्यावी, अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या.

राज्यातील महत्त्वाच्या प्रकल्पांच्या भूसंपादनाचा आढावा मुख्यमंत्री फडणवीस यांनी वर्षा निवासस्थानी घेतला. त्यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी या सूचना दिल्या. यावेळी नागपूर – गोवा शक्तिपीठ महामार्ग, विरार – अलिबाग कॉरिडोर, जालना – नांदेड द्रुतगती महामार्ग, पुणे रिंग रोड पूर्व, पश्चिम व विस्तारीकरण, भंडारा – गडचिरोली द्रुतगती महामार्ग, नागपूर – चंद्रपूर द्रुतगती महामार्ग, नागपूर – गोंदिया द्रुतगती महामार्ग, नवेगाव (मोर) – सुरजागड मिनरल कॅरिडोर, वाढवण – इगतपुरी द्रुतगती महामार्ग या राज्यातील रस्ते प्रकल्पांच्या भूसंपादनाचा तसेच वर्धा - नांदेड, वर्धा – गडचिरोली रेल्वे प्रकल्प आणि कोल्हापूर, कराड, अकोला, गडचिरोली आणि छत्रपती संभाजीनगर येथील विमानतळाच्या भूसंपादनाचा सविस्तर आढावा घेण्यात आला.



प्रकल्प रखडल्यामुळे त्याच्या किंमतीमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ होते असे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, भूसंपादनाच्या प्रक्रियेसाठी सर्व यंत्रणांना टाईमलाईन दिलेली आहे. त्याचे तंतोतंत पालन करण्यात यावे. सर्व यंत्रणा आणि संबंधित अधिकारी यांनी मिशन मोडवर काम करावे. भूसंपादनाची कामे गांभीर्याने घेऊन तातडीने मार्गी लावावीत. याबाबत सर्वांनी गुणात्मक आणि रचनात्मक काम करावे अशा सूचनाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिल्या.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, शक्तिपीठ महामार्ग आराखडा गतीशक्तीवर रन करून त्याचा आराखडा तयार करून घ्यावा. जेणे करून कमीत कमी वन जमीन बाधित होईल. या रस्त्याच्या भूसंपादनासाठी लागणाऱ्या १२ हजार कोटींच्या निधीची वित्त विभागाने तरतूद करावी. विरार अलिबाग कॅरिडोरच्या मोरबे ते कारंजा टप्प्यामध्ये वन जमिन व कांदळवन असल्यामुळे त्यासाठी लागणाऱ्या परवानग्या घेण्याची प्रक्रिया तातडीने सुरू करावी. तसेच या प्रकल्पाच्या परवानग्या घेत असतानाच प्रशासकीय प्रक्रिया समांतर सुरू ठेवावी. त्यामुळे कामास गती देता येईल. वाढवण – इगतपुरी द्रुतगती महामार्गाचा समावेश सागरमाला योजनेत करण्याविषयीचा प्रस्ताव सादर करावा. जालना – नांदेड द्रुतगती महामार्गाचे परभणी जिल्ह्यातील सेलू येथील भूसंपादनाची प्रक्रिया १५ दिवसात पूर्ण करावी. विदर्भातील भंडारा – गडचिरोली, नागपूर – चंद्रपूर, नागपूर - गोंदिया या सर्व द्रुतगती मार्गांचा आराखडा गतीशक्तीवर रन करून अंतिम करुन घ्यावा. वर्धा - गडचिरोली व वर्धा – नांदेड रेल्वे मार्गाच्या भूसंपादनाची प्रक्रिया १५ दिवसात पूर्ण करून काम मार्गी लावण्यात यावे, अशा सूचनाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिल्या.

## शिंदेंकडून राज ठाकरेंना स्नेहभोजनाचे निमंत्रण?

**मुंबई, दि. १९ प्रतिनिधी**

राज्यातील राजकारणात शिवसेना (शिंदे गट) आणि मनसे यांच्यात युती होणार का, या चर्चांना पुन्हा एकदा चालना मिळाली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे लवकरच मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांना स्नेहभोजनासाठी त्यांच्या निवासस्थानी आमंत्रित करणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. या भेटीमुळे दोन्ही पक्षांमध्ये जवळीक निर्माण होण्याची शक्यता राजकीय वर्तुळात व्यक्त केली जात आहे. विशेष म्हणजे या स्नेहभोजन आयोजनाची पूर्ण जबाबदारी मंत्री उदय सामंत यांच्याकडे देण्यात आली आहे, अशी माहितीही मिळत आहे.

सूत्रांच्या मते, उपमुख्यमंत्री शिंदे यांनी स्वतः पुढाकार घेऊन राज ठाकरेंना सोबत घेण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. आगामी मुंबई महानगरपालिका निवडणुका, तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ही जवळीक राजकीयदृष्ट्या महत्त्वाची ठरू शकते. या चर्चांवर मनसेचे नेते संदीप देशपांडे यांनी प्रतिक्रिया देताना स्पष्टपणे म्हटले की, "कोणी घरी जेवायला गेले म्हणून युती होते असं नसतं. पक्षाची आयडॉलॉजी हा देखील महत्त्वाचा भाग असतो." तसेच, यावर शिवसेना (ठाकरे गट) नेत्या व माजी महापौर किशोरी पेडणेकर यांनी मिश्कील प्रतिक्रिया दिली. "स्नेहभोजनाला जायचं की नाही हे राज ठाकरेंनीच ठरवावं, आम्ही काय बोलणार?"

एकनाथ शिंदे-राज ठाकरे भेट घडल्यास, ती केवळ सौजन्यभेट असेल की आगामी निवडणुकांसाठी युतीचा प्रारंभ, याबाबत चर्चेला वेग आला आहे. भाजप, शिंदे गट आणि मनसे यांच्यातील त्रिसंघ तयार होणार का? याबाबतही चर्चेला तोंड फुटले आहे. सध्या ही भेट औपचारिक आहे की राजकीय रणनीतीचा भाग, याबाबत साशंकता कायम असली तरीही मुंबईतील राजकारणात हलकेच खळबळ निर्माण झाली आहे. पुढील काही दिवसांत या भेटीचा खरा अर्थ स्पष्ट होण्याची शक्यता आहे.

## साठ्ये महाविद्यालयात तरुणीची आत्महत्या

**मुंबई, दि. १९ प्रतिनिधी**

मुंबईतील प्रसिद्ध साठ्ये महाविद्यालयात एका तरुणीने आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. मुंबईच्या पश्चिम उपनगरातील विलेपार्ले परिसरात साठ्ये महाविद्यालय आहे. गुरुवारी सकाळी या मुलीने साठ्ये महाविद्यालयाच्या इमारतीवरुन उडी मारुन आत्महत्या केली. यामुळे एकच खळबळ उडाली आहे.



या मुलीचे नाव संध्या पाठक असे होते. ती २१ वर्षांची असून ती साठ्ये महाविद्यालयात तिसऱ्या वर्षाला शिकत होती. आज सकाळी संध्याचा मृतदेह आढळून आला. त्यानंतर साठ्ये कॉलेजमध्ये एकच खळबळ उडाली. संध्या पाठक हिने आत्महत्या केली किंवा ती पडली, याबाबत अद्याप थोडासा संभ्रम आहे. महाविद्यालय प्रशासनाने संध्याच्या कुटुंबीयांना ती तिसऱ्या मजल्यावरुन पडली आणि तिचा मृत्यू झाला, असे सांगितले. मात्र, हा आत्महत्येचा प्रकार असल्याची चर्चा साठ्ये कॉलेजमध्ये रंगली आहे. संध्या पाठक हिने आत्महत्येचे टोकाचे पाऊल का उचलले, याचा तपास सध्या विलेपार्ले पोलिसांकडून सुरू आहे. प्राथमिक माहितीनुसार, संध्या पाठक ही साठ्ये महाविद्यालयात अभियांत्रिकीच्या तिसऱ्या वर्षाला शिकत होती. या घटनेनंतर पोलिसांनी महाविद्यालयातील सीसीटीव्ही फुटेज तपासले. त्यामध्ये संध्या कॉलेजच्या इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावरील कॉरिडोअरमधून चालत जाताना दिसत आहे. संध्या पाठक ही तिसऱ्या मजल्यावरुन खाली पडल्यानंतर तिला तातडीने बाबासाहेब गावडे चॅरिटेबल ट्रस्ट रुग्णालयात नेण्यात आले. मात्र, उपचारापूर्वीच तिचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी जाहीर केले. साठ्ये महाविद्यालयाने संध्याच्या कुटुंबीयांनी ती इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावरुन पडल्याचे सांगितले. तिने आत्महत्या केली असावी, अशी प्राथमिक शक्यता आहे. मात्र, संध्याच्या कुटुंबीयांनी याबाबत संशय व्यक्त केला आहे. तिला कोणीतरी ढकलेले असावे, असे संध्याच्या कुटुंबीयांचे म्हणणे आहे. त्यामुळे आता पोलीस तपासात काय समोर येणार, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.

## आता खोमेनेईचा खात्मा करणारच -नेतन्याहू

### हॉस्पिटलवरील हल्ल्यानंतर इस्त्रायलचे खुले चॅलेंज

**तेल विव, दि. १९ वृत्तसंस्था**

इराणने इस्त्रायलच्या हॉस्पिटलवर मिसाईल हल्ला केल्यानंतर इस्त्रायली संरक्षण मंत्री यांनी तेहरानवर नव्या पद्धतीने हल्ला करण्याची घोषणा केली आहे. त्याशिवाय इराणचे सुप्रीम लीडर अयातुल्ला अली खोमेनेई यांनाही संपवण्याचा उघड इशारा त्यांनी दिला आहे. याआधीही इस्त्रायली पंतप्रधान नेतन्याहू यांनी इराणला हल्ल्याची किंमत चुकवावी लागेल असा कठोर इशारा दिला होता.

इस्त्रायलचे संरक्षण मंत्री कॅट्ज म्हणाले की, दक्षिणी इस्त्रायलच्या सोरोका हॉस्पिटलवर बॅलेस्टिक मिसाईलने हल्ला झाला आहे. या हल्ल्यासाठी इराणचे नेते अली खोमेनेई यांना वॉर क्राईमसाठी जबाबदार ठरवले आहे. हा हुकुमशाह एका बंकरखाली बसला आहे. जाणुनबुजून इराण इस्त्रायलमधील हॉस्पिटल आणि नागरी वस्त्यांना टार्गेट करत आहे. हे खूप वाईट वॉर क्राइम आहे. याची शिक्षा खोमेनेई यांना मिळायला हवी असं त्यांनी म्हटलं.



त्याशिवाय पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांनीही आयडीएफला इराणमधील महत्त्वाची ठिकाणे, तेहरानमधील सरकार संबंधित वास्तूंवर आणखी जास्त हल्ले करण्याचे निर्देश दिले आहेत. इस्त्रायलला वाढणारा धोका तात्काळ संपवावा आणि खोमेनेई सरकार अस्थिर करावे अशा सूचना इस्त्रायली पंतप्रधानांनी दिल्याचे संरक्षणमंत्र्यांनी म्हटलं आहे. संरक्षणमंत्र्यांच्या आधी इस्त्रायलचे पंतप्रधान नेतन्याहू यांनीही खोमेनेई सरकारला इशारा दिला आहे. इस्त्रायलमध्ये नागरी वस्त्यांवर आणि हॉस्पिटल हल्ल्याला चोख प्रत्युत्तर देण्याची शपथ त्यांनी घेतली आहे. दरम्यान, इस्त्रायलने इराणमधील अण्वस्त्र आणि मिसाईल प्रोग्रामला टार्गेट केले आहे. हे ना केवळ आमच्यासाठी तर जगासाठीही धोकादायक होते. मात्र इराण इस्त्रायली हॉस्पिटल, नागरी वस्त्यांमध्ये लहान मुले यांच्यावर हल्ले करत आहे. इराण आणि इस्त्रायल यांच्यात नैतिकता समानता नाही. इस्त्रायल त्या लोकांचा खात्मा करण्यासाठी मागे हटणार नाही जे इस्त्रायल आणि अमेरिकेला मारण्याची घोषणा करतात असंही नेतन्याहू यांनी म्हटले आहे.

# महाराष्ट्र-कर्नाटक सीमावादासाठी उच्चाधिकार समितीची पुनर्रचना

## मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली 18 सदस्यांची नव्याने नियुक्ती

**मुंबई, दि. १९ : प्रतिनिधी**

महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नासंदर्भातील धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी राज्य शासनाने उच्चाधिकार समितीची नव्याने पुनर्रचना केली आहे. या समितीच्या अध्यक्षपदी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस असतील, तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) सर्वेसर्वा शरद पवार यांचा ही या समितीत समावेश करण्यात आला आहे. सर्वपक्षीय आणि सर्वसमावेशक अशी ही समिती तयार केली असून, सीमावादासंदर्भात राजकीय आणि प्रशासकीय पातळीवर समन्वय ठेवण्यासाठी तिचे कार्य महत्त्वाचे राहणार आहे.

नव्या सरकारच्या स्थापनेनंतर उच्चाधिकार समितीची पुनर्रचना करण्यात आली आहे. महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्न सोडविण्यासाठी समिती कार्यरत असणार आहे. या समितीच्या माध्यमातून सीमावादातील न्यायालयीन लढाई, सीमाभागातील विकासाचे प्रश्न तसेच कन्नड भाषिक राज्यातील मराठी भाषिकांचे हक्क व सुरक्षा यासारख्या मुद्द्यांवर सुसंगत आणि सशक्त धोरण राबवले जाणार आहे.

**पुनर्रचित उच्चाधिकार समिती**

एक मुख्यमंत्री आणि दोन मुख्यमंत्र्यांसह राज्यसभा सदस्य शरद पवार, लोकसभेचे नारायण राणे, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, उच्च व तंत्र शिक्षण आणि समिती समन्वयक मंत्री चंद्रकांत पाटील, पर्यटन मंत्री व समिती समन्वय शंभूराज देसाई, मंत्री प्रकाश आबिटकर यांच्यासह आमदार जयंत पाटील, सुरेश खाडे, सुधीर गाडगीळ, सचिन शेट्टी, रोहित पाटील, राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष राजेश क्षीरसागर, विधान परिषदेचे विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांचा समितीत समावेश केला आहे.

# हिंदी सक्तीमागे फडणवीस- राज ठाकरेंची मिलीभगत काँग्रेसचे नेते नाना पटोले यांचा आरोप

**मुंबई, दि. १९ : प्रतिनिधी**

राज्यात सध्या अनेत ज्वलंत प्रश्न असताना त्याकडे दुर्लक्ष व्हावे यासाठी हिंदी भाषेचा वाद जाणीवपूर्वक उकरून काढण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या भेटीनंतरच हिंदी भाषेचा शासन निर्णय कशा आला?असा सवाल करत, या षडयंत्रामागे फडणवीस आणि राज ठाकरे यांची मिलीभगत असल्याचा गंभीर आरोप काँग्रेसचे नेते नाना पटोले यांनी गुरुवारी केला.

अवकाळी पावसाने शेतकऱ्याच्या पिकाचे अतोनात नुकसान झाले आहे. शेतकरी कर्जमाफीची मागणी केली जात आहे. लाडक्या बहिणींना २१०० रुपये देण्याची मागणी होत आहे. बेरोजगारी आणि महागाई प्रचंड आहे. जनतेत सरकारविरोधात प्रचंड रोष आहे. यासाठी हिंदी भाषेचा वाद जाणीवपूर्वक बाहेर काढण्यात आला . यामागे राजकारण असून फडणवीस आणि राज ठाकरे या दोघांनाही विद्यार्थी, शिक्षण आणि भाषा याबद्दल काहीही देणेघेणे नाही. मुंबई महानगरपालिकेसह



राज्यातील महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद निवडणुका कधीही होऊ शकतात. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हा वाद चव्हाट्यावर आणून या दोघांनाही यातून राजकीय पोळी भाजायची आहे,अशी टीका नाना पटोले यांनी केली.

मराठी भाषा, संस्कृती जपलीच पाहिजे. पहिलीपासून विद्यार्थ्यांवर हिंदीचे ओझे नसावेच, याबाबत दुमत नाही. पण हिंदी भाषेचा वाद हा शैक्षणिक मुद्दा न करता त्याला राजकीय स्वरुप देण्यात आले आहे. सरकारने काही दिवसांपूर्वी पहिलीपासून हिंदी अनिवार्य करणार नाही , असे सांगितले. पण मुख्यमंत्र्यांनी राज ठाकरेंची भेट घेताच वादग्रस्त शासन निर्णय कसा निघाला ? आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये मतविभाजन करून त्याचा फायदा भाजप आणि मनसेला व्हावा हा यामागे हेतू आहे. मी मारल्यासारखे करतो तू रडल्यासारखे कर असा हा प्रकार आहे, असेही पटोले म्हणाले.

# महाराष्ट्र-गुजरात पुराभिलेखांमध्ये ऐतिहासिक करार होणार सयाजीराव गायकवाड यांच्या कार्याचा दस्तऐवजीकृत इतिहास नव्या पिढीसमोर

**मुंबई, दि. १९ : प्रतिनिधी**

बडोदा संस्थानाचे महानायक महाराज सयाजीराव गायकवाड आणि त्यांचे महाराष्ट्राशी असलेले जिव्हाळ्याचे नाते अधिक दृढ करण्यासाठी एक ऐतिहासिक पाऊल उचलण्यात येणार आहे. महाराष्ट्र व गुजरात राज्य पुराभिलेख संचालनालयांदरम्यान सामंजस्य करार (MoU) करण्यात येणार आहे, अशी घोषणा सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी आज मंत्रालयात घेतलेल्या बैठकीत केली.

**रहिमतपूर ते बडोदा – ऐतिहासिक नाते पुन्हा उजळणार**

सयाजीराव गायकवाड यांना घडवणाऱ्या त्यांच्या मातोश्री महाराणी जमनाबाई गायकवाड यांचे माहेर सातारा जिल्ह्यातील रहिमतपूर येथे होते. प्रतिकूल परिस्थितीतही आदर्श राज्य व राजा घडवणाऱ्या या जमनाबाई राणीसाहेबांचे स्मारक व परिसराचे सुशोभीकरण करावे, अशी मागणी करण्यात आली आहे. त्यासंदर्भातील आराखडा सादर करण्याचे निर्देशही मंत्री शेलार यांनी यावेळी दिले.

**दोन राज्यांतील पुराभिलेखांची देवाणघेवाण**

महाराष्ट्र आणि गुजरात या दोन राज्यांमधील पुराभिलेखांचे आदानप्रदान करणे गरजेचे असल्याचे मत मंत्री शेलार यांनी व्यक्त केले. बडोदा संस्थानाच्या ऐतिहासिक दस्तऐवजांमधून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि राजकीय इतिहासाशी संबंधित महत्त्वपूर्ण बाबी समोर येऊ शकतात. त्यामुळे, गुजरात राज्य पुराभिलेखागार आणि महाराष्ट्र राज्य पुराभिलेख संचालनालय, मुंबई यांच्यात सामंजस्य करार करण्यात यावा, असे स्पष्ट निर्देश त्यांनी दिले.

**इतिहास नव्या पिढीसमोर**

"सयाजीराव गायकवाड यांच्या कार्याचा दस्तऐवजीकृत इतिहास नव्या पिढीसमोर यावा आणि दोन राज्यांतील ऐतिहासिक, सांस्कृतिक संबंध अधिक दृढ व्हावेत, यासाठी हा सामंजस्य करार उपयुक्त ठरेल,"असे मंत्री शेलार यांनी सांगितले.

या महत्त्वपूर्ण निर्णयामुळे महाराणी जमनाबाई यांच्यासारख्या विस्मृतीत गेलेल्या परंतु प्रभावी स्त्री नेतृत्वाची ओळख नव्या पिढीला होणार आहे. तसेच सयाजीराव गायकवाड यांच्यासारख्या प्रबुद्ध आणि लोकहितवादी शासकाच्या कार्याचा अभ्यास शैक्षणिक क्षेत्रात व्यापकपणे करता येणार आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याच्या कामाची विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी केली पाहणी

**मुंबई, दि. १९ : प्रतिनिधी**

मुंबईतील इंदू मिल येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक तयार होत असून या ठिकाणी ३५० फूट उंच तयार होणारा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा भव्य पुतळा हा सामाजिक न्यायाच्या विचारांना चालना देणारा ठरेल, अशी प्रतिक्रिया पुतळ्याचे सुरू असलेले काम पाहिल्यानंतर महाराष्ट्र विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी दिली.

सुप्रसिद्ध मूर्तिकार पद्मभूषण राम सुतार यांच्या मार्गदर्शनाखाली गाझियाबाद येथे त्यांच्या वर्कशॉपमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयाचे काम जलदगतीने सुरू आहे. उपाध्यक्ष श्री. बनसोडे यांनी पुतळ्याच्या कामाची पाहणी केली, तसेच या प्रकल्पाला गती देण्यासाठी महत्त्वपूर्ण सूचना दिल्या. हा पुतळा तयार झाल्यावर जागतिक किर्तीमान तर ठरेलच सोबतच देशासाठी प्रेरणादायीही ठरेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. राम सुतार यांचे चिरंजीव अनिल सुतार प्रत्यक्ष काम पाहत असून त्यांना येणाऱ्या अडचणी श्री बनसोडे यांनी समजून घेतल्या तसेच त्यावर तातडीने उपाययोजना करण्यात येतील असे आश्वासक आश्वासनही दिले. पुढील आठवड्यात यासंदर्भात मुंबई येथे बैठक आयोजित करून या प्रकल्पाशी संबंधित सर्व विभागाची बैठक आयोजित करण्यात येईल, अशी माहितीही उपाध्यक्ष श्री. बनसोडे यांनी योवळी दिली.

विधानसभेचे उपाध्यक्ष श्री. बनसोडे यांनी पुतळ्याच्या निर्मिती प्रक्रियेची बारकाईने पाहणी केली. १०० फुट उंच पादपीठासह ३५० फूट उंचीच्या या पुतळ्याचे काम सध्या सुरुवातीच्या टप्प्यात आहे. पुतळ्याचा पायाचा भाग (बूट) ६५ फूट लांब आणि ३५ फूट रुंद असून, त्यासाठी सुमारे २० टन धातूचा वापर होणार आहे.

# प्रयोगात्मक कलांच्या अभ्यासासाठी आता शाहीर साबळे संशोधन केंद्र!

## पु.ल. देशपांडे अकादमीत होणार स्थापन; मंत्री आशिष शेलार यांची घोषणा

**मुंबई, दि. १९ : प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील पारंपरिक आणि प्रयोगशील कलांचा अभ्यास व संशोधनासाठी आता समर्पित केंद्र स्थापन होणार आहे. पु.ल. देशपांडे कला अकादमीत लवकरच 'शाहीर साबळे संशोधन केंद्र' सुरु करण्यात येणार असल्याची घोषणा सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी केली.

राज्य सरकारच्या सांस्कृतिक कार्य विभागातर्फे प्रयोगात्मक कलांचा दस्तऐवज तयार करणे, त्यांचे वर्गीकरण आणि सखोल विश्लेषण, या उद्देशाने हे केंद्र सुरू होणार असून, याचा उपयोग पदवी, पदव्युत्तर आणि पीएच. डी. करणाऱ्या विद्यार्थ्यांना संशोधनासाठी होईल, अशी माहिती त्यांनी दिली.

**प्रयोगात्मक कलांना मिळणार अभ्यासाची नवी दिशा**

या संशोधन केंद्राच्या स्थापनेसाठी आज मंत्रालयात सांस्कृतिक विभागाची उच्चस्तरीय बैठक घेण्यात आली. यामध्ये मंत्री शेलार यांनी केंद्राचा आराखडा त्वरीत तयार करण्याचे आदेश दिले.

नाटक, लोककला, संगीत, नृत्य, कीर्तन, पोवाडा, तमाशा, वगनाट्य, दशावतार, भारूड या सर्व पारंपरिक व लोककला प्रकारांचा अभ्यास केंद्रात केला जाणार आहे.

**शाहीर साबळेंच्या योगदानाची दखल**

केंद्राला 'शाहीर साबळे' यांचे नाव देण्यामागची भूमिका स्पष्ट करताना मंत्री शेलार म्हणाले,



"संयुक्त महाराष्ट्र चळवळीपासून ते तमाशा, पोवाडा, लोकगीतांच्या माध्यमातून समाजप्रबोधन करणारे पद्मश्री शाहीर कृष्णराव साबळे यांचे कार्य अविस्मरणीय आहे. त्यांच्या नावाने संशोधन केंद्र उभारणे हा महाराष्ट्र संस्कृतीला अभिवादन आहे."

**कलाविश्वातील अभ्यासक, शासकीय अधिकारी उपस्थित**

या बैठकीस सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक बिभीषण चवरे, लोककला अभ्यासक प्रकाश खांडगे तसेच विभागातील अधिकारी उपस्थित होते.राज्यात अकृषी विद्यापीठांच्या माध्यमातूनही काही प्रयोगात्मक कलांवर कार्य सुरू आहे, त्यांच्यासह संलग्नता ठेवत एकात्म अभ्यासाची मांडणीही करण्यात येणार आहे.

**कलांचं संवर्धन, अभ्यास आणि जागतिक स्तरावर प्रस्तुतीचा मार्ग**

मंत्री शेलार पुढे म्हणाले की, "प्रयोगात्मक कला म्हणजे महाराष्ट्राची ओळख आहे. त्यामागे लोकजीवन, इतिहास आणि संस्कृतीचे दर्शन आहे. या कलांचं वैज्ञानिक पद्धतीने वर्गीकरण, दस्तऐवजीकरण आणि जागतिक स्तरावर परिचय व्हावा, यासाठी हे संशोधन केंद्र क्रांतिकारी ठरणार आहे."

# "अजित दादांना पदाची हाव नाही, बदनाम करण्याचा डाव चाललाय"

## हसन मुश्रीफांचे स्पष्ट शब्दांत उत्तर – जयंत पाटील नाराज, पवारांच्या विधानाने झाली निराशा!

**मुंबई, दि. १९ : प्रतिनिधी**

"सहकार क्षेत्र पारदर्शक ठेवा, बदनामीची संधीच उरू देऊ नका," असा स्पष्ट सल्ला देत वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी अनेक मुद्द्यांवर परखड भूमिका मांडली. माळेगावच्या सहकारी संस्थेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ते बोलत होते. यावेळी त्यांनी अजित पवार, जयंत पाटील, तटकरे, शिवसेना युती आणि राष्ट्रवादीतील दुही यावर थेट भाष्य करत राजकीय वर्तुळात खळबळ उडवून दिली.

**"अजित दादांना पदाची हाव नाही, त्यांनी अनेक पदे सोडलेली आहेत"**

हसन मुश्रीफ म्हणाले, "अजित दादांनी पूर्वी अनेक पदांचा त्याग केला आहे. त्यांना पदासाठी राजकारण करायचं नाही. माळेगावच्या सहकारी निवडणुकीतून देशासमोर आदर्श निर्माण करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. सहकारी संस्था कशा पारदर्शकपणे चालवाव्यात याचा दादा आदर्श देऊ इच्छितात."

**"दादांना बदनाम करण्याचा प्रयत्न सुरू"**

अजित पवारांविरोधात सहकार क्षेत्रात अनेक आरोप केले जात आहेत. यावर प्रतिक्रिया देताना मुश्रीफ म्हणाले, "ही सगळी



बदनामी करण्याची योजना आहे. विधानसभा निवडणुकीत दादांनी एक लाख मताधिक्याने विजय मिळवला होता, हे विसरू नका."

**"शिवसेना युतीवर अजून स्पष्टता नाही, रायगड प्रकरणी तोडगा लवकर"**

शिवसेनेसोबतच्या युतीबाबत विचारले असता, "आम्हाला त्याबद्दल काही माहिती नाही," असे सांगत त्यांनी रायगडच्या पालकमंत्रीपदावरील वादात मुख्यमंत्री लवकरच तोडगा काढतील, असा विश्वास व्यक्त केला."रायगडसारख्या महत्त्वाच्या जिल्ह्यात युतीत एकवाक्यता असायला हवी," असेही त्यांनी नमूद केले.

**"तटकरेंवर आरोप अयोग्य, तीनही पक्षांनी गांभीर्याने घ्यावे"**

प्रविण तटकरेंवर झालेल्या आरोपांबाबत मुश्रीफ म्हणाले, "पूर्वीही आरोप झाले होते, पण युतीतील नेत्यांवर असे आरोप करणे योग्य नाही." त्यांनी शिंदे, फडणवीस आणि अजित पवार या तिन्ही नेत्यांनी याची गांभीर्याने दखल घ्यावी, अशी अपेक्षा व्यक्त केली.

**"जयंत पाटील नाराज, पवारांच्या विधानाने निराशा"**

सध्याच्या राष्ट्रवादीतील तुटलेल्या नात्यांबाबत बोलताना मुश्रीफ म्हणाले, "विधानसभा निवडणुकीनंतर जयंत पाटील नाराज आहेत. त्यांचे मन लागत नाही. आम्ही अनेकदा त्यांना सोबत येण्यास सांगितलं. पण पवार साहेबांच्या नुकत्याच केलेल्या विधानाने अपेक्षा मोडल्या आणि निराशा झाली. दोन्ही राष्ट्रवादी गट एकत्र येतील अशी आशा होती."

**"जयश्री पाटील यांचा प्रवेश म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्थांसाठीचे रणनीतिक पाऊल"**

शेवटी, जयश्री पाटील यांच्या पक्षप्रवेशावर बोलताना त्यांनी सांगितले की, "हा प्रवेश फक्त एक राजकीय घटना नाही, तर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल आहे."

हसन मुश्रीफ यांची ही स्पष्टवक्तेपणा आणि राजकीय समीकरणांवरची भाष्ये आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मोठ्या घडामोडींचे संकेत देत आहेत.

"दोषारोपांच्या चिखलात फसण्यापेक्षा सहकार क्षेत्रात पारदर्शकतेचा आदर्श निर्माण करा", असा संदेश त्यांनी दिला आहे.

# उत्तराखंड येथील हेलिकॉप्टर अपघाताची चौकशी करण्याची मागणी अर्जुन गुप्ता यांचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना पत्र



**मुंबई, दि. १९ : प्रतिनिधी**

मागील आठवड्यात उत्तराखंड राज्यांमध्ये झालेले हेलिकॉप्टर अपघाताची उच्चस्तरीय चौकशी करावी अशी मागणी करणारे पत्र देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी संरक्षण मंत्री राजनाथ सिंग व उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर धामी यांना पाठवलेल्या पत्रातून केली आहे

या पत्रामध्ये अर्जुन गुप्ता यांनी जे दोषी आढळतील त्यांच्यावर कठोरात कठोर कारवाई करावी अशी मागणी या पत्रातून उत्तर भारतीय मोर्चा भाजपा उपाध्यक्ष अर्जुन गुप्ता यांनी केली आहे.

# वर्धापनदिनी 'उबाठा' गटाला जोरदार धक्का मुंबई, ठाणे, गोव्यातून अनेक पदाधिकारी शिवसेनेत दाखल

**मुंबई, दि. १९ : प्रतिनिधी**

शिवसेनेच्या वर्धापन दिनीच 'उबाठा' गटाला मोठा हादरा बसला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत मुंबईतील तीन माजी नगरसेवक, ठाणे आणि गोवा राज्यातील प्रमुख पदाधिकाऱ्यांनी आज शिंदे गटात प्रवेश केला. यामुळे वर्धापन दिनाच्या दिवशीच शिवसेनेला राजकीय ताकदीचा मोठा बूस्टर मिळाला आहे.

आज ठाण्यातील मातोश्री स्व. गंगूबाई संभाजी शिंदे सभागृहात पार पडलेल्या पक्षप्रवेश सोहळ्यात उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या उपस्थितीत मोठ्या संख्येने पदाधिकारी आणि कार्यकर्ते शिवसेनेत दाखल झाले. आमदार दिलीप लांडे, शिवसेना सचिव राम



रेपाळे यांचीही यावेळी उपस्थिती होती.

उबाठा गटाचे माजी विभागप्रमुख अजित भंडारी, शाखाप्रमुख संजय जंगम, माजी नगरसेवक विजेंद्र शिंदे (प्रभाग क्र.१६१) यांनी थेट शिंदे गटात प्रवेश करत उबाठा गटाला घरातच धक्का दिला. त्याचप्रमाणे राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) च्या नगरसेविका नादिया शेख, युवासेना सचिव मोहसीन शेख यांनीही शिवसेनेत प्रवेश केला.

गोवा राज्यातील उबाठा गटाचे माजी राज्यप्रमुख उपेंद्र गावकर, काँग्रेसचे माजी महासचिव काशिनाथ मयेकर, पाच तालुकाप्रमुख, एक शहरप्रमुख, विभागप्रमुख आणि कार्यकर्त्यांनी शिवसेनेचा धनुष्यबाण स्वीकारत शक्तिप्रदर्शन केलं. ठाण्यातील रामचंद्रनगर शाखेतील उपविभागप्रमुख मोहन चव्हाण, विजय काते, विजय पवार, महादेव कदम, प्रविण बामणे यांच्यासह अनेक उपशाखाप्रमुख, गटप्रमुखांनी देखील पक्षप्रवेश केला.

**"तुमच्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही" उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे**

शिवसेनेत नव्याने दाखल झालेल्या कार्यकर्त्यांना संबोधित करताना उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, "तुम्ही दाखवलेला विश्वास आम्ही सार्थ ठरवू. तुमच्या प्रभागातील विकासकामांना निधी कमी पडू देणार नाही. आमची शिवसेना ही 'जनतेची सेना' आहे."

या राजकीय घडामोडींमुळे, शिवसेना (शिंदे गट) पुन्हा एकदा मुंबई, ठाणे आणि गोवा परिसरात ताकद वाढवत असून, उबाठा गटासाठी हा धक्का धोक्याचा इशारा मानला जात आहे. आगामी महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हा पक्षप्रवेश 'गेमचेंजर' ठरण्याची शक्यता राजकीय वर्तुळात व्यक्त होत आहे.


**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग**
**निविदा सूचना**

खालील कामाच्या निविदा कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, २ रा माळा, बांधकाम भयन, २५ मर्झबान रोड, फोर्ट मुंबई ४०० ००१ दूरध्वनी क्रमांक २२०१६९७५ हे खालील कामासाठी सा.बां. विभागात योग्य वर्गात नोंदणीकृत ठेकेदारांकडून मागवित आहेत. ब-१ कोऱ्या निविदेचा नमुना, कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई यांचे कार्यालयातून दिनांक २०.६.२०२५ ते ३०.६.२०२५ पर्यंत देण्यांत येईल, कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई हे भरून पाठविलेल्या सिलबंद निविदा दिनांक १.७.२०२५ पूर्वी / त्यादिवशी दुपारी २.०० वाजेपर्यंत स्विकारतील आणि शक्यतो त्याच दिवशी उघडतील.

| अ. क्र. | कामांचे नांव | अंदाजित किंमत (रु. लाखांत) | इसारा रक्कम (रुपये) | काम पूर्ण करण्याची कालमर्यादा | निविदेचा नमूना प्रकार | कोऱ्या निविदा नमुन्याची किंमत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | एल. टी. मार्ग मुंबई येथील सीपी ऑफिस जुनी इमारत येथे तळमजल्यावरील पॅसेज, एसीपी शिट व इतर कामे करणे. | ८,३२,१६९/- | ८,४००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| २ | आमदार निवास मुंबई येथील१ मजल्यावरील विविध रूमची दुरूस्ती करणे. | ८,४३,६७७/- | ८,५००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ३ | इंस्टीट्युट ऑफ सायन्स इमारत १ मजल्यावरील लॅब नं. ५१, ५२, ५३ येथे ड्रेनेज लाईन, खिडक्या पॉलिश व नुतनीकरण करणे. | ७,२३,०६४/- | ७,३००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ४ | मलबार हिल मुंबई येथील सह्याद्री स्टेट गेस्ट हाऊस विस्तार इमारत येथील प्रेरगो फ्लोरींग, फॉल्स सिलिंग, दरवाजा, खिडक्या दुरूस्ती करणे. | ८,३८,६९६/- | ८,४००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ५ | नविन सिटी सिव्हील कोर्ट इमारत मुंबई येथील कोर्ट नं. ४८, ४६, ५४ येथे फ्लोरींग, खिडक्या दुरूस्ती करणे. | ८,४१,१२२/- | ८,५००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ६ | उच्च न्यायालय मुंबई येथील मुख्य इमारत येथे कोर्ट रूम नं. २९-ए, १ मजल्यावरील विस्तार इमारत कोर्ट रूम, कंट्रोल रूम, कंप्युटर टेबल, सुट रेकॉर्ड डिपार्डमेंट, खुर्चा, हाऊस किपींग, व इतर दुरूस्तीची कामे करणे. | ७,८२,६०७/- | ७,९००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ७ | मंत्रालय मुंबई येथील विस्तार इमारत ५ मजल्यावरील एसीएस एग्रीकल्चर डिपार्टमेंट रूम नं. ५०९-५१२ येथील कॉन्फरन्स हॉल, मिटींग टेबल, स्टोरेज येथे दुरूस्तीची कामे करणे. | ३,६२,८३४/- | ३,७००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ८ | इंस्टीट्युट ऑफ सायन्स इमारत २ मजल्यावरील लॅब नं. ५६ येथे नुतनीकरण करणे. | ७,०९,३५८/- | ७,१००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ९ | मंत्रालय मुंबई येथील मुख्य इमारत ७ मजल्यावरील सेक्रेटरी कॅबीन येथे सिटिंग अरेंजमेंट दुरूस्ती व नुतनीकरण करणे. | ४,६१,०८७/- | ४,७००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| १० | इंस्टीट्यूट ऑफ सायन्स इमारत २ मजल्यावरील लॅब नं. ६७ येथे ॲल्युमिनिअम पार्टीशन व किचन ट्रॉली दुरूस्ती करणे. | ५,५७,३३९/- | ५,६००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| १२ | उच्च न्यायालय मुंबई येथील कंपाऊंड एम. एस वर्क, न्यु फ्लॅग पोस्ट प्रदान करणे. | ४,१९,५४६/- | ४,२००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| १३ | इंस्टीट्यूट ऑफ सायन्स इमारत तळमजल्यावरील महिला व पुरुष प्रसाधनगृह नुतनीकरण करणे. | ७,१६,७६१/- | ७,२००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| १४ | मंत्रालय मुंबई येथील मुख्य व विस्तार इमारत एसीपी पार्टीशन, वॉल पॅनलिंग, स्टोरेज युनिट टेबल इ. दुरुस्तीची कामे करणे. | ८,०६,५९८/- | ८,१००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |

कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई यांचे कार्यालयामध्ये सूचना फलकावार सविस्तर निविदा सूचना पहावयास मिळेल. एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता रद्द ठरविण्याचा अधिकार राखून ठेवला आहे.

**जा.क्र. इशवि/निलि/ ६६३९**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, इलाखा शहर विभाग, २ रा माळा,**
**बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड, फोर्ट,मुंबई ४०० ००१**
**दिनांक : १८/६/२०२५**

प्रत :- उप अभियंता, दक्षिण, पश्चिम, मध्य उप विभाग आणि अधीक्षक आमदार निवास मुंबई यांना माहितीसाठी रवाना.
प्रत :- सुचनाफलक

**सही/-**
**(व्ही. ए. पाटसकर)**
**कार्यकारी अभियंता,**
**इलाखा शहर विभाग, मुंबई.**

**डीजीआयपीआर/आरओसी-२०२५-२६/क्र.-५/सी १२५४**

# नंबर एक'च पक्ष होण्यासाठी 'नंबर दोन'ची गरज?

'देवा शपथ खरं बोलेल, खोटे बोलणार नाही' असे वाक्य न्यायालयात आपण नेहमी ऐकतो. अगदी त्याच पद्धतीने 'मी निष्पाप, निष्ठेने काम करेन, तुमचा आदेश तंतोतंत पाळेन', असा शब्द भारतीय जनता पक्षात प्रचंड विरोधानंतरही प्रवेश 'सुखकर' झालेल्या नाशिक येथील एकेकाळचे शिवसेनेचे (ठाकरे गट) खंदे नेते व माजी नगरसेवक सुधाकर (पंत) बडगुजरांनी भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळेंना दिल्याचे ऐकले. अगदी चार सहा महिन्यापूर्वी विधानसभेच्या पवित्र सभागृहापासून तर ज्यांच्याकडे विरोधकांचे पूर्ण चारित्र्यहनन करण्याची जबाबदारी दिली आहे, असे नारायण राणे यांचे पुत्र नितेश राणे यांनी ज्या बडगुजर यांना 'देशद्रोही' म्हणून हिणवले होते, त्यांनीच या 'देशभक्त' नेत्यास रेड कार्पेट अंथरून त्यांचे स्वागत केले. काळाचा महिमा किती अगाध असतो हे महाराष्ट्रातील जनतेने न्याहाळले. नंबर एकचा पक्ष बनविण्यासाठी नंबर दोनच्या लोकांची काय गरज आहे ? असा प्रश्न आता यापुढे कोणी विचारू नये. यावरून एक लक्षात येते की, उद्या दाऊद ईब्राहीम, टायगर मेमन, याकुब मेमन, इकबाल मिर्ची, छोटा शकील, अबू सालेम, मुस्तफा डोसा, सलीम कुत्ता यातील अनेकांना कालपर्यंत 'देशद्रोही' म्हणून गणले गेले असले, तरी त्यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश करायचा निर्णय घेतलाच, तर कदाचित यातील अनेकांना पक्षात घेऊन बडगुजर यांना जो न्याय दिला, तोच न्याय दिला जाईल असे वाटते. कारण सुधाकर बडगुजर जेव्हा उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेत होते, तेव्हा भाजपने त्यांच्यावर देशद्रोहाचे आरोप केले होते. विरोधकांना बदनाम करण्याची भाजपच्या नेत्यांवर मोठी जबाबदारी आली होती. शिवसेनेच्या नेत्यांना जेवढे बदनाम करता येईल तेवढे करा, त्यांचे संपूर्ण हाल झाल्यानंतर त्यांना पक्षात घ्या आणि शांत बसवा, ही भूमिका भाजपने यशस्वी करून दाखविली. आज बडगुजर आणि कंपनीला पक्षात प्रवेश देऊन स्वागत केलं जात आहे. मतभेद असले की 'देशद्रोही' आणि पक्षात आले की 'देशभक्त' हा प्रकार जनतेला कितीही हास्यास्पद वाटत असला तरी 'पार्टी विथ डिफरंट' असे म्हणणाऱ्या भाजपला त्यात काहीही गैर वाटत नाही. ही नितीमत्तेची नव्हे, तर सत्तेसाठीच्या सोयीची व्याख्या झाली आहे. लोकशाहीमध्ये विरोध सहन न झाल्यावर अशा दुटप्पी वागणुकीने लोकांचा विश्वास डळमळीत होतो. सत्तेसाठी देशद्रोहाचं लेबल लावणं आणि काढणं इतकं सोपं झालंय का? तर होय, खरंच खूपच सोपं झालंय. कारण भाजपमध्ये माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांना आदर्श घोटाळ्यातून बेजार करणाऱ्यांनी पक्षात घेऊन त्यांना खासदार, तर त्यांच्या कन्येला आमदार करून दाखविले. एवढं केल्यावर त्यांचा आवाज थोडा वाढणार आहे. अशी गर्दी करून मांडलिकत्व स्वीकारणाऱ्या अनेक काँग्रेसच्या व विरोधकांच्या नेत्यांना पक्षात आणून थप्पी ला बसविण्याचा प्रयोग भाजपने कमालीचा यशस्वी करून दाखविला आहे. अर्थात असे असले तरी कुणाला सत्तेची मलई द्यायची, याचे देखील काही निकष ठरलेले आहेत. त्यामुळे विरोधकांना धक्का देऊन महायुतीमध्ये आलेल्या अनेकांना मानाचे ताट देण्याचा देखील प्रयोग भाजपने केला आहे. त्यामध्ये एकनाथ शिंदे असतील किंवा अजितदादा पवार असतील, आज ते सत्तेची मलई चाखतच आहे.





उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेतून निलंबित करण्यात आलेले नाशकातील नेते सुधाकर बडगुजर यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला.

मात्र, त्यांच्या प्रवेशापूर्वी भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या वक्तव्याने सर्वांच्या भूवया उंचावल्या होत्या. कारण चंद्रशेखर बावनकुळे यांनी सुधाकर बडगुजर यांच्या पक्षप्रवेशाबद्दल काहीही माहिती नसल्याचं नमूद केलं होतं. मात्र, दुपारी बडगुजर यांच्या पक्षप्रवेशावेळी खुद्द चंद्रशेखर बावनकुळे उपस्थित असल्याचे पाहायला मिळाले अन् बडगुजरांनाही हायसे वाटले असेल.

सुधाकर बडगुजर यांच्या पक्ष प्रवेशासाठी मंत्री गिरीश महाजन यांनी मध्यस्थी केली व महाजनांनी त्यांच्या जीवनातही 'संकटमोचका'ची भूमिका घेतली. बडगुजर यांच्यासह माजी मंत्री बबनराव घोलप, माजी महापौर नयना घोलप, दुसरे माजी महापौर अशोक मुर्तडक यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी मुंबईत भारतीय जनता पार्टीत प्रवेश केला.

स्वतः पंचवीस ते तीस वर्षे आमदार, मुलगाही आमदार, मुलगी महापौर अशी पदे मिळालेल्या बबनराव घोलप यांच्यावर नेमका काय अन्याय झाला हे फक्त त्यांनाच माहिती . परंतु बडगुजर यांचा अपमान झाला हे त्यांना सहन झाले नाही, म्हणून त्यांनी पक्ष सोडला हे ऐकून अनेकांनी कपाळाला हात लावला असेल.

मनसेने मूर्तडकांना महापौर केले अजून त्यांना काय हवे होते ते कुणालाही समजले नाही. परंतु या दोघांच्याही पक्षप्रवेशाला विशेष महत्त्व आले नाही एवढे महत्त्व बडगुजरंच्या पक्षप्रवेशाला आले.

भारतीय जनता पक्षात प्रवेश करताना सुधाकर बडगुजर म्हणाले, आज माझा भाजपात प्रवेश झाला. तो प्रवेश आदराने झाला असा त्यांनी दावा केल्यावर सर्वांनाच आ. सीमाताई हिरे यांनी केलेला तयार डोळ्यासमोर आला असेल.

गिरीशभाऊ संकटमोचक आहेत. आपत्ती आली की ते मार्ग काढतात आणि त्यांनी माझा मार्ग काढला, असे बडगुजर म्हणतात. महाराष्ट्रात सांडपाण्यातून वीज निर्मिती प्रकल्प दिला, तो मुख्यमंत्र्यांनी दिला होता, ते दूरदृष्टीचे नेते आहेत. या वाक्यातून त्यांच्यातील ठेकेदार वेळेवर जागा झाला.

बडगुजर यांचा प्रवेश झाला की करून आणला हा अभ्यासाचा विषय ठरू शकतो. संजय राऊत आणि बडगुजर यांचे सख्य उभ्या महाराष्ट्राला माहित आहे. बडगुजरांचा व्यवसाय तर मोठा आहे




जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९१४२०

व त्यांच्या कथित भागीदारांची बरीच चर्चा होत असते. त्यातच आता तर पुढे कुंभमेळा येतोय. पक्षाचं काय पुढे बघता येईल, पण व्यवसायाचं काय ? त्याला सुरक्षित असे एकच उत्तर भारतीय जनता पक्ष होय.

ठाकरेंकडून हकालपट्टी झाली अन बडगुजर यांचे घोडे गंगेत न्हाले. बडगुजर आणि बबनराव घोलप यांच्या पक्षप्रवेशाने पक्ष मजबूत होईल. अधिक ताकदीनं पुढे जाता येईल. विधानसभा निवडणुकीत दिलेल्या संकल्पाला पूर्ण करण्याचा प्रयत्न होईल, कुठलीही अपेक्षा न ठेवता त्यासाठी त्यांनी पक्षप्रवेश केला, या बावनकुळे यांच्या भाषणाने कार्यकर्ते मनापासून हसले असतील.

कारण त्यांचे भाषण म्हणजे पूर्ण विनोदाने भरलेले वाटत होते. नितेश राणे यांच्या मागणीनुसार व मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने दाऊद इब्राहिमचा सहकारी सुलीम कुत्ता याच्यासमवेत मेजवानी करणाऱ्या सुधाकर बडगुजर यांना अखेर भाजपारुपी जगातील सर्वात पवित्र जेलमध्ये डांबण्यात यश आले.

आपल्याच पक्षाच्या एका आमदार व कॅबिनेट मंत्र्याची म्हणजेच नितेश राणे यांच्या मागणीची अगदी तातडीने दखल घेतल्याबद्दल संकटमोचकांस धन्यवाद दिलेच पाहीजे.

नारायण राणेंना भरल्या ताटावरून उठवल्याचा अपमान नितेश राणेंना विसरावाच लागला. प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे मकाऊ येथे कुटूंबासोबत गेले असताना त्यांचे कसिनो खेळतानाचे फोटो खासदार संजय राऊत यांनी ट्विट केले होते. त्यामुळे चांगलीच खळबळ उडाली होती आणि आरोपांच्या फैरी देखील झाडल्या होत्या.

बडगुजर यांच्या माध्यमातूनच संजय राऊत यांच्यापर्यंत फोटो पोहोचवले असे आरोप त्यावेळी करण्यात आले होते. बडगुजर यांचा भाजप प्रवेशाची चर्चा सुरू असतानाच आमदार सीना हिरे यांनीही हाच मुद्दा उपस्थित केला होता. पण आता पक्षाने बदनामीच्या सर्व 'सीमा' ओलांडून नवा इतिहास निर्माण करायचे ठरविलेच असेल, तर कार्यकर्ते व नेते तरी काय करणार?

■ ■ ■

## भाजपात प्रवेश करताच 'सुधाकर' झाले 'सुधारक'

मी निष्पाप, निष्ठेने काम करेन, तुमचा आदेश तंतोतंत पाळेन, तुम्ही सांगाल ते सर्व काही निमूटपणे ऐकेल. असा सुधाकर बडगुजरांनी बावनकुळेंना शब्द दिल्याची चर्चा संपूर्ण नाशिक जिल्ह्यात होत आहे. विशेष म्हणजे सुधाकर बडगुजर म्हणाले की, आज माझा भाजपात प्रवेश झाला, आदराने ( ?) प्रवेश झाला. त्यामुळे भाजप आणि देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानतो. गिरीशभाऊ 'संकटमोचक' आहेत, आपत्ती आली की ते मार्ग काढतात आणि त्यांनी माझा मार्ग काढला. शिवसेना ठाकरे गटातून हकालपट्टी गेल्यानंतर नाशिकमधील शिवसेना नेते सुधाकर बडगुजर यांनी अखेर भाजपात प्रवेश केला. गेल्या काही दिवसांपासून भाजपमध्ये सुधाकर बडगुजर व त्यांच्या समर्थकांच्या पक्षप्रवेशाने नाराजीचा सूर पाहायला मिळत होता. तर, भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचे मकाऊतील कसिनो बारमधील फोटो बडगुजर यांनीच खासदार संजय राऊतांना पुरवल्याचा आरोप त्यांच्यावर करण्यात झाला होता. त्यामुळे, या पक्षप्रवेशाला चंद्रशेखर बावनकुळे हजर राहतील का नाही असा प्रश्न होता. अखेर, मंत्री गिरीश महाजन यांनी एक 'कॉल' केला अन् प्रॉब्लेम 'सॉल्व्ह' झाला. प्रदेशाध्यक्षांच्या उपस्थितीत बडगुजर यांना भाजप प्रवेश झाल्यानंतर, यापुढे चंद्रशेखर बावनकुळेंचा आदेश तंतोतंत पाळेन, निष्ठेने काम करेन, असे त्यांनी म्हटलं नसतं तरी त्यांना निष्ठा दाखवावीच लागेल, याची त्यांना जाणीव आहेच. आता यापुढील वाटचाल त्यांना गिरीश महाजन या संकटमोचकाच्या मार्गदर्शनाशिवाय करताच येणार नाही हे त्यांना लक्षात घ्यावे लागेल.

## 'मनभेद नव्हते, मतभेद होते'चा जावईशोध

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात विकसित राज्याचा संकल्प झालाय. आम्ही सर्व कोअर ग्रुपचे पदाधिकारी, त्यांच्यासोबत चर्चा केली, तेव्हा सर्वच पदाधिकारी बडगुजर आणि घोलप यांच्या पक्षप्रवेशाने पक्ष मजबूत होईल आणि अधिक ताकदीनं आम्हाला पुढे जाता येईल, असे म्हटले. विधानसभा निवडणुकीत दिलेल्या संकल्पाला पूर्ण करण्याचा प्रयत्न आम्ही करतोय. विकासासाठी भाजपात पक्षप्रवेश होत असतो, कुठलीही अपेक्षा न ठेवता त्यासाठी त्यांनी पक्षप्रवेश केला आहे. स्टेज बनवून आमची इच्छा पक्षप्रवेशाची इच्छा होती. मनभेद नाहीत, मतभेद आहेत ते दूर होईल याचा विश्वास आहे. त्या त्या पक्षात असतो तेव्हा तो वाढवण्यासाठी पुढे जात असतो, कधी शिंतोडे उडवतो. मात्र, आता जबाबदारी आहे की जुन्या नव्यांना घेऊन पुढे जायचं आहे, असेही यावेळी बावनकुळेंनी म्हटलं. तर आज माझा भाजपात प्रवेश झाला, आदराने प्रवेश झाला. त्यामुळे भाजप आणि देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानतो. गिरीशभाऊ संकटमोचक आहेत, आपत्ती आली की ते मार्ग काढतात आणि त्यांनी माझा मार्ग काढला. आपल्यापर्यंत पक्षापर्यंत काय माहिती दिली हे माहिती नाही. मात्र, मी निष्पाप आहे, असे सुधाकर बडगुजर यांनी भाजपचा गमछा गळ्यात घातल्यानंतर वक्तव्य केले. कोरोना काळात मी काम केलं, कोणी बाहेर येत नव्हतं. महाराष्ट्रात जो पहिला प्रकल्प सांडपाण्यातून वीज निर्मितीचा केला, तो मुख्यमंत्र्यांनी दिला होता, ते दूरदृष्टीचे नेते आहेत, असे म्हणत बडगुजर यांनी देवेंद्र फडणवीस यांच्यावर स्तुतीसुमने उधळली. गिरीशभाऊ, बावनकुळे, रविंद्र चव्हाण जे मार्गदर्शन करणार त्याचे आपण पालन करू, निष्ठेने काम करु आणि परिकाष्ठा करु असे बडगुजर सांगत असतांना 'हीच का ती शिवसेनेची मुलुखमैदानी तोफ' असा प्रश्न अनेकांना पडला असेल.

# जीवनात अनुभवावी एकतरी वारी!

अदृश्य भगवंताच्या अस्तित्वाचा एक भक्कम पुरावा म्हणजे पंढरपूर ! वैकुंठभुवनाच्या आधीपासून पंढरपूर अस्तित्वात आले. त्यामुळे पृथ्वीवरील सर्वांत पुरातन तीर्थक्षेत्र म्हणून पंढरपूरचा उल्लेख केला जातो. त्यासंदर्भात एक ओवी आहे,

आधी रचिली पंढरी, नंतर वैकुंठ नगरी।

संत नामदेव महाराजही आपल्या अभंगात सांगतात,

जेव्हा नव्हते चराचर, तेव्हा होते पंढरपूर! पृथ्वीवरील केवळ दोनच तीर्थक्षेत्रे नाश न पावणारी आहेत. एक म्हणजे काशी आणि दुसरे म्हणजे पंढरपूर, कारण या क्षेत्रांचा अविनाशी तत्त्व असा महिमा भगवान शंकर आणि विष्णु यांनी आपल्या अखंड वास्तव्याने कथन केला आहे. काशीमध्ये शंकराचे आणि पंढरपूरमध्ये विष्णूचे स्थूल रूपात अस्तित्व आहे; म्हणूनच प्रत्येक हिंदू इहलोकाची यात्रा संपवण्यापूर्वी एकदा तरी काशीस अथवा पंढरपूरला जावे, अशी इच्छा बाळगून असतो. अशी थोरवी प्राप्त झालेले हे पंढरपूर तीर्थक्षेत्र आहे.



जगन घाणेकर
घाटकोपर, मुंबई.
९६६४५५९७८०

पृथ्वीवरी तीर्थे असती अपार ।
परी पंढरीची सर । एकाही नाही ॥

असा दाखला संत नामदेव महाराज देतात, तर

न करी आळस । जाय पंढरीशी ।
अवघी सुखराशी । तेथे आहे ॥,

असे संत चोखामेळा यांनी म्हटले आहे.

काशीच्या पाच यात्रा, द्वारकेला तीन वेळा जाणे, या दोन्ही यात्रांनी जेवढे पुण्य मिळते, तेवढेच पुण्य एका पंढरपूरच्या वारीने मिळते. सर्व सुखाचे आगर आणि संत मंडळींचे माहेरघर असल्यानेच

अवघी दुमदुमली पंढरी।
भगव्या पताका खांद्यावरी।
तुळशी वृंदावन डोक्यावरी।
भाव भुकेल्यांची ही वारी।,

असे म्हटले जाते.

संत ज्ञानेश्वरांनी वारी या व्रताचा प्रारंभ केला. तेव्हापासून चालू असलेल्या वारीमुळे पंढरपुरातील श्री विठ्ठलाची मूर्ती जागृतावस्थेत आली आहे. वारकरी राम कृष्ण हरी। असे नामसंकीर्तन सतत करत पंढरीस जातात. कलियुगात ईश्वराची कृपा संपादन करणाऱ्या एका व्यक्तीपेक्षा सर्व मिळून जेव्हा कृपा संपादनाचा प्रयत्न करतात, तेव्हा ती समष्टी साधना होते. वारीमध्ये व्यष्टीसह समष्टी साधनाही होते आणि सर्व जिवांच्या उद्धारासाठी विठ्ठलाला पंढरपुरात भूतलावर यावेच लागते.

या तीर्थाचा महिमाच असा आहे. येथील भक्तांच्या तळमळीमुळे विठ्ठलाला पंढरपुरात यावेच लागते. पंढरपूरच्या वारीने आपल्या जीवनात भक्तीचा अखंड झरा पाझरू लागतो. भावभक्तीचे बीज प्रत्येकाच्या अंतर्मनात रुजवणारी ही वारी पृथ्वीच्या अंतापर्यंत अशीच चालू रहाणार आहे.

भक्तांच्या संकटसमयी धावून येण्यासाठी, आपल्या भक्तांची इच्छा पूर्ण करण्यासाठी विठ्ठल पंढरपुरात उभा आहे. देव भावाचा भुकेला आहे, याची प्रचीती घ्यायची असल्यास पंढरपूरला जावे. शिस्तीचे दर्शन हे पालख्यांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणावे लागेल. प्रत्येक दिंडीची रचना ठरलेली आहे. प्रारंभी भगवे ध्वजधारी वारकरी, मग तुळशी-वृंदावन घेतलेल्या महिला, त्यामागे टाळकरी, नंतर विणेकरी अशीच सर्व दिंड्यांची रचना असते.

टाळ वाजवणाऱ्या वारकऱ्यांचा पदन्यासही लयबद्ध असतो. भले टाळकरी-वारकरी शेकडोंच्या संख्येने का असेना! वैयक्तिक जीवनातील अभिनिवेष बाजूला ठेवून ईश्वराच्या नामस्मरणात देहभान विसरायला लावणारा आध्यात्मिक सोहळा म्हणजे पंढरपूरची वारी! श्रीक्षेत्र आळंदी आणि देहू येथून निघणाऱ्या संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज अन् जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या पालख्या म्हणजे महाराष्ट्राचे सांस्कृतिक आणि आध्यात्मिक वैभव!

ऊन-पावसाची तमा न बाळगता भगवी पताका खांद्यावर घेऊन टाळ-मृदुंगाचा गजर करत चालणारे वारकरी म्हणजे भावभक्तीचेच प्रतीक! कोणाच्याही तोंडवळ्यावर चिंता नाही कि मुक्कामाच्या ठिकाणी सोयीसुविधांची अपेक्षा नाही. वारकऱ्यांना प्रतिदिन १० ते २० किलोमीटरचा टप्पा चालत पार करावा लागतो. सकाळी लवकर मार्गस्थ व्हावे लागते. अल्पाहार आणि महाप्रसादही वाटेतच घ्यावा लागतो. सायंकाळी विलंबाने मुक्कामाच्या ठिकाणी पोचल्यानंतर भजन-कीर्तन होऊन दिवसाची समाप्ती होते.

विठुमाऊली तू माऊली जगाची ।
माऊलीच मूर्ती विठ्ठलाची, विठ्ठला मायबापा ॥

असा वारकऱ्यांचा पंढरीच्या विठुरायाप्रती असलेला भाव जगात सुविख्यात आहे. विठ्ठल विठ्ठल, जय हरि विठ्ठल, असे विठ्ठलाला आळवत वारकरी प्रतिवर्षी वारीला जातात आणि परत आल्यावर स्वतःपुरतीच नव्हे, तर परिसरातही विठ्ठलाची उपासना करतात. एरव्ही आरामदायक चारचाकीतून प्रवास करून पंढरपूरला जाणे आणि वारीत सहभागी होऊन माउलीला भेटणे यातील भेद वारकरीच सांगू शकतात. या भेटीला कोणत्याही ऐहिक सुखाची सर नाही. हा आनंद जीवनात एकदा तरी घ्यावा. प्रत्येकाने आयुष्यात एक तरी वारी अनुभवावी.

■ ■ ■

## वाचक लिहितात

### चुकीचा संदेश नको...

झी मराठी या दूरदर्शन वाहिनीवर सायंकाळी साडेसात वाजता पारू आणि रात्री आठ वाजता लक्ष्मी निवास या मालिका दाखवल्या जातात. वटपौर्णिमेच्या निमित्ताने या मालिकेतील अभिनेते वडाच्या झाडाची पूजा करताना आणि वडाला धागा गुंडाळत फेऱ्या मारताना दाखवले आहेत.

पारू या मालिकेमधील आदित्य या अभिनेत्याचे त्यांच्या घरी घरकाम करणाऱ्या पारू या मुलीवर प्रेम आहे. तिच्यावर विषप्रयोग झाल्यामुळे ती इस्पितळात उपचार घेत असते. तिचे प्राण वाचावेत म्हणून आदित्य एका महिलेकडून वडाचे पूजन कसे करायचे? हे जाणून घेतो आणि वटवृक्षाची पूजा करून वटवृक्षाला धागा गुंडाळत फेऱ्या मारताना दाखवला आहे.

तर लक्ष्मी निवास या मालिकेतील सिद्धीराज नावाचा अभिनेता तो प्रेम करत असलेल्या भावना दळवी या मुलीने त्याच्या प्रेमाचा स्वीकार करावा यासाठी वटवृक्षाची पूजा करतो असे दाखवले आहे. खरे तर वटपौर्णिमा हे व्रत सुवासिनी महिलांचे आहे. परंतु धर्मशिक्षणाच्या अभावी आणि पैसे कमावण्याच्या हेतूने मालिकेमधून पुरुष अभिनेते वटपौर्णिमा हा सण साजरा करताना दाखवले आहेत. यामुळे समाजामध्ये चुकीचा संदेश जात आहे. दूरदर्शन मालिकांमध्ये पुरुष वडाचे पूजन करताना पाहून समाजातील अन्य पुरुष अशी चुकीची कृती करू शकतात. जे धर्मामध्ये मान्यच नाही ते दाखवण्याचा अट्टहास मालिकांमधून केला जातो आणि समाज मनावर त्याचा विपरीत परिणाम होतो. कारण जे समोर दिसते सत्य आहे अशी समाजाची देखील चुकीची धारणा होते. त्यामुळे मालिकांमधून जे शास्त्रसंमत नाही ते दाखवू नये असे वाटते.

■ संगिता भोसले

### सेल्फीच्या नादात हरवलेली संवेदनशीलता!

कर्णावतीहून लंडनला निघालेल्या एअर इंडियाच्या विमानाला अपघात झाला. अपघातानंतर घटनास्थळावरील अनेक व्हिडिओ सामाजिक माध्यमांवरून प्रसारित झाले. वृत्तवाहिन्यांवर दाखवण्यात आलेली दृश्ये, इमारतीत घुसलेला विमानाचा पुढील भाग, अनेक ठिकाणी पडलेले विमानाचे भाग, प्रवाशांचे मृतदेह हे बघून मन हेलावून गेले.

या अतिशय दुःखद प्रसंगी अनेकांनी मदतीसाठी पुढाकार घेतल्याचे व्हिडिओही समोर आले. मात्र, काहींच्या असंवेदनशील वागणुकीचे दृश्य पाहून मन सुन्न झाले. एका व्हिडिओमध्ये विमान अपघातात मृत झालेल्या एका महिलेचे शीर पडलेल्या ठिकाणी अनेकांनी घोळका केलेला दिसत होता आणि त्या धडापासून वेगळ्या झालेल्या शिरासोबत ते ह्यसेल्फीह्न घेत होते. ही कृती म्हणजे समाजातील विकृत मनोवृत्ती दर्शवते. दुर्घटनेच्या ठिकाणी अशा प्रकारे ह्यसेल्फीह्न घेण्याचे प्रकार यापूर्वीदेखील घडलेले आहेत. असे का घडले, कारण समाजाची सात्त्विकता कमी होऊन तमोगुण म्हणजे दुष्प्रवृत्ती, स्वार्थभावना, संकुचित वृत्ती, प्रसिद्धीची लालसा वाढत आहे.

आज शालेय शिक्षणात नीतिमत्तेचे धडे दिले जातात, पण त्यांचा संबंध केवळ परीक्षेपुरताच असतो, असे दिसते. म्हणूनच केवळ नैतिक मूल्यांचे शिक्षण पुरेसे नाही, तर त्यासोबतच साधना आणि धर्माचरण शिकवण्याची नितांत आवश्यकता आहे. तेव्हाच इतरांच्या संवेदना, भावना जाणवतील आणि तेव्हाच

सर्वे भवन्तु सुखिनः,
सर्वे सन्तु निरामयाः।
सर्वे भद्राणि पश्यन्तु,
मा कश्चित दुःखभाग्भवेत।

ही भावना समाजात निर्माण होईल.

■ सौ. प्रिया बागडदेव
छिंदवाडा




## या आकाशाचं काय?

कधीकधी एक प्रश्न मन पोखरत राहतो गरीबांचा जीव इतका स्वस्त का असतो?

हा मुलगा केवळ १४-१५ वर्षांचा होता. त्याचं नाव आकाश. त्याची आई हॉस्पिटलबाहेर चहाची टपरी चालवत होती. आकाश तिथे डब्बा द्यायला आला होता आणि सावलीत थोडावेळ झोपी गेला. पण दुर्दैव! एअर इंडियाच्या विमानाचे एक अवशेष त्या रस्त्यावर कोसळले. आगीच्या ज्वाळा त्याच्यापर्यंत पोहोचल्या आणि आकाशने तिथेच शेवटचा श्वास घेतला. विशेष म्हणजे तो न विमानात होता, ना त्या होस्टेलमध्ये. तो रस्त्याच्या कडेला होता. त्याला वाचवायला धावलेली त्याची आई सुद्धा ५०% भाजली आहे आणि ती सध्या रुग्णालयात मृत्यूसोबत लढतेय.

आता प्रश्न असा पडतो.. या कुटुंबासाठी कोण पुढं येणार आहे? सरकार? टाटा? ते एक कोटी देणार का? ज्यावेळी एखाद्याला १ कोटी दिलं जातं, तेव्हा नाचत, टाळ्या वाजवत पोस्ट करणारे आता कुठे आहेत? कुठल्या चॅनेलवर आहे या आकाशची बातमी? नेत्यांचे सिनेमॅटिक शॉट्स दाखवले गेले, भगवद्गीता वाचण्याच्या बातम्या चर्चेत आल्या, पण आकाशसारख्या निर्दोष, गरीब बालकाच्या मृत्यूवर कोण बोलणार?

एका आईचा संसार एका सावलीत संपला. या देशात एक सामान्य गरीब माणूस जर रस्त्यावर शांतपणे डोळे मिटून झोपी गेला, तर त्याचं भविष्य आकाशातुन येणाऱ्या ज्वाळांवर अवलंबून असतं का? हा केवळ अपघात नव्हे, हा एक सामाजिक प्रश्न आहे. गरीबाच्या जीवाला किंमत आहे का? की तो फक्त आकड्यांमध्ये हरवून जातो? आकाशसाठी आवाज उठवूया. त्याच्या आईसाठी न्याय मागूया. तिच्या अश्रूंना वाचा देऊया.... ■ ■



## डायबिटीज रुग्णांसाठी फळ आणि फळांचा रस यापैकी काय आहे जास्त फायदेशीर?

डायबिटीज म्हणजेच मधुमेह असणाऱ्यांनी आपल्या आहारात कोणते अन्नपदार्थ घेणे योग्य आहे आणि कोणते टाळावेत, याचे भान ठेवणे फार गरजेचे असते. कारण चुकीची आहाराची निवड केवळ आरोग्यावरच नव्हे तर थेट रक्तातील साखरेच्या पातळीवरही परिणाम करू शकते. याच पार्श्वभूमीवर सध्या एक मोठा प्रश्न समोर येतो तो म्हणजे फळ खाणं अधिक योग्य की फळांचा रस पिणं?

साधारणतः फळे ही आरोग्यासाठी अत्यंत उपयुक्त मानली जातात कारण त्यामध्ये नैसर्गिक साखर म्हणजेच फ्रुक्टोज, फायबर, विविध प्रकारची जीवनसत्त्वे आणि अँटीऑक्सिडंट्स असतात. फायबरमुळे पचनक्रिया संथ होते, ज्यामुळे साखर शरीरात हळूहळू शोषली जाते. त्यामुळे ब्लड शुगर झपाट्याने वाढत नाही. तसेच फळे खाल्ल्याने पोट भरल्यासारखे वाटते, जे ओव्हरईटिंगपासून रोखते.

**फळांचा रस का नाही योग्य?**

फळांचा रस काढताना त्यातील फायबरचा भाग म्हणजे गूदा आणि साल वेगळे केले जाते. त्यामुळे त्यात फायबर जवळपास शून्य होतो. अशा रसायनशून्य रसामध्ये साखरेची मात्रा खूप जास्त असते आणि ती शरीरात झपाट्याने शोषली जाते, जे ब्लड शुगर वाढवते.

शिवाय, एक गिलास रस बनवण्यासाठी २-३ फळांचा वापर केला जातो, त्यामुळे त्यातील कॅलरी इन्टेक जास्त होतो. ही सर्व कारणं मिळून डायबिटीज असणाऱ्या व्यक्तींसाठी रस हे चांगले पर्याय ठरत नाहीत.

**योग्य फळांची निवड महत्त्वाची**


सर्व फळे डायबिटिक व्यक्तींना फायदेशीर असतीलच असे नाही. ग्लायसेमिक इंडेक्स यावर आधारित फळांची निवड केली पाहिजे. कमी जीआय असलेली फळे म्हणजे, सफरचंद, नाशपती, संत्री, जामुन, कीवी, अमरूद ही फळे हळूहळू साखर रक्तात मिसळतात आणि शुगर नियंत्रणात राहते.

दुसरीकडे, आंबा, केळी, चीकू, द्राक्षे यांसारख्या फळांचा जीआय जास्त असल्यामुळे ती रक्तातील साखर लवकर वाढवू शकतात. म्हणूनच अशा फळांचे प्रमाण नियंत्रित ठेवावे.

साबुत फळ खाणे ही रसाच्या तुलनेत चांगली सवय असली तरी त्याचेही प्रमाण ठरवूनच घेतले पाहिजे. खूप जास्त फळे एकत्र खाल्ल्यास त्यातून मिळणारी साखर एकदम वाढू शकते. त्यामुळे आहारात फळे समाविष्ट करताना पोषणतज्ज्ञांचा सल्ला घेणे उत्तम ठरेल.

■ ■ ■

## अशोकायन



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

### व्यक्तिमत्व

वैचारीक दर्जानुसार
होत असते कृती
कृतीतूनच होते
व्यक्तिमत्वाची
निर्मिती ..

कृती सकारात्मक की
की नकारात्मक
यावर प्रतिबिंब
असतेअवलंबून
म्हणून निर्णय
घ्यावे जपून ..

## फाल्कन २००० जेटसची नागपुरात निर्मिती

### डसॉल्ट एव्हिएशनचा रिलायन्सशी करार

मुंबई, दि. १९ प्रतिनिधी

पॅरिस येथे आयोजित एअर शोदरम्यान, डसॉल्ट एव्हिएशन आणि रिलायन्स एरोस्पेस लि. यांच्यात फाल्कन २००० जेटसच्या निर्मितीसाठी ऐतिहासिक करार झाला असून, फ्रान्सच्या बाहेर अशाप्रकारची ही निर्मिती प्रथमच होणार आहे. ही निर्मिती नागपुरात होणार असल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आनंद व्यक्त केला असून या कराराचे स्वागत केले आहे.

नागपूर, मिहानमध्ये होत असलेल्या या उत्पादनातून भारताच्या हवाई उत्पादन क्षेत्राला मोठी चालना मिळणार असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मेक इन इंडिया धोरणालाही मोठा 'बूस्ट' मिळेल. आत्मनिर्भर भारताच्या दिशेने हे अतिशय महत्त्वपूर्ण पाऊल ठरेल. नागपुरात संरक्षण उत्पादनाच्या दृष्टीने अनेक सुविधा निर्मितीचे काम आम्ही केले. त्यादृष्टीने हा एक माईलस्टोन करार आहे, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

भारतासाठी आणि जागतिक बाजारपेठेसाठी फाल्कन २००० ची संपूर्ण: निर्मिती आता नागपुरात होणार आहे. या करारामुळे अमेरिका, फ्रान्स, कॅनडा आणि ब्राझील या देशांच्या पंक्तीत भारत गेला आहे. नागपुरातील डसॉल्ट रिलायन्स एरोस्पेस (डीआरएएल) हे सेंटर ऑफ एक्सलन्स ठरेल. फाल्कन ८ एक्स आणि ६ एक्सची असेम्ब्ली सुद्धा तेथेच होईल. यामुळे पहिले मेड इन इंडिया फाल्कन २०२८ पर्यंत नागपुरात तयार होईल. २०१७ मध्ये या डसॉल्ट रिलायन्स एरोस्पेस (डीआरएएल) ची स्थापना करण्यात आली होती. आता नव्या उत्पादन सुविधेमुळे हवाई तंत्रज्ञ आणि अभियंते यांना नागपुरात रोजगार उपलब्ध होणार आहे. डसॉल्ट एव्हिएशन ही संरक्षण दलाला लागणाऱ्या राफेलसह, फाल्कनची निर्मिती करणारी जगातील अग्रगण्य कंपनी असून, आतापर्यंत त्यांनी १० हजारावर लष्करी आणि नागरी विमानांची निर्मिती केली आहे. सुमारे ९० देशांना त्याचा पुरवठा केला जातो.

## बेवारस आणि भंगार वाहने तत्काळ निष्कासित करून त्यांची विल्हेवाट लावा -भूषण गगराणी यांचे निर्देश

मुंबई, दि. १९ प्रतिनिधी

मुंबईतील 'नागरिकांची' सुलभता हे बृहन्मुंबई महानगरपालिकेचे प्राधान्य आहे. यामध्ये कोणतीही हयगय किंवा तडजोड होऊ शकत नाही. रस्त्यांच्या कडेला असलेल्या बेवारस आणि निकामी / भंगार वाहनांमुळे नागरिकांच्या सुलभतेत किंवा सुरळीत वाहतुकीमध्ये अडथळा निर्माण होतो. त्यामुळे, या कामासाठी नेमण्यात आलेली बाह्य संस्था आणि प्रशासकीय विभागस्तरावरील प्रशासन यांनी त्यांच्यातील योग्य समन्वय ठेवत रस्त्यांच्या कडेला असलेली बेवारस आणि निकामी / भंगार वाहने तत्काळ निष्कासित करुन त्यांची विल्हेवाट लावावी. 'बेवारस वाहनमुक्त / अडथळामुक्त रस्ते'साठी उत्तम प्रयत्नांसोबतच प्रसंगी कठोर कारवाईसुद्धा करावी, असे निर्देश बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांनी दिले आहेत.



मुंबईतील बेवारस आणि निकामी / भंगार वाहनांविरोधात अधिक तीव्रतेने आणि जलद पद्धतीने कारवाई करण्याच्या उद्देशाने बृहन्मुंबई महानगरपालिकेने प्रशासकीय विभाग (वॉर्ड) स्तरावर मे २०२५ पासून बाह्य संस्था नेमली आहे. संबंधित प्रशासकीय विभाग आणि बाह्य संस्था यांच्याद्वारे यासंदर्भात कारवाई सुरू आहे. सुरू केलेल्या कारवाईचा आढावा, कारवाईदरम्यान येत असलेले अडथळे तथा उपाययोजनांसंदर्भात बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालयात बैठक पार पडली. त्यावेळी गगराणी यांनी हे निर्देश दिले.

महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी पुढे म्हणाले, मुंबईतील नागरिकांना रस्त्यांवरुन सुलभतेने मार्गक्रमण करता यावे, यासाठी महानगरपालिका प्रशासनाकडून विविध प्रयत्न सुरू आहेत. मात्र, रस्त्यांच्या कडेला उभ्या असलेल्या बेवारस आणि निकामी / भंगार वाहनांमुळे खूप अडथळा निर्माण होतो. रस्त्यांवर वाहतुकीसाठी कोणताही अडथळा निर्माण होऊ नये, या उद्देशाने बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाकडून 'बेवारस वाहनमुक्त / अडथळामुक्त रस्ते'साठी पुढाकार घेण्यात येत आहे. बेवारस तथा निकामी / भंगार वाहनांविरोधात प्रशासकीय विभाग स्तरावर कार्यवाही केली जात आहे. मात्र, ही कार्यवाही अधिक तीव्र आणि जलदगतीने होण्यासाठी बाह्य संस्था नेमण्यात आली आहे. संबंधित बाह्य संस्था आणि प्रशासकीय विभागस्तरावरील प्रशासन यांनी आपापसांत योग्य समन्वय ठेवून बेवारस आणि निकामी / भंगार वाहनांचे तत्काळ निष्कासन करावे. तसेच, संबंधित वाहन मालकांवर कारवाई करावी. केवळ दंडात्मक कारवाई करणे, हा प्रशासनाचा उद्देश नसून रस्त्यांवरील अडथळा दूर करण्यास प्राधान्य आहे, असेही गगराणी यांनी स्पष्ट केले.

निकामी / भंगार वाहनांसोबतच इतर प्रकारचे अनधिकृत टाकाऊ / भंगार साहित्यसुद्धा तत्काळ निष्कासित करावे. आवश्यक त्या ठिकाणी कारवाईसाठी पोलिस प्रशासनाचे सहकार्य घेऊन विशेष मोहीम आयोजित करावी. बेवारस व निकामी / भंगार वाहनांविरोधातील कारवाईसंदर्भात पोलिस, कंत्राटदार आणि महानगरपालिका प्रशासन यांच्यातील समन्वयासाठी प्रत्येक प्रशासकीय विभाग स्तरावर समन्वय अधिकाऱ्यांची (नोडल ऑफिसर) नेमणूक करावी, असे निर्देशही गगराणी यांनी यावेळी दिले.

### महत्त्वाच्या बातम्या

## मुंबई लोकलमध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र डबा

मुंबई, दि. १९ प्रतिनिधी

मुंबई लोकलमध्ये दररोज प्रवास करणाऱ्या ५० हजारांपेक्षा अधिक ज्येष्ठ नागरिकांसाठी पश्चिम रेल्वेने आपल्या उपनगरी रेल्वेगाड्यांमध्ये स्वतंत्र डबा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. सध्या प्रत्येक लोकल ट्रेनमध्ये फक्त १४ जागा ज्येष्ठ नागरिकांसाठी राखीव असतात. मात्र, गर्दीच्या वेळेत या जागांपर्यंत पोहोचणे खूपच कठीण होते आणि त्यामुळे अनेक ज्येष्ठांना त्रासदायक स्थितीत प्रवास करावा लागतो. हा प्रश्न लक्षात घेऊन, पश्चिम रेल्वेने प्रत्येक लोकल ट्रेनमधील एक मालवाहू डबा ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र डब्यात रूपांतरित करण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय पश्चिम रेल्वेच्या १०५ नॉन-एसी लोकल रेक्ससाठी लागू होणार आहे, ज्यामध्ये ९० बारा डब्यांच्या आणि १५ पंधरा डब्यांच्या गाड्यांचा समावेश आहे. या नव्याने डिझाइन केलेल्या डब्यांमध्ये १३ बसण्याच्या जागा आणि ९१ उभ्या राहण्यासाठी जागा असतील. मुंबई उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिकेनंतर घेण्यात आला, ज्यामध्ये ज्येष्ठ नागरिकांना होणाऱ्या धोका आणि असुविधेचा मुद्दा मांडण्यात आला होता आणि दिव्यांगांसाठी असलेल्या स्वतंत्र डब्यांप्रमाणेच ज्येष्ठ नागरिकांसाठीही डबा असावा, अशी मागणी करण्यात आली होती.

## जनता दरबारात १० तक्रारींचे निवारण

मुंबई, दि. १९ प्रतिनिधी

'म्हाडा'च्या कोकण मंडळातर्फे मुख्य अधिकारी रेवती गायकर यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी झालेल्या तिसऱ्या जनता दरबार दिनात एकूण १० तक्रार अर्जावर सुनावणी घेण्यात येऊन सर्व तक्रारींचे निवारण करण्यात आले. जनता दरबार दिनात, देखभाल शुल्क समायोजित करणे, विक्री किंमत भरण्यास उशीर झाल्यामुळे आकारण्यात आलेल्या दंडाची रक्कम परत करण्यात यावी, सोसायटी लवकर स्थापन करण्यास परवानगी देण्याबाबत सहकार उपनिबंधकांनी कार्यवाही करावी, म्हाडा वसाहतीतील समस्या सोडवणे आदी अर्ज प्राप्त झाले. मुख्य अधिकारी गायकर यांनी सर्व अर्जदारांचे म्हणणे सहानुभूतीपूर्वक ऐकून घेऊन, अधिकाऱ्यांना तत्काळ योग्य कारवाई करण्याचे निर्देश दिले.

## विविध ॲप्सवरून भुयारी मेट्रोचे तिकीट

मुंबई, दि. १९ प्रतिनिधी

आरे ते वरळी मेट्रो ३ भुयारी मार्गिका आता ओएनडीसी या डिजिटल नेटवर्कशी जोडली गेली आहे. यामुळे प्रवाशांना इझ माय ट्रीप, रेड बस, यात्री, वन तिकीट यांसारख्या ॲप्सवरून क्यूआर कोड तिकीट अगदी सहज खरेदी करता येणार आहे. ओएनडीसी नेटवर्क म्हणजे एक डिजिटल प्लॅटफॉर्म आहे, ज्याद्वारे वेगवेगळ्या ॲप्सशी मेट्रो जोडली जाईल. त्यामुळे वेगळे ॲप डाऊनलोड न करता किंवा तिकिट खिडकीवर न जाता मेट्रो ३ चे तिकीट विकत घेता येऊ शकते. इझ माय ट्रीप, रेड बस, माइल्स ॲण्ड किलोमीटर्स (टेलिग्रामद्वारे), टुमॉक, यात्री, वन तिकीट, हायवे डिलाइट आणि यात्री - सिटी ट्रॅव्हल गाइड अशा ॲप्सवरून आता क्यूआर कोड तिकीट खरेदी करता येईल. मुंबई मेट्रोच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे म्हणाल्या, ही नवी सेवा सुरू करून आम्ही मेट्रो प्रवास अधिक सोपा, जलद आणि डिजिटल करत आहोत. यामुळे प्रवाशांचा वेळ वाचेल आणि भारत डिजिटल बनण्याच्या दिशेने एक पाऊल पुढे जाईल.

## शेतीतील मजुरीविषयक धोरण ठरविण्याबाबत ठोस पावले उचलणार - कृषी मंत्री ॲड. कोकाटे

मुंबई, दि. १९ प्रतिनिधी

शेतीतील उत्पादकता वाढावी तसेच शेतीचा उत्पादन खर्च कमी व्हावा यासाठी शेतीतील मजुरीविषयक धोरण ठरविण्याबाबत शासन ठोस पावले उचलणार आहे. कमी मनुष्यबळात काम करणे, मानवविरहित यंत्राचा वापर करणे, कृषी यांत्रिकीकरणासाठी शासन विविध कृषी यांत्रिकीकरणाच्या योजना राबवत आहे शासन शेतक-यांच्या हितासाठी आलेल्या सर्व सूचनांचा सकारात्मक विचार करून त्यावरती कार्यवाही करेल असे कृषीमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी शासकीय कृषी पुरस्कार प्राप्त शेतकरी संघ महाराष्ट्र राज्यला आश्वासित केले.

मंत्रालयात शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नाविषयक शासकीय कृषी पुरस्कार प्राप्त शेतकरी संघाच्या आयोजित झाली. केली होती. या बैठकीत कृषी मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे बोलत होते. यावेळी कृषी विभागाचे प्रधानसचिव विकासचंद्र रस्तोगी, कृषी आयुक्तालय पुणेचे दूरदृश्यप्रणालीद्वारे कृषी आयुक्त सुरज मांढरे, संचालक रफिक नायकवडी, सुनिल बोरकर, विनयकुमार आवटे, डॉ. के. पी.



मोते, शासकीय कृषी पुरस्कार प्राप्त शेतकरी संघाचे अध्यक्ष ॲड. प्रकाश पाटील, सदस्य बीडचे नाथराव कराड ,परभणीचे सदाशिव थोरात, कोल्हापूरचे सर्जेराव पाटील, साताराचे विश्वंभर बाबर, वाशिमचे रविंद्र गायकवाड, कर्जतचे पांडूरंग डोंगरे, साताराचे राजेद्र गायकवाड, ठाणेच बबन हरणे, नागपूरचे आत्मास्वामी खोपडे, जळगाव प्रविण पाटील-फरकांडे यासह इतर पुरस्कारप्राप्त शेतकरी प्रतिनिधी उपस्थित होते.

कृषी मंत्री ॲड. कोकाटे म्हणाले की, कृषी विषयक समित्यावर शासन निर्णय घेऊन कृषी पुरस्कार प्राप्त शेतकऱ्यांना सदस्य म्हणून घेण्यात येईल. शेतीविषयक कामांसाठी योग्य ते धोरण ठरविण्यात येईल शासनाकडे याबाबत सविस्तर प्रस्ताव सादर करू, पीक विमा योजनेत सुधारणा करणे, कृषी विद्यापीठे व कृषी विज्ञान केंद्र यांना सक्षम करत आहोत. नवीन पिकाचे संशोधन करण्यासाठी शासन नेहमीच प्रोत्साहन देत असते. जमिनीची सुपीकता वाढवून पिकाची उत्पादकता वाढविणे यासाठी नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देण्यात येत आहे. राज्य शासन व केंद्र शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनाबाबत काही सूचना असतील तर त्यावरती जरूर विचार करू. शासन शेतकऱ्यांच्या हितार्थ नक्कीच चांगल्या सूचनांची प्रभावी अंमलबजावणी करेल. नवीन तंत्रज्ञानाच्या वापर करून पिकाची उत्पादकता वाढवणे, कृषी विषयक प्रक्रिया करणाऱ्या प्रकल्पांना ग्रामपंचायतीची कर आकारणी रद्द करणे याबाबत नक्कीच कार्यवाही करू. कृषी पुरस्कार वितरणाच्या कार्यक्रमास शासकीय कृषी पुरस्कार प्राप्त शेतकरी संघाच्या प्रतिनिधीस आमंत्रित करून व्यासपीठावर एका सदस्याला उपस्थित राहण्याची संधी देण्याबाबत शासन कार्यवाही करेल, असेही कृषी मंत्री ॲड. कोकाटे यांनी यावेळी सांगितले.

## दूध भेसळ रोखण्यासाठी लवकरच नवा कायदा

### आरे स्टॉलचे अत्याधुनिकीकरण होणार - मंत्री अतुल सावे

मुंबई, दि. १९ प्रतिनिधी

राज्यात दूध भेसळ रोखण्यासाठी लवकरच नवा कायदा अस्तित्वात येईल, अशी माहिती दुग्धविकास मंत्री अतुल सावे यांनी दिली. मंत्री अतुल सावे यांच्या अध्यक्षतेखाली दुग्धविकास विभागाच्या १५० दिवसांच्या आराखड्याच्या अनुषंगाने मंत्रालयात बैठक घेण्यात आली. यावेळी दुग्धविकास विभागाचे सचिव डॉ. रामास्वामी एन. तसेच विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. महानंदाचे व्यवस्थापकीय संचालक अनिल हातेकर यांच्यासह राज्यातील प्रमुख दूध संघांचे प्रतिनिधी (ऑनलाईन) उपस्थित होते.



या बैठकीत दूध संघाच्या प्रतिनिधींनी अनेक सूचना केल्या. यामध्ये राज्यात दुधाला समान दर, एक राज्य एक ब्रँड, एक जिल्हा एक दूधसंघ तसेच एक गाव एक दूध संस्था स्थापन करण्याची मागणी प्रतिनिधि नी केली. त्यावर सकारात्मक निर्णय घेण्यात येईल असे मंत्री अतुल सावे म्हणाले.

मुंबईतील आरे स्टालचे अत्याधुनिकरण करण्यात येईल अतुल सावे यांनी सांगितले. दूध संकलनासाठी शेतकरी प्रोड्युसर कंपन्याची मदत घेण्याबाबत निर्णय घेतला जाईल. महानंदाद्वारे अधिकाधिक दूध संकलन वाढवण्यासाठी प्रयत्न करण्याची सूचना यावेळी करण्यात आली.

## प्रकल्प रखडवणाऱ्या ८६ विकासकांवर होणार कारवाई

मुंबई, दि. १९ प्रतिनिधी

मुंबईतील रखडलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजना आणि रहिवाशांचे थकीत भाडे लक्षात घेता ८६ प्रकल्पांमधील विकासकांचे अधिकार संपुष्टात येण्याची शक्यता आहे. मुंबई उपनगरचे पालकमंत्री आशिष शेलार यांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या कार्यालयात जाऊन रखडलेल्या प्रकल्पांचा आढावा घेतला. झोपु प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेंद्र कल्याणकर यावेळी उपस्थित होते. २०२२ सालापासून झोपु योजनांमध्ये ८८० कोटी रुपये भाडे थकीत होते. यापैकी ६०० कोटी रुपये भाडे वसूल करण्यात आले. अद्याप २७९ कोटी रुपये थकीत आहेत. भाडे थकवणाऱ्या ८६ विकासकांना नोटीस पाठवून कारवाई करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे संबंधित विकासकांचे अधिकार संपुष्टात येऊन नवीन विकासकांची नियुक्ती केली जाईल. आगाऊ दोन महिन्यांचे ५५२ कोटी रुपये भाडे नव्या विकासकांकडून घेतले जाणार आहे.

## माजी आमदार तुकाराम सुर्वेंचा राष्ट्रवादीत पक्षप्रवेश



मुंबई, दि. १९ प्रतिनिधी

१६ वर्षाच्या प्रदीर्घ कालावधीनंतर सुर्वे तुम्ही माझ्या सोबत येत आहात हा आज माझ्या आयुष्यातील सुवर्णयोग आहे अशा शब्दात राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांनी जाहीर प्रवेशाबद्दल मत व्यक्त केले. १९९५ पासून शिवसेनेचा बालेकिल्ला श्रीवर्धन राहिला होता. त्यावेळी राजकीय संघर्ष होता पण कोणताही मनभेद नव्हता. मी जेव्हा या मतदारसंघात निवडून आलो त्यानंतर परिवर्तन घडून आले. तुमची पक्षाशी निष्ठा राहिली म्हणून मला तिथे कमी मतदान मिळाले अशी कबुलीही सुनिल तटकरे यांनी दिली. तुमच्या धाटणीला बाजुला सारून तुम्ही धर्मनिरपेक्ष विचारांशी बांधील झाला आहात हा श्रीवर्धनच्या राजकीय इतिहासात दिवस उजाडला आहे असेही सुनिल तटकरे म्हणाले.

उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघातील माजी आमदार तुकाराम सुर्वे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांच्या नेतृत्वाखाली आज जाहीर प्रवेश केला. यावेळी उबाठाचे रायगड संपर्कप्रमुख सुजित तांदळेकर, श्रीवर्धन पंचायत समितीचे सभापती बाबुराव चोरगे, कारीवणे गावच्या सरपंच गीता चोरगे, जगन्नाथ चाळके, गणेश निर्मळ, बबन जोशी, मालती पवार, जागृती चाळके, रोशन मोरे यांच्यासह मराठा, कुणबी समाज संघटनेच्या असंख्य पदाधिकाऱ्यांनीही जाहीर प्रवेश केला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे कोषाध्यक्ष आमदार शिवाजीराव गर्जे, अल्पसंख्याक महामंडळाचे अध्यक्ष मुश्ताक अंतुले, राष्ट्रवादी काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते आनंद परांजपे, आमदार इद्रीस नायकवडी, प्रदेश प्रवक्ते संजय तटकरे, युवक प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण, प्रदेश सरचिटणीस लतिफ तांबोळी,सहकोषाध्यक्ष संजय बोरगे, सुभाष केकाणे आदी उपस्थित होते.

## मोफत उच्च शिक्षण योजनेची प्रभावी अंमलबजावणी करा

### उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांचे निर्देश

मुंबई, दि. १९ प्रतिनिधी

शासकीय, अनुदानित, अंशतः अनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालये/तंत्रनिकेतने तसेच सार्वजनिक व शासकीय अभिमत विद्यापीठांमध्ये शिक्षण घेत असलेल्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थिनींना १०० टक्के शिक्षण व परीक्षा शुल्क सवलत दिली जात आहे. या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करावी, एकही मुलगी या योजनेपासून वंचित राहणार नाही, याची सर्व महाविद्यालयांनी गांभिर्याने नोंद घ्यावी असे निर्देश उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिले.

मंत्रालयात मुलींसाठी मोफत उच्च शिक्षण योजनेच्या अंमलबजावणी संदर्भात उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. या बैठकीला उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव बी.वेणूगोपाल रेड्डी, तंत्र शिक्षण संचालक डॉ. विनोद मोहितकर, उच्च शिक्षण संचालक शैलेंद्र देवळाणकर,उपसचिव खोरगडे व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले की, CAP प्रक्रियेद्वारे व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या पात्र विद्यार्थिनींकडून प्रवेशावेळी कोणतेही शुल्क आकारले जाऊ नये,मागील वर्षी संस्थांनी शुल्क आकारले असल्यास, ते परत करण्याचे स्पष्ट निर्देशही श्री.पाटील यांनी यावेळी दिले.

शिष्यवृत्ती रक्कम थेट संस्थेच्या खात्यात आणि परीक्षा शुल्क विद्यार्थिनींच्या आधार संलग्नित खात्यावर जमा केली जाते. तंत्रशिक्षण संचालनालयाने हेल्पलाइन व मदतकक्ष कार्यान्वित केले असून, शुल्क आकारणीविषयीच्या सर्व तक्रारींचे तात्काळ निराकरण करण्यात येत आहे. यासाठी विशेष नोडल अधिकारी नियुक्ती करण्यात येत असल्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितले. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत, दि. १६ जून २०२५ पर्यंत तंत्र शिक्षणकडून १लाख ३ हजार ६१५ मुलींना ७८४.४६ कोटी रुपयांचा थेट लाभ देण्यात आला आहे. याशिवाय, दि. १६ जून २०२५ पर्यंत उच्च शिक्षणकडून १लाख ३२ हजार १८८ अर्ज प्राप्त, त्यापैकी ६१ हजार ५२६ विद्यार्थिनींना ५५.८३ कोटी रक्कम वितरित करण्यात आली असून, उर्वरित अर्जांची पडताळणी अंतिम टप्प्यात आहे. योजनेचा लाभ केवळ पदविका अभ्यासक्रमापुरता मर्यादित नसून, MBA, MCA, M.Pharm यांसारख्या पदव्युत्तर व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्येही विद्यार्थिनींना १०० टक्के शुल्क सवलतीचा लाभ दिला जात असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली.

## मेडिकल कॉलेज प्रवेशाच्या नावाने ४५ लाखांची फसवणूक

मुंबई, दि. १९ प्रतिनिधी

मेडिकल कॉलेजमध्ये प्रवेशाच्या नावाने एका महिलेची ४५ लाखांना फसवणूक करणाऱ्या मेघना संतोष सातपुते या महिलेस अखेर वर्सोवा पोलिसांनी अटक केली. नर्स म्हणून काम करणारी मेघना अंधेरी येथे राहत असल्याचे पोलिसांनी सांगितले. फसवणुकीच्या याच गुन्ह्यात ती सध्या पोलीस कोठडीत आहे. तक्रारदार महिला अंधेरीतील वर्सोवा परिसरात राहात असून तिच्या पतीचे निधन झाले आहे. तिची २३ वर्षांची मुलगी सध्या बंगलोर येथे मेडिकलचे शिक्षण घेत आहे. पाच वर्षांपूर्वी तिने नीटची परीक्षा दिली होती. तिला मेडिकलमध्ये प्रवेश हवा होता. याच दरम्यान तिची मेघनाशी ओळख झाली. तिने सिंधुदुर्गमध्ये एसएसएमपी मेडिकल कॉलेज असून तिथे मुलीला प्रवेश मिळवून देण्याचे आश्वासन देत तिच्याकडून ४५ लाख रुपये घेतले. मात्र तिच्या मुलीला प्रवेश दिला नाही.

## सिकलसेलविरोधात लढा आणखी तीव्र करण्याचे आवाहन

मुंबई, दि. १९ प्रतिनिधी

'सिकलसेल मुक्त भारत' मोहिमेअंतर्गत केंद्र सरकारकडून लाखो कुटुंबांची चाचणी सुरू आहे. पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या प्रत्येक विद्यानि सिकलसेल तपासणी अनिवार्य करावी, असे आवाहन पॅलेसेमिया ॲण्ड सिकलसेल सोसायटी ऑफ इंडियाचे अध्यक्ष डॉ. विंकी रुघवानी यांनी केले. ते म्हणाले, राज्यातील शासकीय वैद्यकीय रुग्णालयांमध्ये गरोदर महिलांची पहिल्या तिमाहीत एचपीएलसी चाचणी केली जाते. दोन्ही पालक वाहक असल्यास १२ आठवड्यात सीव्हीएस चाचणी केली जाते, जेणेकरून रुग्ण बाळ जन्माला येऊ नये. सिकलसेल आता अपंगांच्या यादीत असून रुग्णांना शिक्षणात आरक्षण व दिव्यांग प्रमाणपत्र मिळणार आहे. सिकलसेलचा कायमचा इलाज म्हणजे बोन मॅरो प्रत्यारोपण. लग्नापूर्वी तपासणी करून हा आजार रोखता येतो, असे डॉ. रुघवानी यांनी स्पष्ट केले.

## आदिवासींचा निधी अन्यत्र वळवण्यास विरोध

### आदिवासी आमदारांनी घेतली राज्यपालांची भेट

मुंबई, दि. १९ प्रतिनिधी

अर्थसंकल्पात अनुसूचित जमाती अर्थात आदिवासी समाजाच्या विकासासाठी तरतूद करण्यात आलेला निधी अन्यत्र वळवण्यास आदिवासी आमदारांनी तीव्र विरोध केला आहे. या आमदारांचा रोख मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेकडे आहे. यासंदर्भात सत्ताधारी पक्षाच्या आदिवासी आमदारांनी बुधवारी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांची भेट घेऊन आदिवासी विकास निधी आदिवासींच्या योजनांसाठीच वापरावा, अशी आग्रही मागणी केली.

राज्य सरकारने आपल्या महत्वाकांक्षी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी सामाजिक न्याय आणि आदिवासी विकास विभागाच्या निधीला हात घेतला आहे. त्यानुसार आदिवासी विकास विभागाकडून दर महिन्याला ३३५ कोटी ७० लाख रुपये घेतले जातात. या पार्श्वभूमीवर अन्न औषध प्रशासन नरहरी झिरवाळ यांच्या नेतृत्वाखालील आदिवासी समाजाच्या आमदारांच्या शिष्टमंडळाने आज राजभवनावर जाऊन राज्यपालांची भेट घेतली. त्यावेळी राज्यपालांनी आदिवासी विकासासाठीचा राखीव निधी आदिवासी विकास योजनांसाठीच वापरला जावा. आदिवासींसाठी



असलेल्या आरक्षणाचा लाभ आदिवासींनाच व्हावा, बोगस आदिवासी प्रमाणपत्रधारकांवर कडक कारवाई करावी तसेच पेसा भागांच्या विकासावर विशेष लक्ष देण्यासंदर्भात आपण आग्रही असून न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिनस्त राहून पेसा भागात आदिवासी कर्मचाऱ्यांची पदभरती करण्यासंदर्भात आपण मुख्यमंत्र्यांशी चर्चा करू, असे आश्वासन आमदारांना दिले.

यावेळी पेसा क्षेत्रातील कर्मचाऱ्यांच्या भरती संदर्भात सध्याच्या आदेशातील विसंगती दूर करणे, अवैधरित्या जात प्रमाणपत्र रोखण्यासंदर्भातील कायदा करणे, आदिवासी विद्यापीठाची स्थापना करणे, प्रलंबित वनदावे निकाली काढणे यांसह विविध विषयांवर बैठकीत चर्चा झाली. आदिवासी सल्लागार परिषदेची बैठक वर्षातून किमान दोनदा व्हावी, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

आदिवासी मुले, मुली मुंबई आणि पुण्यात शिक्षणासाठी येतात. त्यांच्या वसतिगृहांसाठी मुंबई, पुण्यातील विद्यापीठ परिसरात जागा उपलब्ध करून दिल्यास आदिवासी विकास विभाग वसतिगृहे बांधून देईल, अशी माहिती आदिवासी विकासमंत्री अशोक उईके यांनी राज्यपालांना दिली. तर राज्यपाल हे राज्यातील आदिवासी भागांचे पालक असल्याने त्यांनी राज्यातील आदिवासी लोकप्रतिनिधी आणि सामाजिक संस्थांच्या प्रतिनिधींची प्रत्येक विधानमंडळाच्या सत्राच्या वेळी बैठक घ्यावी, अशी विनंत झिरवाळ यांनी यावेळी केली.

राज्यपालांना भेटलेल्या शिष्टमंडळात आमदार भीमराव केराम, राजेंद्र गावित, राजू तोडसाम, आमश्या पाडवी, नितीन पवार, हिरामण खोसकर तसेच आदिवासी सामाजिक संघटनाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## राज्यपालांच्या उपस्थितीत लवकरच सर्व कुलगुरुंची सामायिक बैठक होणार

मुंबई, दि. १९ प्रतिनिधी

उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसह राज्यपाल तथा राज्य विद्यापीठांचे कुलपती सी. पी. राधाकृष्णन यांची राजभवन येथे भेट घेऊन विविध विषयांवर चर्चा केली. विद्यापीठांशी संबंधित विविध विषयांवर चर्चा करण्यासाठी आपण लवकरच सर्व पारंपरिक विद्यापीठांची संयुक्त बैठक आयोजित करू तसेच राज्याच्या कृषिमंत्र्यांसह राज्यातील कृषी विद्यापीठांना भेट देऊन तेथील संशोधनाची विस्तृत माहिती घेऊ, असे राज्यपालांनी बैठकीत सांगितले.

या बैठकीत विद्यापीठांमधील शिक्षक व शिक्षकेत्तर पदांवरील भरती, विद्यापीठांमधील वैधानिक पदांची भरती, उच्च व तंत्रशिक्षण विभागाची पहिल्या १०० दिवसांमधील उपलब्धी, शिकाऊ उमेदवारी संलग्न पदवी अभ्यासक्रम, कौशल्य विद्यापीठाशी सहकार्य, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी, विद्यापीठांमधील प्रशासन सुधार, सर्व पदवी अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांसाठी आंतरवासिता आदी विषयांवर चर्चा झाली. उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव बी वेणुगोपाल रेड्डी, राज्यपालांचे सचिव डॉ प्रशांत नारनवरे, उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, तंत्र शिक्षण संचालक डॉ. विनोद मोहितकर, राज्यपालांचे उपसचिव एस. राममूर्ती आदी उपस्थित होते.

## एफआयआर रद्द करण्याची एचडीएफसी बँक सीईओची मागणी

मुंबई, दि. १९ प्रतिनिधी

एचडीएफसी बँकेचे व्यवस्थापकीय संचालक (एमडी) व मुख्य कार्यकारी अधिकारी सशिधर जगदीशन यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करून लीलावती किर्तीलाल मेहता मेडिकल ट्रस्टचे स्थायी ट्रस्टी प्रशांत मेहता यांनी दाखल केलेली एफआयआर रद्द करण्याची विनंती केली आहे. या एफआयआरमध्ये जगदीशन यांच्यावर २.०५ कोटी रुपयांची लाच स्वीकारल्याचा आरोप केला आहे. चेतन मेहता ग्रुपला ट्रस्टवरील "बेकायदेशीर ताबा" कायम ठेवण्यात मदत केल्याचे तक्रारीत म्हटले आहे. जगदीशन यांच्यावतीने ज्येष्ठ वकील अमित देसाई यांनी आरोपांना हास्यास्पद व निराधार असे संबोधले. त्यांनी न्यायालयात सांगितले की, एचडीएफसी बँकेने स्प्लेंडर जेम्स लिमिटेड या मेहता-कंट्रोल असलेल्या कंपनीविरोधात ६५.२२ कोटींच्या कर्जाच्या वसुलीसाठी कारवाई सुरू केल्यानंतरच हा गुन्हा दाखल करण्यात आला. ही कंपनी ट्रस्टच्या एका ट्रस्टीच्या वडिलांची मालकी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. "आता हे लोक लीलावती ट्रस्टच्या नावाखाली आम्हावर दबाव आणण्याचा प्रयत्न करत आहेत, असे देसाई यांनी सांगितले.

## धानाचा साठा करण्यासाठी गोदामांची उभारणी करण्यात येणार

मुंबई, दि. १९ प्रतिनिधी

आदिवासी विकास महामंडळामार्फत आदिवासी उपयोजना क्षेत्रामध्ये आधारभूत खरेदी योजनेंतर्गत धान खरेदी करण्यात येते. आदिवासी क्षेत्रात शेतकऱ्यांकडून खरेदी केलेला धान उघड्यावर राहून पावसाच्या दिवसांत भिजून खराब होऊ नये यासाठी गोदामांची उभारणी करण्यात येणार असून गोदामाच्या उभारणीमुळे हे नुकसान टाळता येणार असल्याचे आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वुईके यांनी सांगितले.

आदिवासी विकास मंत्री डॉ. वुईके यांच्या अध्यक्षतेखाली धान खरेदीच्या तक्रारीच्या अनुषंगाने बैठक घेण्यात आली. या बैठकीस मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या प्रधान सचिव विनिता वेद सिंगल, मुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ.श्रीकर परदेशी, आदिवासी विकास विभागाचे सचिव विजय वाघमारे, आदिवासी विकास विभागाच्या आयुक्त लीना बनसोड तसेच संबंधित विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

आदिवासी विकास मंत्री डॉ. वुईके म्हणाले, महामंडळाद्वारे होणाऱ्या या धान खरेदीमुळे आदिवासी बांधवांना उपजीविकेचे साधन निर्माण होते. धान साठवणुकीसाठी आधुनिक सुविधा उपलब्ध करणे आणि वाहतुकीसाठी वेळेवर नियोजन करणे यासाठी नविन कार्यपद्धती तयार करण्यात यावी. राज्यात धान खरेदी, साठवण आणि वाहतूक प्रक्रियेत येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी महसूल, कृषी, अन्न व नागरी पुरवठा विभाग आणि आदिवासी विकास विभाग यांनी एकत्रित समन्वयाने मानक कार्यप्रणाली तयार करावी. धान खरेदीला सुरुवात करण्यात आली असून शेतकऱ्यांनी एनईएमएल पोर्टलवर नजिकचे धान खरेदी केंद्र निवडून नोंदणी करावी. बोगस कागदपत्रे सादर करून धान खरेदीची रक्कम मिळविण्याचा प्रकार पडताळणीत आढळून आल्याने यासंदर्भात कडक कारवाई करण्यास सुरुवात झाली असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

# अरण्यऋषी!



पद्मश्री सन्मानित, पर्यावरण आणि वन्यजीव लेखक 'अरण्यऋषी' म्हणून ओळखले जाणारे ज्येष्ठ लेखक आणि माजी वनाधिकारी मारुती चितमपल्ली यांचे आज १८ जून रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. ते ९३ वर्षांचे होते. सोलापूरमधील त्यांच्या राहत्या घरी सायंकाळी सात वाजता त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाने भारतीय पर्यावरण आणि साहित्य क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे.

मराठी वन्यजीव अभ्यासक आणि लेखक म्हणून मारुती चितमपल्ली अख्ख्या महाराष्ट्राला परिचीत आहेत . वनाधिकारी म्हणून दीर्घकाळ म्हणजे ३६ वर्षे नोकरी, नोकरीदरम्यान आणि त्यानंतरही ६५ वर्षे जंगलात काढणारे चितमपल्ली यांनी जंगलातील प्राणीजीवन आणि त्याचे बारकावे रेखाटणारे लेखन अतिशय ओघवत्या शैलीत केले. त्यांचे वाचनही प्रचंड होते आणि त्यांना पुस्तकांचीही आवड होती. पक्षीतज्ज्ञ डॉ. सलीम अली, लेखक व्यंकटेश माडगूळकर तसेच प्रसिद्ध चित्रकार ए. ए. आलमेरकर यांच्याशी त्यांचा स्नेह होता.

चितमपल्ली यांचा जन्म ५ नोव्हेंबर १९३२ चा सोलापुरातला. त्यांचे वास्तव्य गुजराथीमिश्रित मराठी बोलणाऱ्यांच्या वाड्यात होते. त्यांचे आजोबा सोलापुरातल्या बुधवार पेठेत राहत. तेथे तेलुगू बोलणाऱ्यांची वस्ती होती. मुस्लिमबहुल वस्तीही जवळच होती. त्यामुळे आई वडील आणि मुले मराठी, गुजराती, तेलुगू आणि उर्दूमिश्रित हिंदी बोलू लागले.

पाचव्या इयत्तेतील स्कॉलरशिपमुळे अकरावीपर्यंत महिना दहा रुपये मिळत असल्याने मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण मोफत झाले. भर तापात परीक्षा देऊनसुद्धा मारुती चितमपल्ली वर्गात पहिल्या नंबराने पास झाले. महाविद्यालयात प्रवेश घेतल्यावर चितमपल्लींनी त्यांची वही मराठीच्या प्राध्यापकांना दाखवली, आणि तिच्यातली एक कथा महाविद्यालयाच्या नियतकालिकात प्रकाशित झाली.

त्यांच्या वडिलांना वाचण्याची आवड तर आईला अरण्यवाटांची. आई, वडील, आत्या, मामा यांच्याबरोबर रानवाटेने चालताचालता मारुती चितमपल्लींना जंगलांबद्दल आकर्षण वाटू लागले. क्षणोक्षणी पडे, उठे, परि बळे उडे बापडी ह्या कवितेतील कारुण्य शाळेत असताना जाणवले, आणि जंगलांतील पक्ष्यांविषयी प्रेम वाटू लागले.

आयुष्यभर हरणाची शिकार करणाऱ्या भीमाचा मृत्यू हरणासारखा तडफडत झाला, ही आईने सांगितलेली गोष्ट आयुष्यभर विसरता येण्यासारखी नव्हती. आईला पशुपक्ष्यांची खूप माहिती होती. चंडोल ऊर्फ माळचिमणी, कोकिळा ऊर्फ कोयाळ, सातबहिणी ऊर्फ बोलांड्या, लावा ऊर्फ भुरगुंज्या अशी कितीतरी नावे चितमपल्लींना आईकडून ऐकायला मिळाली.

हरणाच्या नराला काळवीट आणि लांडग्याच्या मादीला लासी असा नर-मादीतला फरक तिनेच शिकविला. माळढोक हे नाव पहिल्यांदा आईनेच ऐकवले. तिने दिलेले रंगांच्या छटांचे ज्ञान पाखरांच्या आणि फुलपाखरांचे वर्णन करताना मारुती चितमपल्लींच्या उपयोगी पडले.

लिंबामामा हा मारुती चितमपल्लींचा अरण्यविद्येतला दुसरा गुरू. प्राणी, पक्षी, वनस्पती तो न बोलता नजरेने दाखवी. वीण झाल्यानंतर सोडून दिलेली सुगरण पक्षाची घरटी त्यानेच दाखविली. त्याच्याबरोबर रानातून चालताना रुई, धोतरा, निवडुंगाची माजलेली झुडपे आणि बोरी, बाभळी, निंबाची काटेरी झुडपे चुकवत चालावे लागे. त्या झाडाखालून चितमपल्लींनी होल्यांची घरटीही शोधली. फुलपाखरांच्या मागे जात गवतामधील कीटकांचे संगीत ऐकायला ते तिथेच शिकले.

अरण्यवाटेवर आणखी एकाने, (हणमंतामामाने) चितमपल्लींना जंगलाचे न्यारे जग शिकवले, पाखरांची नावे त्यानेच सांगितली. तळ्याकाठी पाखरांची पिसे सापडायची. पारी, पोपटी व उदी रंगाची पिसे पाहून हणमंतामामा पाखरांची नावे सांगायचा. मामा खांद्यावर कुदळ घेऊन उंच वारूळ शोधत चालायचा. या वारुळांना ते टेकराज म्हणत, पण हे वारूळ म्हणजेच सापांचे घर कधी दिसले नाही. हणमंतामामाजवळ सापांविषयी खूप ज्ञान होते. विषारी, बिनविषारी सापांपासून तर सापांच्या जाती ओळखण्यापर्यंत आणि सापांची अंडी असे सारे काही चितमपल्लींना हणमंतामामाकडूनच शिकायला मिळाले.

हणमंतामामांनी चितमपल्लींना वन्यप्राण्यांच्या असंख्य लोककथा सागितल्या, आणि तेच ज्ञान पुढे वनखात्याच्या नोकरीत कामी पडले. मामाची अंधश्रद्धाच चितमपल्लींना पशुपक्ष्यांविषयीच्या संशोधनासाठी कारणीभूत ठरली. काय खरे आणि काय खोटे हे ओळखता येऊ लागले.

मारुती चितमपल्लींचे रानाविषयीचे प्रेम आई, माळकरीण आत्या, लिंबामामा आणि हणमंतमामा यांनी जोपासले. त्यांच्यामुळे त्यांना वन्यजीवशास्त्र उलगडले.

पारंपरिक कॉलेज शिक्षणात अपयशी ठरल्यानंतर मारुती चितमपल्ली यांनी वानिकी महाविद्यालयाची वाट धरली. पुण्यातील विभागीय वनाधिकारी कार्यालयात अर्ज सादर केला. सोलापूरचे राहणारे वनक्षेत्रपाल एम.डी. गाडगीळ यांची पुण्यातील वनसंशोधन केंद्रात भेट घेतली. त्यांनी वनक्षेत्रपालाच्या निवडीसाठी होणारी लेखी परीक्षा, त्याची पूर्वतयारी याविषयी वितमपल्लींना मार्गदर्शन केले.

विद्यापीठ परीक्षेचा निकाल वाईट लागणार होता. तरीही वानिकी महाविद्यालयातील प्रवेशासाठी सर्व परीक्षा गंभीरपणे देण्याचा निर्धार त्यांनी केला. मुलाखतीला कशी उत्तरे द्यायची हे गाडगीळ यांनी सांगितले होते. सोळा मैल चालण्याच्या परीक्षेचा सरावही केला. त्यासाठी आई, मामांसोबत लहानपणी केलेली रानभटकंती उपयोगी ठरली.

एकीकडे विद्यापीठ परीक्षा सुरू असतानाच मुख्य वनसंरक्षकांकडून मुलाखतीकरिता बोलावणे आले. जे. ए. सिंग यांनी त्या वेळी मुलाखत घेतली होती. मुलाखतीत यश मिळाले आणि सोळा मैल चालण्याची परीक्षाही यशस्वीरीत्या पूर्ण केली. त्यामुळे वानिकी महाविद्यालयातील प्रवेशाची निश्चिती मिळाली. अपेक्षित होते तेच झाले आणि वनखात्याकडून अपेक्षित पत्र आले. मारुती चितमपल्लींची कोईमतूरच्या सदर्न फॉरेस्ट रेंजर्स कॉलेज या वानिकी महाविद्यालयात दोन वर्षांच्या प्रशिक्षणासाठी निवड झाली. या वानिकी महाविद्यालयात प्रवेश झाला आणि मारुती चितमपल्ली यांचे आयुष्य एका वेगळ्या वाटेने पुढे जाऊ लागले.

शिस्त काय असते हे त्यांना या महाविद्यालयाने शिकवले. पहाटे उठणे, ठरलेल्या वेळेनुसार सर्व काही करणे सुरू झाले. वानिकी महाविद्यालयात असताना पहिल्यांदा त्यांनी वनातला अभ्यास दौरा केला. जंगलात राहायचे म्हणजे तंबूत, महिनाभर लागणारे सारे सामान सोबत, असे सारे काही कुतूहलमिश्रित होते.

प्रवेश घेताना १६ मैलांची अट जशी कायम होती, तशी मॅरेथॉन रेसमधून महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना १६ मैलांचे अंतर धावत धावत चार तासांत पूर्ण करावे लागे. वनाधिकारी म्हणून तंदुरुस्त आहात की नाही याची ती चाचणी होती. मात्र, पहिल्याच वर्षी मॅरेथान रेसमध्ये धावताना मेंदूतील रक्तस्त्रावामुळे एका सहकाऱ्याचा मृत्यू झाला. भविष्यात वनाधिकाऱ्याला कशा प्रकारच्या संकटांना तोंड द्यावे लागू शकते, याचे दाहक वास्तव मारुती चितमपल्लींनी विद्यार्थिदशेतच अनुभवले.

**वनखात्याची नोकरी**

मारुती चितमपल्लींना वनखात्यातील नोकरीत ज्येष्ठ पक्षितज्ज्ञ डॉ. सलीम अलींचा सहवास खूप काही शिकवून गेला. वनखात्यातील नोकरीच्या निमित्ताने चितमपल्लींनी अनेक ठिकाणचे जंगल पिंजून काढले.

पश्चिम महाराष्ट्रात १५ वर्षे नोकरी केल्यानंतर ते विदर्भात नवेगाव बांधला आले. त्यानंतर नागझिरा, नागपूर, मेळघाट येथली जंगले अनुभवली. मात्र त्यांना नवेगाव बांधचे जंगल अधिक आवडले. शिकारीसाठी येणारे माधवराव पाटील त्यांनी तेथेच भेटले. शिकारीच्या निमित्ताने आपल्या सोबत्यांकडून माधवराव वनविद्या शिकले आणि ही वनविद्या त्यांच्याकडून चितमपल्लींना शिकता आली. मात्र, ही वनविद्या साध्य करायला त्यांना अनेक वर्षे लागली.

**संस्कृतचा अभ्यास**

मारुती चितमपल्ली यांनी परंपरागत पद्धतीने संस्कृत साहित्याचे अध्ययन केले आणि त्यानंतर जर्मन आणि रशियन भाषांचा अभ्यास केला.

रामटेकच्या कालिदास संस्कृत विद्यापीठाच्यावतीने प्राचीन भारतीय साहित्यातील पर्यावरण असा एक प्रमाणपत्र अभ्यासक्रम चालविला जातो. चितमपल्ली यांनी ८४ व्या वर्षी त्या अभ्यासक्रमाला प्रवेश घेतला आणि तो अभ्यासक्रम पूर्णही केला.

--------------

(मारुती चितमपल्ली यांच्यावरील सदर लेखाचा उर्वरीत भाग उद्याच्या अंकात)

■ ■ ■

# शिवसेनेचा इतिहास आणि धडा शिकविण्याची गरज!




बॉम्बे प्रोव्हिन्स, मुंबई प्रांत, मुंबई इलाखा, मुंबई द्विभाषिक राज्य असा प्रवास करीत करीत मुंबई सह संयुक्त महाराष्ट्र व्हावा म्हणून १९५६ साली संयुक्त महाराष्ट्र लढा जोरात उभारण्यात आला. त्यानंतर झालेल्या गोळीबारात एकशे सात बहाद्दरांनी हौतात्म्य पत्करले आणि १ मे १९६० रोजी मुंबई सह संयुक्त महाराष्ट्र अस्तित्वात आला.

मुंबई महाराष्ट्राची राजधानी झाली परंतु बेळगांव, कारवार, निपाणी, भालकी, बिदर सह ८६५ मराठी भाषिक गावे कर्नाटकातच राहिली. मुंबई महाराष्ट्रात आली, राजधानी झाली. परंतु मुंबईत महाराष्ट्र नाही, मुंबईत मराठीला दुय्यम स्थान मिळाले. म्हणून आंतरराष्ट्रीय कीर्तीचे व्यंगचित्रकार बाळासाहेब ठाकरे यांनी १३ ऑगस्ट १९६० रोजी मार्मिक हे जागतिक पातळीवरचे पहिले मराठी व्यंगचित्र साप्ताहिक सुरु केले.

या मधून अमराठी अधिकाऱ्यांची यादी 'वाचा आणि थंड बसा' या शीर्षकाखाली प्रसिद्ध करायला सुरुवात केली. यामुळे मराठी माणसात जागृती निर्माण होऊ लागली.

तीर्थस्वरुप दादा म्हणजे केशव सीताराम उर्फ प्रबोधनकार ठाकरे यांनी बाळासाहेब ठाकरे यांना विचारले की बाळ, पुढे काय करायचं ठरवलंय ? बाळासाहेब म्हणाले, दादा, मराठी तरुणांची संघटना काढायचा विचार आहे. दादा म्हणाले, काढ, संघटना काढ आणि त्या संघटनेला नांव दे 'शिवसेना'. ठरलं.

शिवसेनाप्रमुख श्री बाळासाहेब ठाकरे यांनी १९ जून १९६६ रोजी मराठी माणसाच्या न्याय्य हक्कांसाठी शिवसेना स्थापन केली. ही लढाऊ बाण्याची संघटना आज हीरक महोत्सवाच्या उंबरठ्यावर उभी आहे. अनेक उन्हाळे, पावसाळे या संघटनेने पाहिले असून काटेरी मार्गावरुन यशस्वीपणे वाटचाल सुरु ठेवली आहे. अनेक आले आणि गेले, पण बाळासाहेब ठाकरे यांच्या कडवट शिवसैनिकांच्या जोरावर ही संघटना भरभक्कम पणे भविष्याचा वेध घेण्यासाठी झेपावली आहे.

१९ जून १९६६ पासून शिवसेनेने अनेकांना सोबत घेऊन वाटचाल करतांना परिणामांचा मुलाहिजा बाळगला नाही. यशवंतराव चव्हाण यांनी सनदी अधिकारी स. गो. बर्वे यांना १९६७ साली कॉंग्रेस पक्षात आणून इशान्य मुंबई लोकसभा मतदारसंघात उभे केले. यावेळी बाळासाहेब ठाकरे यांनी कृष्ण मेनन यांच्या विरोधात उभ्या असलेल्या स. गो. बर्वे यांना पाठिंबा दिला.

हे बर्वे कॉंग्रेसचे होते. त्यावेळी 'हटाव लुंगी, बजाव पुंगी' ही घोषणा गाजली होती. दुदैवाने स. गो. बर्वे यांचे निधन झाले आणि मग ताराबाई सप्रे या बर्वे भगिनी कॉंग्रेस तर्फे पोटनिवडणुकीत उभ्या होत्या. बाळासाहेब ठाकरे यांनी त्यांनाही समर्थन दिले होते.

१९६८ साली मुंबई महापालिका निवडणुकीत मधु दंडवते यांच्या प्रजा समाजवादी पक्षाबरोबर बाळासाहेब ठाकरे यांनी युती केली होती. मुस्लिम लीगच्या जी. एम. बनातवाला यांच्या बरोबरही बाळासाहेब ठाकरे यांनी युती केली होती. वरळीला आदित्य ठाकरे यांना आव्हान देणारे मिलिंद देवरा यांचे तीर्थरूप मुरलीभाई देवरा यांना मुंबईच्या महापौरपदी बाळासाहेब ठाकरे यांनी बसविले.

या मुरलीभाईंनी तब्बल २२ वर्षे मुंबई विभागीय कॉंग्रेसचे अध्यक्षपद भूषविले होते. पहिल्या महिला मराठी राष्ट्रपती म्हणून प्रतिभाताई देविसिंह शेखावत पाटील यांना बाळासाहेब ठाकरे यांनी भरभक्कम पणे पाठिंबा दिला होता. या बद्दल शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे आभार मानण्यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख आणि उपमुख्यमंत्री रावसाहेब रामराव (आर आर) पाटील हे दोघे मातोश्रीवर आले होते.

कॉंग्रेसचे चाणक्य समजण्यात येणारे प्रणव कुमार मुखर्जी यांना पाठिंबा देऊन बाळासाहेब ठाकरे यांनी त्यांना राष्ट्रपती पदी निवडून येण्यासाठी बहुमोल योगदान दिले. शरद पवार, जॉर्ज फर्नांडिस आणि बाळासाहेब ठाकरे यांचे शिवतीर्थावर दसरा मेळाव्यात झालेले मार्गदर्शन अजूनही लोक विसरलेले नाहीत.

१३ ऑगस्ट १९६० रोजी मार्मिक या आंतरराष्ट्रीय पातळीवरील पहिल्या मराठी व्यंगचित्र साप्ताहिक चे प्रकाशन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या शुभहस्ते झाले होते. ३० ऑक्टोबर १९६६ रोजी शिवतीर्थावर पहिल्या दसरा मेळाव्यात बॅरिस्टर रामराव आदिक व्यासपीठावर उपस्थित होते. १९८७ साली विलेपार्ले येथील पोटनिवडणुकीत बाळासाहेब ठाकरे यांनी सर्वप्रथम हिंदुत्वाचा मुद्दा घेत डॉ. रमेश प्रभू यांना उभे केले.

त्या विधानसभा पोटनिवडणुकीत भारतीय जनता पक्षाने जनता दलाच्या प्राणलाल व्होरा यांना पाठिंबा दिला होता तर शिवसेनेने हिंदुत्वाचा मुद्दा घेतला असल्याने बजरंग दल आणि विश्व हिंदू परिषद यांनी शिवसेनेच्या डॉ. रमेश प्रभू यांना समर्थन दिले होते. या हिंदुत्वासाठी बाळासाहेब ठाकरे यांचा मतदानाचा अधिकार सहा वर्षे हिरावून घेतला होता तर रमेश प्रभू यांची आमदारकी रद्दबातल ठरवली होती.

जेंव्हा शिवसेना हिंदुत्वाच्या मुद्द्यावर विलेपार्ले पोटनिवडणुकीत विजयी झाली तेंव्हा भारतीय जनता पक्षाचे चाणक्य प्रमोद व्यंकटेश महाजन यांनी शिवसेनेबरोबर युती करण्यासाठी बाळासाहेब ठाकरे यांना साकडे घातले. १९८९ लोकसभा आणि १९९० विधानसभा निवडणुकीत शिवसेना भारतीय जनता पक्ष युती म्हणून दोन्ही पक्ष एकत्र लढले.

१९९० च्या विधानसभा निवडणुकीत मुंबई मधून निवडून आलेल्या शिवसेना भाजप युतीच्या आमदारांविरोधात कॉंग्रेस पक्षाच्या पराभूत उमेदवारांनी मनुभाई वशी आणि मुकेशभाई वशी यांच्या माध्यमातून मुंबई उच्च न्यायालयात निवडणूक याचिका दाखल केल्या.

या निवडणुकीत गिरगांव चौपाटीवर झालेल्या विराट प्रचार सभेत शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी, महाराष्ट्रात राहतो तो मराठी, गुजरातमध्ये राहतो तो गुजराथी, बंगालमध्ये राहतो तो बंगाली या न्यायाने हिंदुस्थानात राहतो तो हिंदू, आमचे हिंदुत्व हे शेंडी जानव्याचे नाही तर आमचे हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व आहे,अशी हिंदुत्वाची व्याख्या ठणकावून सांगितली होती.

गिरगांव चौपाटीवर झालेल्या सभेचे वृत्तांकन दैनिक सामना साठी मी केले होते म्हणून मला वशी यांनी मुंबई उच्च न्यायालयात साक्षीदार म्हणून बोलावले होते. साक्षीदार म्हणून अंबरनाथ येथून मुंबई उच्च न्यायालयात पाच वर्षे चकरा माराव्या लागल्या. बाळासाहेब ठाकरे यांची हिंदुत्वाची व्याख्या मनोहर जोशी यांच्या खटल्यात मनोहर जोशी यांचे वकील जय चिनॉय यांनी माझ्या तोंडून शिताफीने रेकॉर्डवर आणली, एवढेच नव्हे तर ही व्याख्या प्रसिद्ध झालेल्या दैनिक सामनाच्या विविध अंकांचे न्या. सॅम वरियावा यांच्या न्यायालयात सादरीकरण केले.



**योगेश वसंत त्रिवेदी**
**मुंबई.**
**९८९२९३५३२१.**
**(लेखक ज्येष्ठ राजकीय विश्लेषक आहेत)**

याच आधारावर सर्वोच्च न्यायालयात ११ डिसेंबर १९९५ रोजी न्या. जे. एस. वर्मा यांनी मनोहर जोशी यांना हिंदुत्वाच्या खटल्यातून निर्दोष मुक्त केले. ६ डिसेंबर १९९२ रोजी अयोध्येत बाबरी मशीद धराशायी झाल्यावर पत्रकारांनी भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष सुंदरसिंह भंडारी यांना, बाबरी किसने गिरायी?, असे विचारताच त्यांनी काखा वर करीत, नहीं वे बीजेपी के नहीं थे, आरेसेस के नहीं थे, बजरंग दल के नहीं थे, व्हिएचपी के नहीं थे, असे उत्तर दिले. पुन्हा पत्रकारांनी त्यांना विचारता ते म्हणाले, शायद वे शिवसेना के होंगे.

याच वेळी वांद्रे येथून शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी एकच डरकाळी फोडली की, जर माझ्या शिवसैनिकांनी बाबरी उद्ध्वस्त केली असेल तर मला त्यांचा अभिमान आहे.

यावर शिवसेनेचे ठाणे जिल्हाप्रमुख धर्मवीर आनंद दिघे यांनी बाबरी मशीद धराशायी होतांनाची छायाचित्रे असलेली दिनदर्शिका प्रकाशित केली आणि गर्व से कहो हम हिंदू हैं असे ठळकपणे छापले. त्यावर बंदी घालण्यात आली.

यानंतर मुंबई महाराष्ट्रात दंगल पेटली. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि शिवसेनेने तमाम हिंदू आणि मराठी बांधवांना वाचवण्यासाठी ढाल म्हणून संरक्षण दिले. या शिवसेनारुपी रक्षा कवचामुळे प्रभावित होऊन गुजराती बांधवांनी गिरगांव चौपाटी जवळ सभागृहात बाळासाहेब ठाकरे यांना सन्मानित केले आणि हिंदुहृदयसम्राट असे संबोधून गौरव केला. तेंव्हापासून बाळासाहेब ठाकरे यांचे नाव हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे असे रुढ झाले.

५ डिसेंबर १९९१ रोजी छगन भुजबळ १५ आमदारांना घेऊन बाहेर पडले. त्यानंतर गणेश नाईक, नारायण राणे, राज ठाकरे बाहेर पडले. परंतु उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना एकट्या हाताने निवडणूक लढवून आपले अस्तित्व दाखवून देती जाहली.

१७ नोव्हेंबर २०१२ रोजी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या महानिर्वाणानंतर २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने एकहाती ६३ जागा जिंकल्या.

शरद पवारांच्या अदृश्य हाताने देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील भारतीय जनता पक्षाचे अल्पमतातील सरकार वाचविले. पण २२ वर्षे जेवढी बदनामी सहन करावी लागली नाही तेवढी बदनामी २२ दिवसात सहन करावी लागली, असे सांगत देवेंद्र फडणवीस यांनी आपले सरकार पाच वर्षे टिकविण्यासाठी धर्मेंद्र प्रधान आणि चंद्रकांत पाटील यांना मातोश्रीवर पाठवून उद्धव ठाकरे यांच्या पाठिंब्यासाठी साकडे घातले.

उद्धव ठाकरेंनी मोठ्या मनाने देवेंद्र फडणवीस याना पाठिंबा दिला. ५ डिसेंबर २०१४ रोजी सकाळी विरोधीपक्षनेते असलेले एकनाथ संभाजी शिंदे उद्धव ठाकरे यांच्या समर्थनामुळे सायंकाळी मंत्री झाले. २०१९ पर्यंत उद्धव ठाकरे यांच्या पाठिंब्यावर देवेंद्रांचे सरकार टिकले.

१८ फेब्रुवारी २०१९ रोजी अमित शाह मुंबईत आले आणि सॉफिटेल या पंचतारांकित हॉटेलमध्ये उद्धव ठाकरे यांच्या समवेत बंद दाराआड चर्चा केली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे दरवाजाबाहेर बसले होते. ते चर्चेत सहभागी झाले नव्हते.

सॉफिटेल, मातोश्री वरील चर्चेअंती वरळीच्या ब्ल्यू सी हॉटेल मध्ये देवेंद्र फडणवीस यांनी अमित शाह आणि उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या सर्व मागण्या मान्य केल्याची जाहिरात केली.

लोकसभा निवडणूक पार पडली. विधानसभा निवडणुकीत युती म्हणून लढल्यानंतर पन्नास पन्नास टक्के सत्तेच्या जबाबदारी देण्या घेण्याचा करार भारतीय जनता पक्षाने मानला नाही. अखेर शिवसेना, कॉंग्रेस आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस या तीन पक्षांनी महाविकास आघाडी बनविली.

ही महाविकास आघाडी होऊ शकते असे सर्वात आधी भाकित करणारे आज एकनाथ शिंदे यांचे प्रवक्ते बनलेत. दरम्यान २३ नोव्हेंबर २०१९ रोजी सक्काळीच देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांनी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री असा शपथविधी उरकून घेतला. परंतु ८० तासातच अजितदादांनी घूमजाव केले. सर्वात कमी ८० तासांच्या मुख्यमंत्री पदाचा विक्रम देवेंद्र फडणवीस यांच्या नांवे नोंदला गेला.

२८ नोव्हेंबर २०१९ रोजी उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी महाविकास आघाडी सरकारचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. एकनाथ शिंदे यांनी नगरविकास मंत्री म्हणून शपथ घेतली. याच काळात कोरोनाची खतरनाक महामारी फैलावली. स्वतः उद्धव ठाकरे गंभीर आजारातून बाहेर पडले. या काळात उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री म्हणून उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल एक नव्हे दोन नव्हे तर चार चार वेळा राष्ट्रीय पातळीवर वाखाणणी होत होती.

अजित पवार यांना उद्धव ठाकरे यांनी माझे, शिवसेनेचे जे काही असेल ते एकनाथ शिंदे आपणांस सांगतील, असे सांगितले होते. त्याचा पुरेपूर फायदा एकनाथ शिंदे यांनी उचलला. अडीच वर्षे सत्ता उपभोगूनही एकनाथ शिंदे आणि त्यांच्या साथीदारांनी अजित पवार हे निधी उपलब्ध करून देत नाहीत, अशा तक्रारींचा लकडा लावला.

जून २०२२ मध्ये शिवसेना फोडून बाहेर पडले. सुरत, गुवाहाटी, गोवा करीत अमित शाह, देवेंद्र फडणवीस यांच्या साथीने उद्धव ठाकरे यांचे सरकार उलथवीत भारतीय जनता पार्टी बरोबर सरकार बनविले. मुख्यमंत्री असलेल्या देवेंद्र फडणवीस यांच्या पदरी उपमुख्यमंत्री पद आले. त्यांना सरकार बाहेर राहून सरकारवर नियंत्रण ठेवायचे होते. परंतु पक्षश्रेष्ठींनी त्यांचा मनसुबा उधळवून लावला.

----------

(या लेखाचा उर्वरीत भाग उद्याच्या अंकात प्रकाशित केला जाईल.)

■ ■ ■

# बाळ आणि आईचे प्राण वाचविण्यास रक्तदान!

**(१४ ते २० जून : जागतिक रक्तदाता दिवस सप्ताह)**

रक्तदान केल्याने आपल्या शरीरावर कोणताही दुष्परिणाम होत नाही. जे लोक ऐच्छिक रक्तदान करून जीवनदान करतात, त्यांचे आभार मानणे व नवीन लोकांना रक्तदानास प्रवृत्त करणे, असे जागतिक रक्तदाता दिवसाचे प्रमुख उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे. दरवर्षी १४ जून रोजी संपूर्ण जगातील रक्तदात्यांचा सन्मान दिवस म्हणून जागतिक स्तरावर साजरा केला जातो. रक्त संक्रमणासाठी सुरक्षित रक्त व रक्त उत्पादनांची आवश्यकता, राष्ट्रीय आरोग्य यंत्रणेत स्वयंसेवी आणि विनाअनुदानित रक्तदात्यांनी दिलेल्या महत्त्वपूर्ण योगदानाविषयी जागतिक जागरूकता वाढविणे, हाही यामागील हेतू आहे. हा दिवस सरकार आणि राष्ट्रीय आरोग्य अधिकाऱ्यांना आवश्यक संसाधने उपलब्ध करुन देण्यासाठी, स्वेच्छा, मोबदला न मिळालेल्या रक्तदात्यांकडून रक्त संग्रह वाढविण्यासाठी तसेच यंत्रणा व पायाभूत सुविधा तयार करण्यासाठी कृती करण्याची संधी प्रदान करतो.

-----------------

शास्त्राप्रमाणे जीवनदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे. सामान्य व्यक्तीही रक्तदान करून दुसऱ्याचा जीव वाचवू शकते. रक्तदात्यांचे आभार व्यक्त करण्यासाठी सन २००४ पासून जागतिक आरोग्य संघटना १४ जून रोजी जागतिक रक्तदाता दिवस साजरा करते. आजदेखील समाजात रक्तदान करणाऱ्यांची संख्या कमी आहे. त्यामुळे रक्तदात्याला रक्तदानास प्रेरित करण्याच्या अनुषंगाने व नियमित रक्तदात्यांचे आभार व्यक्त करण्यासाठी २००४ पासून जागतिक आरोग्य संघटना हा दिवस साजरा करत असते.

ए-बी-ओ या रक्तगटांचा शोध लावणारे आणि रक्तदान संकल्पनेला अधिक शास्त्रशुद्ध पद्धतीने मांडणारे ऑस्ट्रियाचे शरीरविज्ञानात नोबेल पारितोषिक प्राप्त डॉ. कार्ल लॅन्डस्टेनर यांच्या जन्मदिनानिमित्त हा दिवस जागतिकस्तरावर साजरा केला जातो. डॉ.कार्ल लॅन्डस्टेनर यांचा जन्म दि.१४ जून १८६८ रोजी ऑस्ट्रियात झाला. त्यांचीच आज जयंती जागतिक रक्तदाता दिन म्हणून पाळण्यात येत आहे. हा दिवस सर्वप्रथम सुरू करण्याकरीता दि.१४ जून २००४ रोजी जागतिक आरोग्य संघटना, रेडक्रॉस आणि आंतरराष्ट्रीय रेड क्रॉसेंट सोसायटी ऑफ इंटरनेशनल फेडरेशन यांच्या संयुक्त विद्यमाने प्रयत्न करण्यात आले होते.

स्वेच्छेने व मोबदला न घेता सुरक्षित रक्तदान करण्याच्या गरजेबद्दल जनजागृती व्हावी, या उद्देशाने साजरा करण्यात आला. मे २००५मध्ये डब्ल्यूएचओने एका जागतिक आरोग्य असेंब्लीच्या जागतिक रक्तदाता दिनानिमित्त १९२ सदस्य देशांसह अधिकृतपणे समितीची स्थापना केली. जेणेकरुन जगातील सर्व देशांना रक्तदात्यांच्या बहुमोल कृतीबद्दल आभार मानण्यास आणि लोकांचे जीवन वाचवण्यास प्रवृत्त केले जाईल. हा दिवस साजरा करण्याची उद्दिष्टे लोकांना रक्तदानासाठी प्रोत्साहित करणे आणि त्याच्याशी संबंधित गैरसमज दूर करणे आहे.

अपघातात झालेला अतिरिक्त रक्तस्राव, पॅलेसोमिया, रक्तक्षय, रक्ताचा कर्करोग, प्रसूतिपश्चात रक्तस्राव, शस्त्रक्रिया आणि इतर गंभीर आजारांमधे योग्यवेळी रुग्णाला रक्त मिळाले नाही तर तो रुग्ण दगावण्याची शक्यता असते. अशावेळी एका मानवाचेच रक्त दुसऱ्या मानवाचे प्राण वाचवू शकते. कारण मानवाचे रक्त कोणत्याही कारखान्यात तयार होत नाही व दुसऱ्या कोणत्याही प्राण्याचे रक्त मानवासाठी उपयोगात येऊ शकत नाही. त्यामुळे रक्तदानाला अनन्यसाधारण महत्त्व आहे.

महाराष्ट्र राज्यात रुग्णांसाठी दरवर्षी सुमारे साडेसात लाख बाटल्या रक्त लागते. ही गरज ७० ते ७५ टक्के पर्यायी बदली रक्तदाता किंवा व्यावसायिक रक्तदात्याकडून भागविली जाते. मानवाच्या शरीरामध्ये साडेचार ते पाच लिटर रक्त असते. रक्तदानाच्या वेळी केवळ ३०० मिली रक्त काढले जाते.

प्रत्येक रक्तदानानंतर साधारण ३६ तासांमध्ये शरीरात रक्ताची पातळी पूर्ववत होते. तसेच साधारण २ ते ३ आठवड्यांत रक्तपेशीही पूर्ववत होतात. रक्तदान केल्याने कोणताही त्रास किंवा इजा होत नाही. ब्लड बँकेच्या रेफ्रिजरेटरमध्ये फक्त ४-५ आठवड्यांपर्यंत रक्त सुरक्षित ठेवता येते. रक्तदानामुळे प्रत्येक वर्षी अनेकांना जीवनदान मिळते.

अनेक मोठ्या सर्जरींमध्ये किंवा गंभीर परिस्थितीत रक्तदानामुळे रुग्णाचे प्राण वाचण्यास मदत होते. तसेच गरोदरपणात बाळाचे आणि आईचे प्राण वाचविण्यास रक्तदान महत्त्वाचे कार्य करते. आपल्या भारत देशात १२० कोटी लोकसंख्या असूनही केवळ ७४ लाख ते १ कोटी २० लाख लिटर रक्त संकलित होते. रक्त न मिळण्यामुळे मृत्यूचे प्रमाण देशभरात १५ ते २० टक्के आहे. भारतात केवळ ०.६ टक्के लोक रक्तदान करतात.

रक्तदान हे एखाद्या व्यक्तीने स्वेच्छेने अंगातून रक्त काढून देण्याची क्रिया आहे. असे रक्त रुग्णाच्या शरीरात चढवण्यापूर्वी बायोफार्मास्युटिकल प्रक्रियेद्वारे त्याचे विभाजन केले जाते व संपूर्ण रक्त किंवा रक्ताचा आवश्यक तोच घटक त्याच्या शरीरात इंजेक्ट केला जातो. रक्त संकलन प्रक्रियेत ब्लड बँक- रक्त बँकांचा सहभाग असतो.

बहुतेक रक्तदाते- स्वयंसेवक स्वखुशीने अणि विनामोबदला रक्तदान करतात. काही देशांमध्ये रक्ताचा पुरवठा मर्यादित आहे. कारण देणगीदार फक्त नातेवाईकांसाठी किंवा मित्रांसाठीच रक्त दान करतात. अनेक रक्तदाते रक्तदान एक देणगी म्हणून करतात. परंतु ज्या देशांमध्ये रक्त विकण्याची परवानगी आहे, तिथे रक्तदात्यांना पैसे मिळतात. रक्तदानासाठी काही ठिकाणी कामकाजावरून मोकळा वेळ दिला जातो.

वयाच्या १८ वर्षानंतर ते ६५ वर्षापर्यंत, वजन ४५ किग्रॅच्या वर असल्यास, रक्तातील हिमोग्लोबिनचे प्रमाण कमीत कमी १२.५ ग्रॅम असल्यास, रक्तदाता पूर्णपणे निरोगी असल्यास, अशा निरोगी माणसाला दर ३ महिन्यांनी जवळच्या रक्तपेढीत किंवा कोठेही आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरात रक्तदान करता येते. तर रक्तदात्याने आधीच्या ३ दिवसांत कोणतेही प्रतिजैविक औषध घेतलेले असल्यास, रक्तदात्याला मागील ३ महिन्यात मलेरिया झाला असल्यास, रक्तदात्याला मागील १ वर्षात विषमज्वर, कावीळ किंवा श्वानदंश होऊन त्याने रेबीजची लस घेतली असल्यास, त्याची ६ महिन्यापूर्वी मोठी शस्त्रक्रिया झाली असल्यास, गर्भवती महिला, महिलेला १ वर्षाखालील मूल असल्यास किंवा तिचा ६ महिन्यात गर्भपात झाला असल्यास अशांना रक्तदान करता येत नाही. ब्लड प्रेशर लो किवा हाय असणाऱ्यांनी रक्तदान करताना रक्तदाबाची चाचणी करून पहावी, उपाशी पोटी किवा खाऊन झाल्यावर अर्ध्या तासापर्यंत रक्तदान करू नये. तसेच रक्तदानास इच्छुक असणारास इतरही आजारांची चाचणी करून घ्यावी लागते.

सद्या तर आपल्या देशात वर्षभरच रक्तदान शिबीरे आयोजित करून भरपूर रक्तसंकलन केले जात आहे. सामाजिक, धार्मिक, आध्यात्मिक, सेवाभावी संस्था रक्तदान शिबीरांच्या माध्यमातून संकलीत रक्तसाठा रक्तपेढ्यांकडे सुपूर्द करीत असतात. गरजूंना रक्त वेळेत मिळत नाही. प्रसंगी आर्थिक टंचाईच्या कारणाने गरीबांना प्राणानिशी मुकावे लागत आहे.

मग एवढा संकलीत रक्तसाठा जातो तरी कुठे? रक्ताचा काळा बाजार होत नाही ना? हा संशोधनाचा विषय होऊन बसला आहे. नेहमीच आरोग्य विभागाची बोंब ऐकू येते, की रक्तपेढीत रक्तच उपलब्ध नाही. याकडे आज निक्षून लक्ष घालण्याची गरज असल्याची ओरड गरीब व सर्वसामान्य जनतेतून होणे साहजिकच आहे.



**कृष्णकुमार आनंदी गोविंदा निकोडे**
**गडचिरोली.**
**९४२३७१४८८३**

■ ■ ■



# शेअर बाजार सलग तिसऱ्या दिवशी घसरला
## गुंतवणूकदारांचे 3.7 लाख कोटींचे नुकसान


**निफ्टी पीएसयू बँक, निफ्टी मेटल आणि निफ्टी मीडिया निर्देशांकांमध्ये सर्वाधिक घसरण झाली. आयटी शेअर्समध्येही मोठी घसरण झाली.**

**मुंबई, दि. १९ प्रतिनिधी**

भारतीय शेअर बाजार आज १९ जून रोजी सलग तिसऱ्या दिवशी घसरणीसह बंद झाले. व्यवहाराच्या शेवटी सेन्सेक्स ८२.७९ अंकांनी घसरून ८१,३६१.८७ वर बंद झाला. निफ्टी १८.८० अंकांच्या घसरणीसह २४,७९३.२५ वर बंद झाला. इराण-इस्रायल संघर्ष आणि कमकुवत जागतिक संकेतांमुळे गुंतवणूकदार सावध आहेत. ऑटो वगळता इतर सर्व क्षेत्रीय निर्देशांक बंद झाले.

दुसरीकडे, निफ्टी पीएसयू बँक, निफ्टी मेटल आणि निफ्टी मीडिया निर्देशांकांमध्ये सर्वाधिक घसरण झाली. आयटी शेअर्समध्येही मोठी घसरण झाली. निफ्टी मिडकॅप १०० आणि निफ्टी स्मॉलकॅप १०० निर्देशांक १.५ टक्क्यांहून अधिक घसरले.

बीएसईवर सूचीबद्ध कंपन्यांचे एकूण बाजार भांडवल १९ जून रोजी ४४२.५८



लाख कोटी रुपयांवर घसरले, जे मागील दिवशी म्हणजेच बुधवार, १८ जून रोजी ४४६.२८ लाख कोटी रुपयांवरून होते. सूचीबद्ध कंपन्यांचे बाजार भांडवल आज सुमारे १.७२ लाख कोटी रुपयांनी कमी झाले आहे. दुसऱ्या शब्दांत गुंतवणूकदारांच्या संपत्तीत सुमारे १.७२ लाख कोटी रुपयांची घट झाली आहे.

सेन्सेक्समधील ३० पैकी ११ शेअर्स वाढीसह बंद झाले. यामध्ये, महिंद्रा अँड महिंद्रा च्या शेअर्समध्ये सर्वाधिक १.६९ टक्के वाढ झाली. यानंतर, टायटन, लार्सन अँड टुब्रो (एल अँड टी), भारती एअरटेल आणि मारुती सुझुकीचे शेअर्स ०.४५ टक्के ते ०.७४ टक्क्यांनी वाढून बंद झाले.

सेन्सेक्समधील उर्वरित १९ शेअर्स घसरून बंद झाले. यामध्ये

**सेन्सेक्स 81,144**

**निफ्टी 24,812**

अदानी पोर्ट्सचे शेअर्स २.५९ टक्क्यांनी घसरून सर्वाधिक घसरले. दुसरीकडे, बजाज फायनान्स, टेक महिंद्रा, इंडसइंड बँक आणि नेस्ले इंडिया यांच्या शेअर्समध्ये १.२८ टक्के २.०८ टक्क्यांची घसरण दिसून आली.

जवळजवळ सर्व सेक्टोरल निर्देशांक लाल चिन्हावर बंद झाले. मात्र, त्याच वेळी निफ्टी ऑटो मध्ये ०.५२ टक्क्यांची वाढ दिसून आली आणि निफ्टी इंडिया कंझ्युमर मध्ये ०.०८ टक्क्यांची किरकोळ वाढ झाली.

सर्वाधिक नुकसान निफ्टी पीएसयू बँक ला सहन करावं लागलं, जो २.०४ टक्क्यांनी खाली घसरला. त्यानंतर निफ्टी मीडिया १.९१ टक्के, निफ्टी कॅपिटल मार्केट १.८२ टक्के, निफ्टी रिअल्टी १.६० टक्के, निफ्टी इंडिया डिफेन्स १.५१ टक्के, निफ्टी इंडिया टुरिझम १.२९ टक्के, आणि निफ्टी मेटल मध्येही १.२९ टक्क्यांची घसरण झाली.

# 'ॲक्सिओम'चे प्रक्षेपण पुन्हा लांबणीवर

**नवी दिल्ली, दि. १९ वृत्तसंस्था**

भारतीय अंतराळवीर शुभांशू शुक्ला यांच्यासह अन्य तिघांना घेवून आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाकडे (ISS) झेपावणाऱ्या ॲक्सिओम-४ या अंतराळयानाचे प्रक्षेपण पुन्हा एकदा लांबणीवर पडले आहे. आता या मोहिमेचे प्रक्षेपणाच्या नव्या तारखेसंदर्भात भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्रो)ने माहिती दिली आहे.

'इस्रो'च्या प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, 'ॲक्सिऑम-4' मोहिमेच्या सुधारित प्रक्षेपण तारीख ॲक्सिऑम स्पेस, नासा, स्पेसएक्स आणि भारत, पोलंड व हंगेरीतील तांत्रिक संस्थांमधील सखोल चर्चेनंतर निश्चित करण्यात आली आहे. तसेच प्रक्षेपण मार्गावरील हवामान स्थितींचा सखोल आढावा घेण्यात आला आहे. स्पेसएक्सच्या फाल्कन-९ प्रक्षेपकाची तत्परता, 'ड्रॅगन' अंतराळयानाची कार्यक्षमता, आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावरील झ्वेझ्दा मॉड्यूलमधील दुरुस्ती, प्रक्षेपण मार्गातील हवामान स्थिती तसेच क्वारंटाइनमधील अंतराळवीरांच्या प्रकृती व सज्जतेच्या स्थितीच्या आधारे, ॲक्सिऑम स्पेसने २२ जून २०२५ ही पुढील संभाव्य प्रक्षेपण तारीख असल्याचे कळवले आहे," असे इस्रोने स्पष्ट केले आहे.

ॲक्सिओम 4 मोहिमेत भारत, अमेरिका, पोलंड आणि हंगेरी या देशांचे प्रत्येकी एक अंतराळवीराचा समावेश आहे. या मोहिमेच्या कमांडर आहेत



अंतराळवीर पेगी व्हिट्सन. त्यांनी आतापर्यंत एकूण ६७५ दिवस अंतराळात घालवले असून, ही महिला अंतराळवीरांच्या नावावर एक विक्रमी नोंद ठरली आहे. या महत्त्वाकांक्षी मोहिमेअंतर्गत भारत लवकरच एक ऐतिहासिक कामगिरी करणार आहे. भारताचे शुभांशू शुक्ला आता अंतराळात जाणारे दुसरे भारतीय बनणार आहेत. इतकेच नाही तर ते आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर (ISS) पोहोचणारे पहिले भारतीय असतील. हे अभियान अमेरिकेची अंतराळ मोहीम कंपनी ॲक्सिओम स्पेस आणि नासा यांच्या सहकार्याने राबवले जात आहे. तसेच, एलोन मस्कचे स्पेसएक्स या मोहिमेत महत्त्वाची भूमिका बजावेल.

यापूर्वी 'स्पेसएक्स'ने एक्स पोस्टमध्ये म्टहलं होते की, फाल्कन ९ च्या एक्स-४ इंटरनॅशनल स्पेस स्टेशनकडे (ISS) झेपावणार होते. मात्र ही मोहिम पुढे ढकलण्यात येत आहे. पोस्ट स्टॅटिक फायर बूस्टरच्या तपासणीदरम्यान आढळून आलेल्या ऑक्सिजन गळतीची समस्या आढळून आली आहे. गळतीची दुरुस्ती करण्यासाठी अतिरिक्त वेळ मिळववा म्हणून प्रेक्षपण पुढे ढकलण्यात आले आहे. आता दुरुस्तीनंतर, आम्ही लवकरच नवीन प्रक्षेपण तारीख जाहीर करू, असेही 'स्पेसएक्स'ने स्पष्ट केले आहे. यापूर्वी ॲक्सिओम-४ या अंतराळयानाचे प्रक्षेपण रविवार, ८ जून रोजी होणार होते. मात्र विविध कारणांमुळे ते पुढे ढकलण्यात आले आहे. इस्रोचे अध्यक्ष व्ही. नारायणन यांनी सोमवारी संध्याकाळी जारी केलेल्या निवेदनात म्हटले होते की, आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर ॲक्सिओम-४ मोहिमेचे प्रक्षेपण १० जून ऐवजी ११ जून २०२५ पर्यंत पुढे ढकलण्यात आले होती. मात्र ऑक्सिजन गळतीची समस्येमुळे ही मोहिम स्थगित करण्यात आली होती.

# चारित्र्यावर संशय घेऊन दहा लाखांची मागणी
## नवऱ्यासह चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**केज, दि. १९ प्रतिनिधी**

लग्नानंतर नव्याचे नऊ दिवस संपण्यापूर्वी अवघ्या दहा दिवसांनंतरच एका विवाहितेच्या चारित्र्यावर संशय घेत तिचा शारीरिक आणि मानसिक छळ करून तिला दहा लाखांची मागणी करीत नवविवाहितेची माहेरी रवानगी केली. या बाबतची माहिती अशी की, २९ जून २०२४ रोजी केज तालुक्यातील बनसारोळा येथील शुभांगी हिचे कानडी माळी येथील धरणीधर राऊत यांच्या सोबत हिंदू रितीरिवाजाप्रमाणे लग्न झाले. लग्ना नंतर तिला अवघे आठ दिवस चांगले नांदवले. त्या नंतर ११ जुलै रोजी तिला पुणे येथे नणदेच्या घरी घेऊन गेले. तेथे तिचा नवरा धरणीधर दतु राऊत, नणंद शुभांगी दत्तात्रय म्हेत्रे, नंदावे दत्तात्रय शंकर म्हेत्रे आणि सासरा दतु सखाराम राऊत यांनी तिच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिच्या वडिलाने लग्नात हुंडा दिला नाही. या कारणावरून शिवीगाळ करून मारहाण केली.

तसेच माहेरहून तुझ्या बापाकडून दहा लाख रुपये आणले शिवाय तुला नांदणार नाही, असे म्हणून सतत मानसिक व शारीरिक छळ करून त्रास दिला. एवढ्यावरच हे थांबले नाही तर माहेराहून दहा लाख रुपये घेऊन आल्याशिवाय तुला नांदवणार नाही असे म्हणून घरातून बाहेर काढले.

या प्रकरणी शुभांगी राऊत हिच्या तक्रारीवरून युसुफ वडगाव पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारी वरून तिचा नवरा धरणीधर दतु राऊत, नणंद शुभांगी दत्तात्रय म्हेत्रे, नंदावे दत्तात्रय शंकर म्हेत्रे आणि सासरा दतु सखाराम राऊत यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान अद्यापही एकही आरोपीस पोलिसांनी अटक केली नाही हे विशेष ! युसुफ वडगाव पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहायक पोलिस निरीक्षक मच्छिंद्रनाथ शेंडगे यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलिस कॉन्स्टेबल बेबी गांधले या तपास करीत आहेत.

# इराणमधून 110 विद्यार्थ्यांची पहिली तुकडी भारतात परतली

**नवी दिल्ली, दि. १९ वृत्तसंस्था**

इस्रायल आणि इराणमध्ये सुरू असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर भारत सरकारने तेथे राहणाऱ्या हजारो भारतीयांचे सुरक्षित परत आणण्यासाठी ऑपरेशन सिंधू सुरू केले आहे. इराणमधून आणण्यात येणाऱ्या विद्यार्थ्यांची पहिली तुकडी गुरुवारी सकाळी भारतात पोहोचली. पहिल्या तुकडीत ११० हून अधिक विद्यार्थ्यांचा समावेश आहे. दरम्यान, ४,००० हून अधिक भारतीय नागरिक इराणमध्ये राहत आहेत आणि त्यापैकी निम्मे विद्यार्थी आहेत. उत्तर इराणमधून ११० विद्यार्थ्यांना सुरक्षितपणे आर्मेनियाला आणण्यात आले. दरम्यान, विद्यार्थ्यांनी आणि त्यांच्या कुटुंबियांनी सरकारच्या या कारवाईबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आहे.

इराणमध्ये अडकलेल्या ११० भारतीय नागरिकांना घेऊन जाणारे एक विशेष विमान दिल्ली विमानतळावर उतरले. या लोकांमध्ये यासिर गफ्फार नावाच्या एका विद्यार्थ्याने सांगितले की, आम्ही रात्रीच्या वेळी क्षेपणास्त्रे उडताना पाहिली आणि मोठ्या स्फोटांचे आवाज ऐकू आले. भीतीचे वातावरण होते, पण आता



भारतात पोहोचल्यानंतर आम्हाला दिलासा मिळाला आहे. एका विद्यार्थ्याने सांगितले की, इराणमधील परिस्थिती दररोज बिकट होत चालली आहे, विशेषतः तेहरानमधील परिस्थिती खूप गंभीर आहे. सर्व भारतीय विद्यार्थ्यांना तेथून बाहेर काढले जात आहे. भारतीय अधिकारी चांगले काम करत आहेत. आम्हाला सर्वांना सुरक्षित ठिकाणी पाठवले जात आहे.प्रथम विद्यापीठातून आर्मेनियाला नेण्यात आले, त्यानंतर तेथून त्याला कतारला पाठवण्यात आले. शेवटी तो भारतात पोहोचला.

इस्रायलमधील सुरू असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर, इराणमधील भारतीय दूतावास मोठ्या संख्येने भारतीय नागरिकांना आर्मेनियाची राजधानी येरेवनमध्ये बाहेर काढण्यास मदत करत आहे. इराणमधील भारतीय नागरिकांना तेहरानमधील भारतीय दूतावासाच्या आपत्कालीन हेल्पलाइन आणि नवी दिल्लीतील परराष्ट्र मंत्रालयाने स्थापन केलेल्या २४x७ नियंत्रण कक्षाच्या संपर्कात राहण्याचा सल्ला देण्यात आल्याचे परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले आहे.

# जेजुरी अपघातात नऊ जणांचा मृत्यू
## पंतप्रधान नरेंद्र मोदींनी व्यक्त केला शोक

**जेजुरी, दि. १९ प्रतिनिधी**

जेजुरी मोरगाव रस्त्यावर भरधाव मोटारीने टेम्पोला धडक दिली. या अपघातात नऊ जण ठार झाले आहेत. बुधवारी रात्री उशिरा ही घटना घडली. या अपघातात सहा जण जखमी झाले असून त्यातील चौघांची स्थिती गंभीर आहे. या प्रकरणी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक्स पोस्ट करत शोक व्यक्त केला आहे.

"जेजुरी मोरगाव रस्त्यावर झालेल्या अपघातात नऊ जणांचा जीव गेला. ही घटना दुर्दैवी आहे. माझ्या मनाला यामुळे अतीव वेदना झाला. आपल्या आप्तस्वकीयांना ज्यांनी गमावलं त्यांच्याविषयी माझ्या सहवेदना. जे या अपघातात जखमी झाले त्यांची प्रकृती सुधारावी यासाठी मी प्रार्थना करतो." या आशयाची पोस्ट पंतप्रधान नरेंद्र मोदींनी केलं आहे. तसंच मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी दोन लाखांची मदत जाहीर केली आहे. या अपघातात जे जखमी झाले त्यांना प्रत्येकी ५० हजारांची मदत जाहीर केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जेजुरी-मोरगाव रस्त्यावरील किर्लोस्कर कंपनीजवळ श्रीराम ढाब्याजवळ एक पिकअप टेम्पो थांबला होता. टेम्पोतील सामान खाली उतरवण्याचे काम सुरू होते. दोघे सामान उतरवत होते. यावेळी पुण्याकडून मोरगावकडे निघालेल्या एका भरधाव मोटारीने टेम्पोला धडक दिली. ही धडक एवढी जबरदस्त होती की, शेजारी थांबलेल्या एका दुसऱ्या मोटारीला त्यानंतर धडक बसली. टेम्पोतील सामान उतरविणारे दोघे तसेच, ढाब्यासमोर थांबलेले तिघे आणि मोटारीतील तिघांचा अशा आठ जणांचा जागीच मृत्यू झाला. मृत्युमुखी पडलेल्यांमध्ये दोन लहान मुले, एका महिलेचा समावेश आहे. ढाबाचालक आणि कामगारांनी या घटनेची माहिती पोलिसांना दिली. गंभीर जखमींना तातडीने खासगी रुग्णालयात दाखल केले. मोटारचालकाच्या बेजबाबदारपणामुळे अपघात घडल्याची माहिती पोलिसांनी दिली

# गाडी नंबर १७६०चा धमाकेदार ट्रेलर प्रदर्शित

**सिनेरंग**

मराठी चित्रपटसृष्टीत थ्रिलर, रहस्य आणि विनोदी यांचा मिलाफ असणाऱ्या काही निवडक चित्रपटांमध्ये लवकरच आणखी एका दमदार चित्रपटाची भर पडणार आहे, ती म्हणजे 'गाडी नंबर १७६०'ची. तन्वी फिल्म्स प्रस्तुत आणि योगीराज संजय गायकवाड दिग्दर्शित या आगामी चित्रपटाचा ट्रेलर नुकताच प्रेक्षकांच्या भेटीला आला असून, रहस्य आणि विनोदाने भरलेला हा ट्रेलर सध्या चर्चेचा विषय ठरत आहे. ट्रेलरमध्ये दिसतेय, की प्रत्येकजण पैशांनी भरलेल्या एका काळ्या बॅगेच्या मागे लागलेला आहे. ही बॅग कुणाची आहे? तिच्यामध्ये काय दडलं आहे? आणि 'गाडी नंबर १७६०' चं या सगळ्याशी काय संबंध आहे? हे सगळं एक अनोखं रहस्य आहे, जे ४ जुलैला चित्रपटगृहात उलगडणार आहे. दरम्यान चित्रपटातील वातावरण हलकं-फुलकं असलं तरी, त्यामागे एक खोल आणि विचार करायला लावणारं कथानक आहे. प्रेक्षकांना खळखळून हसवतानाच, एक मोठं रहस्य शेवटपर्यंत उलगडत जाणार आहे आणि ही या चित्रपटाची खासियत ठरणार आहे. तन्वी फिल्म्स प्रस्तुत या चित्रपटाचे निर्माते कैलाश सोराडी आणि विमला सोराडी आहेत, तर लेखन योगीराज संजय गायकवाड यांनी केले आहे. चित्रपटात मराठी सिनेसृष्टीतील प्रथमेश परब, शुभंकर तावडे, प्रियदर्शिनी इंदलकर, सुहास जोशी, प्रसाद खांडेकर, श्रीकांत यादव आणि शशांक शेंडे यांसारख्या दमदार कलाकारांचा सहभाग आहे.

**लोकरंजन**




# गश्मीर महाजनीचा नवा अध्याय सुरू



मराठी चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेता गश्मीर महाजनी आता एका नव्या भूमिकेतून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. गश्मीरने चित्रपट, हिंदी मालिका, नृत्यामुळे प्रेक्षकांच्या मनात स्वतःचे एक स्थान निर्माण केले आहे. आता गश्मीर लेखक-दिग्दर्शक आणि निर्मात्याच्या भूमिकेत पदार्पण करत आहे. विशेष म्हणजे, त्याच्या वाढदिवसानिमित्ताने त्याने त्याच्या या पहिल्या चित्रपटाच्या मुहूर्ताची सोशल मीडियावर घोषणा केली. जीआरम्स इव्हेंट्स अँड प्रॉडक्शन या निर्मिती संस्थेअंतर्गत या चित्रपटाची निर्मिती होत आहे. या चित्रपटाचे निर्माते गौरी महाजनी, माधवी महाजनी आणि गश्मीर महाजनी असून लेखन व दिग्दर्शन गश्मीर स्वतः करत आहे. अभिनय क्षेत्रात अनेक वर्षांचा अनुभव असलेला गश्मीर आता कॅमेऱ्यामागे जाऊन एक नव्या प्रवासाला सुरुवात करत आहे. या चित्रपटाचे छायाचित्रण सुप्रसिद्ध डीओपी सत्यजीत शोभा श्रीराम यांच्या कॅमेऱ्यातून साकारले जात आहे. गश्मीरच्या या नव्या इनिंगबद्दल मराठी सिनेसृष्टीतूनही शुभेच्छांचा वर्षाव होत असून या चित्रपटाचं नाव आणि कलाकार जाणून घेण्याबद्दल प्रेक्षकांमध्ये प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे. आपल्या या नवीन प्रवासाविषयी गश्मीर महाजनी म्हणतो, "दिग्दर्शन हे माझं एक दीर्घकाळापासूनचं स्वप्न आहे. अभिनय करताना अनेक गोष्टी शिकल्या, अनुभवल्या आणि आत खोलवर काही सांगायचं राहून गेलं होतं. आता त्या भावना, ती विचारांची प्रक्रिया मी कॅमेऱ्याच्या मागून मांडणार आहे. चित्रपट ही एक सामूहिक कला आहे, मात्र काही कथा अशा असतात, ज्या फक्त आपल्या दृष्टिकोनातूनच सांगितल्या जाऊ शकतात. माझा हा चित्रपट म्हणजे माझ्या मनात कित्येक वर्षांपासून रुजत गेलेली कल्पना आहे. वाढदिवसाच्या निमित्ताने ही गोष्ट सुरू करत असल्यामुळे हे एक भावनिक आणि प्रेरणादायी क्षण आहेत."

# झी टॉकीजची आषाढी वारी सुरू
## भक्तीचा गजर घराघरात!

**टेलीरंग**

वारी म्हणजे चालणं नव्हे, ती म्हणजे भावना. पंढरपूरच्या रस्त्यांवर लाखोंच्या पावलांचा नाद, मातीचा गंध, आणि विठोबाच्या नावानं मन भरून येणारा प्रत्येक क्षण... पण सगळ्यांना ती चालता येतेच असं नाही. कधी तब्येत, कधी जबाबदाऱ्या, तर कधी वय पंढरपूर दूर राहतं.म्हणूनच यंदा झी टॉकीजने घेतलेली ही सुंदर शपथ – "ज्यांना चालता येत नाही, त्यांच्यासाठी वारी घरी यावी!"..आणि म्हणूनच विठ्ठल झाला तयार... वारीसाठी!

१८ जूनपासून ते ६ जुलै एकादशीपर्यंत, 'आषाढी वारी २०२५' हा भक्तिपूर्ण सोहळा झी टॉकीजवर साजरा होणार आहे – आपल्या घरच्या टीव्हीवर!यंदाची वारी का खास आहे?संत ज्ञानेश्वर माऊलींच्या ७५०व्या जयंतीवर्षात होणारी ही वारी आहे.पहिल्यांदाच थेट प्रक्षेपित होणारी 'चंद्रभागेची आरती' असणार आहे. १२ फूट उंच विठ्ठल-रुक्मिणी मूर्ती पंढरपूरची अनुभूती, घराघरात! दिसणार आहे. हँडलूमवर पारंपरिक वस्त्र विणणारे भाविक आणि कीर्तनकारांची सजीव




सादरीकरणं या वारीत असणार आहे. टीव्हीवर अनुभवता येणार भक्तीमय सोहळा. प्रत्येक पहाटे थेट काकड आरती असेल तर दिवसभर गजर कीर्तनाचा, 'मन मंदिरा', 'चाल गं सखे पंढरीला'सारखे भावस्पर्शी कार्यक्रम प्रसारित होतील.

तेव्हा तयार व्हा कारण यंदा वारी तुमच्याच दारी येतेय!१८ जून ते ६ जुलै – दररोज सकाळपासून रात्रीपर्यंत फक्त झी टॉकीजवर.

संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# एअर इंडियाने आंतरराष्ट्रीय उड्डाणांमध्ये केली १५ टक्क्यांची कपात

**नवी दिल्ली, दि. १९ वृत्तसंस्था**

टाटा समूहाच्या मालकीच्या एअर इंडिया या विमान सेवा देणाऱ्या कंपनीने मोठी घोषणा केली आहे. एअर इंडियाने त्यांच्या आंतरराष्ट्रीय वाइड-बॉडी विमानांच्या उड्डाणांमध्ये १५ टक्क्यांची कपात करण्याचा निर्णय घेतला आहे. ही कपात तात्काळ प्रभावाने सुरू करण्यात आली असून ही किमान जुलैच्या मध्यापर्यंत लागू राहणार आहे. अहमदाबाद येथे झालेली विमान दुर्घटना, मध्य-पूर्वेत सुरू असलेला इराण-इस्रायल संघर्ष आणि बोईंग ७८७ ड्रीमलायनरची होत असलेल्या सुरक्षा तपासणी यामुळे हा निर्णय घेण्यात आला आहे.

एअर इंडियाकडून दररोज ७० आंतरराष्ट्रीय उड्डाणे त्यांच्या वाइड-बॉडी विमाने म्हणजेच बोईंग ७८७ ड्रीमलायनर, बोईंग ७७७ आणि एअरबस ए३५० च्या माध्यमातून करते. एअरलाईनने घेतलेल्या या निर्णयाच्या मागे अनेक कारणे आहेत.

पश्चिमात्या देशांकडे जाणाऱ्या विमान मार्गांवरील हवाई क्षेत्रात (एअरस्पेस) बंदी घालण्यात आल्याने विमान प्रवासाचा वेळ वाढला आहे, यामुळे विमानांच्या उपलब्धतेवर परिणाम झाला आहे. याबरोबरच मागील गुरूवारी अहमदाबादहून लंडनला जाणारे एअर इंडियाचे विमान एआय ७१७ ला अपघात झाल्यानंतर बोईंग ७८७ विमानांच्या सुरक्षिततेची तपासणी केली जात आहे. ज्यामुळे या विमानांची उड्डाण क्षमता मर्यादित झाली आहे.

२ जून ते १७ जून या दरम्यानच्या काळात एअर इंडिया त्यांच्या वाइड-बॉडी ताफ्यातून एकूण ५४५ आंतरराष्ट्रीय उड्डाणांचे संचलन करणार होती, यापैकी ६६२ उड्डाणेच पूर्ण होऊ शकली. तर ८३ उड्डाणे रद्द करावी लागली. ज्यानुसार एअर इंडियाच्या आंतरराष्ट्रीय विमानांचा कॅन्सलेशन रेट १५.२ टक्के इतका नोंदवला गेला आहे. या आकडेवारीच्या आधारे एअरलाइनने त्यांच्या शेड्यूलमध्ये बदल करत हा निर्णय घेतला आहे आणि एअर इंडियाच्या क्षमतेनुसार आंतरराष्ट्रीय उड्डाणांमध्ये १५ टक्क्यांची कपात केली जाईल.

१२ जून रोजी लंडनच्या गॅटविक विमानतळाकडे उड्डाण केलेले एअर इंडियाचे बोईंग ७८७-८ ड्रीमलायनर विमान एआय-१७१ अहमदाबाद विमानतळावरून टेकऑफ केल्यानंतर लगेचच कोसळले. या दुर्घटनेत विमानातील २४१ प्रवासी आणि क्रू मेंबर्स यांच्यासह जमिनीवरील अनेकांचा मृत्यू झाला. यानंतर नागरी उड्डाण निदेशालयाने एअर इंडियाच्या बोईंग ७८७-८ आणि ७८७-९ ताफ्याच्या सखोल तपासणीचे आदेश दिले.

# पेट्रोल पंपांवरील 'टॉयलेट' केवळ ग्राहकांसाठीच
## हायकोर्टाचा महत्त्वपूर्ण निर्णय

**तिरुवनंतपुरम, दि. १९ वृत्तसंस्था**

केरळ उच्च न्यायालयाने सार्वजनिक टॉयलेट (स्वच्छतागृह) बाबत एक महत्त्वाचा निर्णय दिला आहे. पेट्रोल पंपांवर असलेली टॉयलेट (स्वच्छतागृह) केवळ ग्राहकांसाठीच आहेत. याचा वापर सार्वजनिक स्वच्छतागृहांसारखा करुता येणार नाही, असा महत्त्वपूर्ण निर्णय उच्च न्यायालयाने दिला आहे. आपल्या अंतरिम आदेशात न्यायालयाने सरकारला पेट्रोल पंपांवरील टॉयलेट सर्वसामान्यांच्या वापरासाठी अनिवार्य करू नयेत, असे आदेश दिला आहे.

राज्य सरकार आणि स्थानिक स्वराज्य संस्थांनी पेट्रोल पंपांवर असलेल्या स्वच्छतागृहांची सार्वजनिक सुविधा म्हणून वापरावे, असा आदेश दिला होता. खासगी पेट्रोल पंपांवर असणाऱ्या टॉयलेटवर सार्वजनिक वापरासाठी असे पोस्टर चिकटवण्यात आले होते. या निर्णयाला पेट्रोल पंप मालकांनी आक्षेप घेतला होता. पंपांवर असलेली स्वच्छतागृहे ही सार्वजनिक करू नयेत, अशी मागणी करण्यात आली होती. केरळ उच्च न्यायालयाने तिरुवनंतपुरम महानगरपालिकेला स्वच्छ भारत अभियानांतर्गत मार्गदर्शक तत्त्वे सादर करण्याचे निर्देश दिले होते. पेट्रोल पंप मालकांच्या वकिलांनी युक्तीवाद करताना सांगितले की, पेट्रोल पंपांवरील टॉयेलेटचा वापर सार्वजनिक स्वच्छतागृहांसारखा होवू लागल्याने पंपावर दररोज वादाचे प्रसंग होत आहेत. याचा पेट्रोल पंप कर्मचार्यांच्या कामावर परिणाम झाला. पेट्रोल पंपावर असलेले स्वच्छतागृह हे खासगी मागलीचे असतात. त्याचे सार्वजनिक स्वच्छतागृहात रूपांतरित करणे हे भारतीय राज्यघटनेने दिलेल्या सुरक्षित मालमत्तेच्या अधिकाराचे उल्लंघन आहे. पंपावर असलेले टॉयलेट केवळ ग्राहकांच्या आपत्कालीन वापरासाठी असतात. त्यामुळे त्याचा वापर सार्वजनिकरित्या केला जावू शकत नाही."

# इराणने इस्रायलचा शेअर बाजार उडवला

**तेल अव्हिव, दि.१९ वृत्तसंस्था**

मध्य पूर्वेतील तणाव आता शिगेला पोहोचला आहे. इराणनेइस्रायलवर मोठ्या क्षेपणास्त्र हल्ले केले असून, यात इस्रायलची आर्थिक राजधानी तेल अवीवमधील प्रसिद्ध स्टॉक एक्सचेंजचे (शेअर बाजार) मोठे नुकसान झाले आहे. यानंतर इस्रायलनेही तातडीने प्रत्युत्तर देत इराणमधील अनेक लक्ष्यांवर हल्ला केला आहे, ज्यात अणुस्थळांचाही समावेश आहे, यामुळे संपूर्ण मध्यपूर्वेतील परिस्थिती अधिकच स्फोटक बनली आहे.



बुधवार, १९ जून २०२५ रोजी इराणने इस्रायलच्या तेल अवीव शहरावर २५ हून अधिक क्षेपणास्त्रे डागली. या हल्ल्यांचे मुख्य लक्ष्य तेल अवीव स्टॉक एक्सचेंजची इमारत होती. ही इमारत इस्रायलच्या आर्थिक कामकाजाचे केंद्र मानली जाते आणि तिच्यावरील हल्ल्यामुळे देशाला मोठा आर्थिक धक्का बसला आहे. क्षेपणास्त्र हल्ल्यानंतर स्टॉक एक्सचेंजच्या इमारतीतून धुराचे लोट बाहेर पडताना दिसले आणि इमारतीचे अनेक भाग पूर्णपणे उद्ध्वस्त झाले. या हल्ल्यामुळे इस्रायलच्या अर्थव्यवस्थेचे मोठे नुकसान होईल, असे मानले जात आहे.

# हेडिंग्ले कसोटीपूर्वी करुणला दुखापत

**लीड्स, दि. १९ वृत्तसंस्था**

भारत आणि इंग्लंड कसोटी क्रिकेट मालिकेतील पहिला सामना शुक्रवार, २० जूनपासून हेडिंग्ले, लीड्स येथे सुरु होणार आहे. रोहित शर्मा, विराट कोहली आणि आर. अश्विन यांच्या निवृत्तीनंतर संक्रमणाच्या टप्प्यातून जात असलेल्या टीम इंडियासाठी ही मालिका आव्हानात्मक असणार आहे. अशातच बुधवारी सरावावेळी भारताचा स्टार फलंदाज दुखापत झाल्याने टीम इंडियावरील दबाव आणखी वाढला आहे.

करुण नायरला दुखापत

देशांतर्गत क्रिकेटमध्ये केलेल्या दमदार कामगिरीच्या जोरावर करुण



नायरने सुमारे आठ वर्षांनंतर भारतीय संघात पुनरागमन केले आहे. तो सध्या उत्कृष्ट फॉर्मात आहे. मालिकेपूर्वी इंग्लंड लायन्सविरुद्धच्या अनधिकृत कसोटी सामन्यात द्विशतक झळकावून त्याने आपली निवड सार्थ ठरवली आहे. त्यामुळे त्याची पहिल्या कसोटीसाठी संघातील निवड निश्चित मानली जात आहे. मालिकेपूर्वी इंग्लंड लायन्सविरुद्धच्या अनधिकृत कसोटीत द्विशतक झळकावून त्याने निवड योग्य असल्याचे सिद्ध केले होते. आता पहिल्या कसोटीपूर्वी नायरच्या बरगड्यांना दुखापत झाली. प्रसिद्ध कृष्णाच्या गोलंदाजीवर सराव करताना त्याला दुखापत झाली. तो अस्वस्थ दिसत होता. दुखापत गंभीर वाटत नसली तरी याबाबत अद्याप कोणताही खुलासा करण्यात आलेला नाही. आता २०१७ नंतर तो आपला पहिला कसोटी सामना खेळण्याची अपेक्षा असल्याने करुण नायरसाठी ही एक मोठी संधी आहे.

भारताने २००७ पासून इंग्लंडमध्ये एकही मालिका जिंकलेली नाही. आता तेंडुलकर-अँडरसन ट्रॉफी ही टीम इंडियासाठी आव्हान असेल. भारतीय संघात करुण नायरचे जवळजवळ आठ वर्षांनंतर संघात पुनरागमन झाले आहे. आता रोहित शर्मा आणि विराट कोहली या दोघांची जागा घेणाऱ्या खेळाडूच्या शोधात संघ व्यवस्थापन आहे. केएल राहुलला बढती मिळण्याची शक्यता आहे. तर कर्णधार गिल चौथ्या क्रमांकावर फलंदाजी करेल, असे मानले जात आहे. तिसरे आणि सहावे स्थान रिक्त राहील. तिसऱ्या क्रमांकासाठी साई सुदर्शन आणि अभिमन्यू ईश्वरन यांच्यात चुरस असेल.

महासागर MUMBAI
RNI No.: MAHAMAR/2016/79101
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak at S. R. publication, Mohan - Arjun Compund, Godown No. 8, 9 & 10, Near Ghartan Pada, Vaishali Nagar Last Bus Stop, Dahisar (E),Mumbai - 400068 and Published From Bora Bazar Street,Fort, Mumbai -400001. Editor - SHRIKRISHNA TANSUKHDAS CHANDAK

महासागर मुंबई
हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडावून नं. ८,९,१०, घरटन पाडा जवळ, वैशाली नगर लास्ट बस स्टॉप, दहिसर ईस्ट, मुंबई- ४०००६८ येथे छापून बोरा बाजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई- ४०० ००१ येथे प्रसिद्ध केले. संपादक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक (मो. ९९२२९७००२३) Email : mumbaimahasagar@gmail.com RNI No.: MAHAMAR/2016/79101